मुंबई, सोमवार, १२ जून २०२३

मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com

# जयंत स्मृती




# जयंत सहस्रबुद्धे
## अनेक चांगल्या गुणांचे उत्तम मिश्रण

**केवळ संघटनेपुरते मर्यादित न राहता, देशहितासाठी आवश्यक विज्ञान क्षेत्रातील सर्वच घडामोडींवर जयंत सहस्रबुद्धे यांचे लक्ष होते व प्रत्येक कार्यकर्त्याला तशी दृष्टी असण्यावर त्यांचा आग्रह होता. ते स्वत: सर्व स्तरातल्या वैज्ञानिकांशी मोकळेपणाने अनेक विषयांवर चर्चा करीत व संपूर्ण विषय समजून घेण्याचा प्रयत्न करीत असायचे. अर्थात, जे राष्ट्राच्या हिताचे असेल ते स्पष्टपणे सांगणे, हा त्यांचा मूळ स्वभाव होता.**

सतत सक्रिय जयंत सहस्रबुद्धे यांचा गेल्या नऊ महिन्यांपूर्वी अपघात झाला व त्यानंतर त्यांच्या जीवनाचा सतत संघर्ष सुरूच होता. परंतु, २ जूनला अखेर आशा संपली व ते स्वर्गवासी झाले. परिवाराने त्यांचा मुलगा, भाऊ, दीर इत्यादी नात्यातला जयंत व संघाने एक कर्तृत्ववान प्रचारक गमावला. परंतु, याही पलीकडे विज्ञानजगत एका अत्यंत मूल्यवान व्यक्तीस मुकले.

**सुनील आंबेकर**

जयंत सहस्रबुद्धे गोव्यात अनेक वर्षे संघाचे प्रचारक होते. त्या काळात संघकार्याला व्यापक स्वरूप मिळाले, ते अजूनही सर्वांच्या स्मरणात आहे. कामावर पूर्णत: लक्ष्य केंद्रित करून खोलात जाऊन जमिनीवर प्रत्यक्ष कार्य उभे करणे, ही त्यांची विशेषता सुरुवातीपासूनच ध्यानात येत होती. पुढे त्याची प्रचिती ते २००१ ते २००९ महाराष्ट्राच्या कोकण परिसरात प्रांत प्रचारक म्हणून कार्य करताना आली.

या वाटचालीत एका टप्प्यावर त्यांच्याकडे संघप्रेरित संघटन 'विज्ञान भारती'चे अखिल भारतीय संघटन मंत्री म्हणून जबाबदारी आली व त्यांच्यामधील अन्य अनेक गुणांची नव्याने ओळख व्हायला सुरुवात झाली. आपल्या नि:स्वार्थ बुद्धी व सतत परिश्रमामुळे लवकरच त्यांची 'विज्ञान भारती'च्या केंद्रीय व तसेच वेगवेगळ्या स्थानिक कार्यकर्त्यांसोबत मैत्री झाली. याचा परिणाम म्हणून गेल्या काही वर्षांत संघटनेच्या कार्याला अधिक गती मिळाली. जुन्या व नव्या सर्वच आयामांना व्याप व अपेक्षित स्वरूप प्राप्त व्हायला सुरुवात झाली व आता हळूहळू त्याची अनुभूती इतरांना येऊ लागली.




स्वत: अभियांत्रिकी शिक्षण घेतलेले जयंतराव लवकरच 'विज्ञान भारती'च्या कार्यात रममाण झाले. केवळ संघटनेपुरते मर्यादित न राहता, देशहितासाठी आवश्यक विज्ञान क्षेत्रातील सर्वच घडामोडींवर त्यांचे लक्ष होते व प्रत्येक कार्यकर्त्याला तशी दृष्टी असण्यावर त्यांचा आग्रह होता. ते स्वत: सर्व स्तरातल्या वैज्ञानिकांशी मोकळेपणाने अनेक विषयांवर चर्चा करीत व संपूर्ण विषय समजून घेण्याचा प्रयत्न करीत असायचे. अर्थात, जे राष्ट्राच्या हिताचे असेल ते स्पष्टपणे सांगणे, हा त्यांचा मूळ स्वभाव होता. त्यामुळे कधी कधी सोबतच्या कार्यकर्त्याला याचा विपरीत परिणाम होईल, अशी शंका मनात असायची. परंतु, जयंतरावांच्या सात्विकतेचा प्रभाव म्हणून शेवटी परिणाम सकारार्थीच होत असे. या प्रक्रियेत त्यांनी अनेक प्रमुख वैज्ञानिकांना जोडले. या सर्वांशी बोलताना त्यांचा आग्रह असे की, विज्ञान म्हणजे सर्व पूर्वाग्रह बाजूला ठेवून मोकळेपणाने ज्ञान जुने की नवे, पश्चिमेतले की भारतातले, नवीन व्याख्येतले की परंपरेने आलेले, प्रयोगशाळेतून आलेले किंवा अनुभवाने सिद्ध झालेले, सर्वांकडे समान दृष्टीने बघून योग्य पद्धतीने तपासून स्वीकारले पाहिजे. कदाचित हे करताना ते-ते ज्ञान तपासण्याची प्रक्रिया वेगवेगळी असू शकेल. ते भारतीय ज्ञानाच्या विज्ञाननिष्ठ परंपरेवर आधारित ज्ञानाच्या अनेक विषयांवर सविस्तर विषय मांडीत असत. यासाठी वर्तमानातील विज्ञानाची प्रगती व त्यातील दृष्टिकोन याची माहिती घेण्याचा त्यांचा सतत भर होता. बरोबरीने योग, आयुर्वेद, गणित, भारतीय परंपरेतील ग्रहांच्या गणितांपासून धातूशास्त्राच्या विकसित परंपरेपर्यंत अनेक विषयांवर त्यांचे सतत अद्यतन अध्ययन सुरू असायचे. मागील काही काळात 'राष्ट्रीय दिनदर्शिका' यावर त्यांनी बरीच भाषण दिली व पुन्हा ही दिनदर्शिका जीवित केली.

आयुर्वेदावर आधारित आहारावरसुद्धा त्यांचा अभ्यास होता व 'आहार क्रांती'च्या अभियानात 'विज्ञान भारती'च्या सहभागावर त्यांचा भर होता. त्यांची मूळातून विचार करण्याची प्रवृत्ती असल्यामुळे चिंतनापोटी नव्या-नव्या कल्पना जन्म घेत. स्वाधीनतेच्या अमृत महोत्सवानिमित्त कसे वैज्ञानिकांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात आपल्या 'स्व'च्या आग्रहामुळे युरोपच्या दबावास बळी न पडता, भारतीय ज्ञानाला जोपासत आधुनिक विज्ञानाच्या क्षेत्रात भारतीय बुद्धीचा अमिट ठसा उमटवला, याचा अभ्यास करीत त्यांनी हेच अभियान बनविले. यावरील त्यांच्या भाषणांमध्ये आपल्याला देशभक्तीच्या अज्ञात राहिलेल्या नव्या आयामाची ओळख होत असे. पुढे हे एक व्यापक अभियानच बनले.

कुठलाही विषय समजावून घेण्याचे स्थान, ही जयंतरावांची ओळख कार्यकर्त्यांप्रमाणे अनेक वैज्ञानिकांमध्ये देखील परिचित होती. त्यांच्या जाण्याने झालेली ही पोकळी सर्व कार्यकर्त्यांनी मिळून लवकरच भरून काढावी, हीच जयंतरावांची खरी इच्छा असेल, असे वाटते.

**(लेखक रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचारप्रमुख आहेत.)**

# रा. स्व. संघाच्या वतीने जयंतरावांना विनम्र श्रद्धांजली

**श्रीयुत जयंत सहस्रबुद्धे यांच्या निधनाची अत्यंत दु:खद बातमी तृतीय वर्षाच्या दीक्षांत समारंभाच्या समारोपानंतर मिळाली. अचानक बसलेल्या या धक्क्याने आम्ही सर्वच स्तब्ध झालो आहोत. नऊ महिन्यांपूर्वी झालेल्या अपघातानंतर त्यांच्या तब्येतीत झालेल्या खात्रीशीर प्रगतीची बातमी आनंददायी होती. एक-दोन वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतरही ते पुन्हा एकदा हळूहळू त्यांचा सहवास आपल्या कार्यकर्त्यांना देऊ शकतील, असे आम्हा सर्वांना वाटत होते. डॉक्टर सर्वतोपरी प्रयत्न करत होते. घरातील सदस्यांचे सेवा करण्याचे कार्य सुरूच होते. स्थानिक स्वयंसेवकांचेही सहकार्य वेळोवेळी मिळत होते. मात्र, देशभरातील कार्यकर्त्यांची प्रार्थना होत असूनही उलटच घडले. आठवड्याभरात प्रकृती खालावल्यानंतर त्यांनी आज अचानक निजधामकडे प्रस्थान केले.**

**आपल्या सर्वांचे, 'विज्ञान भारती'च्या हजारो कार्यकर्त्यांचे आणि विशेषत: त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन कसे करायचे? नियतीचा हा क्रूर खेळ विधिलिखित आहे. हे ठाऊक असूनही मन ते मानायला तयार नाही. परंतु, त्यावर उपायही काही नाही. त्यांची कार्यक्षमता, नेतृत्व क्षमता, गोड स्वभाव, स्मितहास्य, सुंदर गायन आणि स्मृतीतून प्रेरणा घेऊन पुढे आपले कर्तव्य बजावणे, हे विहित आहे. त्यांच्या दिवंगत आत्म्यास सद्गती लाभो, ही प्रार्थना करत मी माझ्या वैयक्तिक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने त्यांच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण करतो.**

**– डॉ. मोहनजी भागवत,**
**सरसंघचालक,**
**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ**

### 'जयंत स्मृती'

*रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक आणि 'विज्ञान भारती'चे राष्ट्रीय संघटन सचिव जयंतराव सहस्रबुद्धे यांचे दि. २ जून रोजी वयाच्या ५७व्या वर्षी निधन झाले. जयंतरावांनी अवघ्या आयुष्यात जोडलेली, घडवलेली असंख्य माणसं, त्यांच्या आठवणी कायम संग्राह्य राहाव्या, यासाठी दै. 'मुंबई तरुण भारत'तर्फे 'जयंत स्मृती' हा विशेषांक प्रसिद्ध करीत आहोत. या स्मृती विशेषांकासाठी जयंतरावांशी स्नेह असणाऱ्या अनेक परिजनांच्या आठवणींचे लेख, संदेश आम्हाला प्राप्त झाले. त्याबद्दल आभारी आहोत. जयंतरावांना दै. 'मुंबई तरुण भारत' परिवारातर्फे विनम्र आदरांजली...*

# जगन्मित्र जयंतराव...

जयंतराव सहस्रबुद्धे यांचा तसा परिचय ते प्रचारक म्हणून निघाल्यापासून - १९८९ पासून. १९९१ मध्ये माझ्याकडे प्रांताची जबाबदारी आली. त्यामुळे महाराष्ट्रात प्रवास सुरू झाला. त्यावेळी जयंतराव मुंबई महानगरात शांतीनगर भाग (सांताक्रुझ पूर्व व पश्चिम आणि वांद्रे पूर्व आणि पश्चिम) प्रचारक होते. त्यामुळे मी जेव्हा या भागात प्रवासासाठी गेलो, तेव्हा माझ्याबरोबर ते असायचे. सर्व विषय समजून घेऊन, कामातील अपेक्षा समजून घेऊन, त्या भागातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व सहकार्य करत. त्या विषयाची अंमलबजावणी व्हावी, यासाठी ते प्रयत्न करत असत.

**सुहास हिरेमठ**

ते वृत्तीने अतिशय शांत व सात्त्विक होते. चेहरा नेहमी प्रसन्न व हसरा असायचा. मी त्यांना कधीही निराश झालेले, उत्तेजित झालेले व रागावलेले पाहिले नाही. त्यामुळे त्यांच्या सहवासात येणारा कार्यकर्ताही मनाने प्रसन्न होत असे.

ते जेव्हा गोमंतक विभाग प्रचारक होते, त्यावेळी मी सह प्रांत प्रचारक होतो. सर्व स्तरांवरील कार्यकर्त्यांचे आपापल्या कार्यक्षेत्रात प्रवास चालू असतात. संघात अनेक कार्य विभाग आहेत. अशा प्रांत स्तराच्या कार्यकर्त्यांचे प्रवास चालू असतात. त्यातही जे प्रचारक असतात, ते अधिक प्रवास करतात. गोव्याच्या बाबतीत असे व्हायचे की, एकाच महिन्यात चार-पाच जणांची गोव्यात प्रवास करावयाची इच्छा होत असे. त्या सर्वांना/परस्परांना ते माहीत नसायचे. प्रत्येक जण जयंतरावांशी स्वतंत्र बोलायचा. पण, आश्चर्य म्हणजे जयंतराव सर्वांना 'या' म्हणायचे. एकाच वेळी चार जण येणार आहेत म्हणून 'तुम्ही नंतर कधीतरी या' असे त्यांनी कधीच म्हटले नाही. सर्वांचे प्रवास निश्चित झाल्यानंतर जयंतराव त्या त्या विषयाच्या जिल्हास्तराच्या प्रमुखांची भेट घेत असत. प्रत्येकाशी त्या प्रांत कार्यकर्त्याच्या अपेक्षांविषयी बोलायचे, योजना कशी करणार, अशी चर्चा करायचे आणि प्रत्येक प्रांत कार्यकर्त्याच्या प्रवासात एका ठिकाणी उपस्थित राहत, त्यांच्या बैठकीत बसत असत, विषय समजून घेत असत व नंतर त्याची अंमलबजावणी व्हावी, यादृष्टीने जिल्हा कार्यकर्त्यांशी संवाद करत असत. आजही ते आठवून मला त्यांच्या क्षमतेचे, नियोजन कौशल्याचे आश्चर्य वाटते. त्यावेळी तरी ते एकमेव असे विभाग प्रचारक होते.

जयंतराव काही वर्षे तत्कालीन सरकार्यवाह शेषाद्रीजी यांचे स्वीय साहाय्यक होते. कोणतेही काम अतिशय विचारपूर्वक करणे, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांची नम्र सेवाभावी वृत्ती, उत्तम आकलनशक्ती, विषय समजून घेण्याची उत्तम क्षमता इत्यादी गुणांमुळे शेषाद्रीजी त्यांच्यावर प्रसन्न असत. त्यांच्या प्रवासात विविध बैठकीत गेल्यानंतर ते जयंतरावांचा कार्यकर्त्यांना परिचय करून देताना जयंतरावांच्या वडिलांचे जयंतरावांबद्दलचे एक मत सांगत, ते म्हणजे 'आमचा जयंत आदर्श विद्यार्थी, आदर्श स्वयंसेवक व आदर्श प्रचारक आहे.'

बहुधा ते तीन-चार वर्षे शेषाद्रीजींसमवेत होते. त्या जबाबदारीतून मुक्त झाल्यावर शेषाद्रीजींनी बंगळुरु येथील कार्यालयात तेथील सर्व प्रचारक व कार्यकर्ते यांच्यासह मिष्टान्न (पुरणपोळी) खाऊ घालून जयंतरावांना सन्मानपूर्वक निरोप

**आपल्या मधुर वाणीने, नम्र व प्रेमळ स्वभावाने, व्यवहाराने व त्या-त्या क्षेत्रातील अध्ययनाने जयंतराव सहस्रबुद्धे यांनी प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटविला. श्रेष्ठ गुणवत्ता, सात्त्विकता व समर्पण ही त्यांच्या जीवनाची त्रिसूत्री होती.**

दिला व शुभाशीर्वाद दिले. त्यानंतर शेषाद्रीजी जीवंत असेपर्यंत त्यांचे संबंध पिता-पुत्राप्रमाणेच राहिले.

त्यानंतर जयंतराव नाशिक विभागाचे (नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव) विभाग प्रचारक होते. त्यानंतर गोमंतक विभाग (गोवा राज्य) प्रचार होते. त्यांचे कार्यकर्त्यांशी व त्यांच्या कुटुंबीयांशी अत्यंत प्रेमाचे व आपुलकीचे संबंध होते. गोव्यातील अनेक कुटुंबांत तर तीन पिढ्यांशी त्यांचे संबंध होते. अर्थात, ते त्यापूर्वीदेखील ज्या ज्या क्षेत्रात ते प्रचारक होते,

**(पान २ वर)**

# जयंतराव सहस्रबुद्धे
## आधुनिक विज्ञानऋषी!

'विज्ञान भारती'चे राष्ट्रीय संघटन सचिव आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक जयंतराव सहस्रबुद्धे यांचे नुकतेच देहावसान झाले. आपल्या सर्वांना त्यांचा परिचय आहेच! जयंतराव यांचा सहवास लाभलेले महाराष्ट्रात अनेक संघ स्वयंसेवक तथा 'विज्ञान भारती'चे कार्यकर्ते आहेत, अशा सर्वांची जयंतराव यांच्याशी असलेली आपुलकी, प्रेम व जिव्हाळा नेहमीच संस्मरणीय राहील.

जयंतराव यांच्या संघसमर्पित जीवनाबद्दल वेगळा

**मंगलप्रभात लोढा**

परिचय करून देण्याची आवश्यकता नाही. परंतु, त्यांच्याबद्दल काही गोष्टी आवर्जून नमूद कराव्याशा वाटतात. गिरगाव येथील एका सामान्य मराठी कुटुंबात जन्मलेले जयंतराव लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धिमत्तेचे होते. त्यांचे वडीलदेखील संघ स्वयंसेवक. त्यामुळे समर्पणाचे धडे अगदी लहानपणापासून त्यांनी गिरवले होतेच! त्यांचे बंधूदेखील प्रचारक म्हणून निघाले होते. एका सामान्य कुटुंबातील दोन उच्चशिक्षित मुले, आपल्या कुटुंबाला पुढे नेण्याच्या सर्व संधी नाकारून संघासाठी तथा देशासाठी आपले जीवन समर्पित करतात, हे आजच्या युवापिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

स्व. जयंतरावांनी गिरगावात संघकाम करत असतानाच, उच्चविद्या प्राप्त केली. त्यांना 'भाभा अणुसंशोधन केंद्र' येथे वैज्ञानिक या पदावर नोकरी देखील मिळाली. लौकिक जीवनात एका उच्च पदावर ते विराजमान होते. काही वर्षं 'भाभा अणुसंशोधन केंद्रा'त त्यांनी सेवादेखील दिली. मात्र, मनात समाजोत्थानाची ज्योत सदैव तेवत असे. अशा वेळी जयंतरावांनी उच्च पदस्थ शास्त्रज्ञाची नोकरी सोडून, समाजाचे संशोधन करण्याचा निर्णय घेतला आणि संघाचे पूर्णवेळ प्रचारक म्हणून त्यांनी कार्य सुरु केले, ते अगदी जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत! 'कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू हीच विश्रांती' हे वचन जयंतरावांच्या जीवनाकडे बघितल्यावर अगदी सार्थ वाटावे. गिरगावातील एका चाळीत राहणाऱ्या मध्यमवर्गीय तरुणाला आपल्या कुटुंबाला आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या, मध्यमवर्गीय स्तराला उच्च मध्यमवर्गीय करण्याच्या सर्व शक्यता व सुवर्ण संधी असताना, त्यागाचा आणि समाजासाठी जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेणे, हे खरोखरच एक दिव्यत्वाचे लक्षण आहे.

जयंतरावांनी प्रचारक म्हणून महाराष्ट्रातील अनेक भागांत काम केले. विशेषतः कोकण प्रांतात अधिक काळ काम करण्याचे त्यांना दायित्व मिळाले. कोकण प्रांत प्रचारक म्हणून देखील ते कार्यरत राहिले. **(पान २ वर)**



# जयंत स्मृती



## माझ्या आठवणीतील जयंतराव...

पुण्याला बालेवाडीमध्ये तीन दिवसांचे घोष शिबीर होतं. नक्की साल आठवत नाही. त्यावेळेस मी पणव वादक म्हणून भाग घेतला होता. वसई तालुक्यातून घोष शिबिरात गेलो होतो. तिथे जयंतरावांची ओळख झाली. मी जुने प्रचारक अनंतराव देवकुळे, शिवरायजी तेलंग, वसंतराव केळकर, दामू अण्णा दाते यांसारखे प्रचारक अगदी जवळून पाहिले आहेत. जयंतराव अशाच जुन्या प्रचारकांसारखे मला वाटले. त्यांचे साधे राहणीमान आणि उच्च विचारसरणी एखाद्याचे मन सहज जिंकून घेत असे. एखाद्या व्यक्तीचा त्यांच्याशी झालेला परिचय ती व्यक्ती खूप दिवसांनी भेटल्यावरसुद्धा त्या व्यक्तीचे नाव, गाव, पत्ता त्यांचा स्मरणात असे. एका कार्यक्रमात त्यांनी संस्कृतमधून बौद्धिक दिले होते. त्यांनी इतक्या अस्खलित व स्वयंसेवकांना



**नारायण पराडकर**

समजेल अशा भाषेत ते बौद्धिक दिले. त्यांचे संस्कृत वाखाणण्याजोगे होते. मी द्वितीय वर्षाला असताना मला त्यांचे बौद्धिक ऐकण्याचा योग आला. शिक्षा वर्गातील स्वयंसेवकांची नावे लक्षात ठेवून ते त्यांच्या संपर्कात राहत असत. या त्यांच्या गुणाचे कौतुक वाटत असे. त्यांनी मला वैयक्तिकरित्या भेटून घोषातील माझ्या वादनाचे कौतुक केले होते. परंतु, या वादनाला मी पात्र होतो की नाही, हे मला माहीत नाही. एखाद्या व्यक्तीला आपलेसे करून संघविचार त्याच्या मनात सहजपणे रुजवणे, ही त्यांची कला होती.

काही वर्षं ते गोव्याचे प्रांत प्रचारक होते, त्यावेळेस ते माझे मोठे बंधू यशवंत पराडकर यांच्या घरी वरचेवर जात असत. आमच्या कुटुंबाला ते वैयक्तिकदृष्ट्या ओळखत असे. त्यांची एक आठवण माझ्या पुतणीने सांगितली ती इथे नमूद करावीशी वाटते. बारावीनंतर माझी पुतणी पुण्याला पुढील शिक्षणासाठी फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत होती. त्याचदरम्यान जयंतराव संघकामासाठी फर्ग्युसन महाविद्यालयामधील प्राध्यापक, प्राचार्य आदींना भेटण्यासाठी जात असत. त्यावेळेस जयंतरावांना माझी पुतणी तिथे शिकत असल्याचे समजले. जेव्हा जेव्हा ते फर्ग्युसन महाविद्यालयाला कामानिमित्त जात असत, तेव्हा तेव्हा ते माझ्या पुतणीला न चुकता भेटत असत. त्यामुळे तेथील प्राध्यापक व प्राचार्य यांनी आश्चर्याने तिला विचारले होते की, ''एवढी महान व्यक्ती तुला कशी ओळखते?'' या प्रसंगावरून त्यांचा मनाचा मोठेपणा दिसून येतो. ही माझ्या पुतणीने सांगितलेली एक आठवण...

जेव्हा जयंतरावांकडे 'विज्ञान भारती'ची जबाबदारी आली, त्यावेळेस मी मुंबईमध्ये नोकरी करीत होतो. एका 'विज्ञान भारती'च्या दादर येथील कार्यक्रमासाठी व्यवस्थेमध्ये कार्यकर्त्यांची जरुरी होती. मला अचानक एका अपरिचित नंबरवरून 'मी जयंत सहस्रबुद्धे बोलतोय' अशा एकेरी नावाने फोन आला. त्यांनी मला आदरार्थी संबोधून कार्यक्रमासाठी 'कार्यकर्ता' म्हणून येण्याची विनंती केली. त्या कार्यक्रमाला प्रसिद्ध वैज्ञानिक अनिलजी काकोडकर उपस्थित होते. जयंतरावांमुळेच मला अशा महान व्यक्तीला भेटण्याचे भाग्य लाभले. कार्यक्रमाच्या दुसर्‍या दिवशी सर्व कार्यकर्त्यांना एकत्रित करून कार्यकर्त्यांच्या कामाचे कौतुक करून सर्वांचे आभार मानले.

नाशिक येथील श्रीगुरूजी रुग्णालय पाहण्यासाठी आम्ही उभयता गेलो असता, काही ठरावीक रक्कम रुग्णालयास देणगी म्हणून आम्ही दिली आणि मी जयंतरावांना आनंदाने दूरध्वनीवरून ही बातमी आपुलकीच्या नात्याने सांगितली. तो दिवस विवेकानंद जयंतीचा होता. मी एक लाख रुपयांपर्यंत रुग्णालयास देणगी मिळवून देण्याचा माझा संकल्प जयंतरावांकडे व्यक्त केला. त्यावर त्यांनी मिश्किलपणे सांगितले, ''तुझ्यासारख्याने अडीच कोटी रुपये देणगी जमवून देणे अपेक्षित आहे.'' त्यांच्या या प्रोत्साहनामुळेच मी काही लाख रुपये रक्कम जमा करू शकलो. एखाद्या व्यक्तीला प्रोत्साहित करून आपल्या मनातील समाजासाठी योग्य असलेले कार्य दुसर्‍या व्यक्तीकडून सहजरित्या घडवून आणणे, ही त्यांची हातोटी होती. यामुळे ते माझ्या स्मरणात चिरकाल राहतील.

प्रत्येक प्रचारक हा त्यागी असतोच. परंतु, जयंतराव सहस्रबुद्धे यांच्यासारखा बहुआयामी प्रचारक विरळाच! अशा सर्वांच्या लाडक्या जयंतरावांना माझी व माझ्या परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली.

**(गोरेगाव पूर्व, ९२२४६८५९४०)**

## जयंतराव : देवाच्या सख्यत्वासाठी, पडाव्या जिवलगांच्या तुटी...

**पहिल्याच भेटीत जयंतराव इतके भावले की, कित्येक वर्षं मी त्यांना भेटत आलोय असं वाटायला लागलं. समोरच्याने कितीही रटाळ, निरुपयोगी, पाल्हाळ लावलं तरी ते शांतपणे, मनापासून ऐकून घ्यायचं; कुणी आगपाखड करत बोलत राहिला तरी त्याला पूर्ण ऐकून घ्यायचं आणि कोणतीही प्रतिक्रिया न देता त्याला शांत करायचं, असा त्यांचा स्वभाव होता. ते कुणावर चिडलेले, संतापून काही बोललेले किंवा त्यांच्या बोलण्यातून कधी कटुता आलेली कुणी कधी बघितली नाही.**

शुक्रवार, दि. २ जूनला पहाटे जयंतराव सहस्रबुद्धे अनंताच्या प्रवासाला निघून गेले. योगायोग असा की, मी २००० साली बरोबर त्याच दिवशी जयंतरावांना पहिल्यांदा भेटलो होतो. मे २०००च्या शेवटी माझी 'बी.एस.सी. हॉर्टिकल्चर'ची परीक्षा संपली आणि 'रिझल्ट' मिळायच्या आधीच दोन दिवस मुर्डीला घरी राहून लगेच आयुष्यातल्या पहिल्या प्रचारक बैठकीला हरंगुळ बुद्रुक, लातूरच्या निवासी शाळेत पोहोचलो. प्रचारक बैठकीसाठी तयार केलेल्या व्यासपीठाच्या मागे भव्य पडदा होता आणि त्यावर समर्थ रामदासांचं वचन लिहिलेलं होतं – 'देवाच्या सख्यत्वासाठी, पडाव्या जिवलगांच्या तुटी!' सर्वस्व अर्पावे शेवटी, प्राण तोही वेचावा! समोर तत्कालीन

**विनय जोशी**

प्रांत प्रचारक मुकुंदराव पणशीकर आणि सह प्रांत प्रचारक सुहासराव हिरेमठ होते, बहुधा डॉ. काका कुकडे ही होते. धीरगंभीर मुकुंदराव आणि हसतमुख सुहासराव असं मिश्रण समोर असताना मागची वाक्य माझ्यात चलबिचल करून गेली. आई-बाबांना आणि गावाला सोडून कधीही नं राहिल्यामुळे पडाव्या जिवलगांच्या तुटी वाचून मला अस्वस्थता आली. प्रचारक म्हणून आपण कसे टिकणार? किती काळ घर सोडून दूर राहू शकणार? अशा विचारांची डोक्यात गर्दी सुरू असताना खूप वर्षांपासून आपापल्या जिवलगांच्या तुटी पडलेले आणि तरीही आनंदात असलेले एकेक तरुण, वरिष्ठ प्रचारक तिथे भेटत गेले आणि माझी अस्वस्थता कधी संपली कळलंच नाही.

अनेक प्रचारकांची नाव ऐकून होतो, त्यातलेच एक जयंतराव, त्यांना प्रत्यक्ष भेटलो. पुढचा योगायोग असा की, माझी पहिलीच नियुक्ती दक्षिण गोव्यात केपे तालुका प्रचारक म्हणून झाली आणि जयंतराव गोमंतक विभाग प्रचारक होते. त्यामुळे बैठकीच्या शेवटी गोव्यात आधीपासून असलेले आणि नवीन नियुक्त झालेले अशा प्रचारकांची एक छोटी बैठक तिथेच झाली. परिचय,



*डावीकडून दुसरे सुरेंद्र तालखेडकर, तिसरे माझे बाबा, चौथे जयंतराव, सातवे स्व.मुकुंदराव कुमली, आमपाती, गारो हिल्स मेघालय*

गप्पाटप्पा झाल्या. डॉ. पंकज दिघे दक्षिण गोवा जिल्हा प्रचारक होते, ते आणि जयंतराव यांनी कुठे आणि कसे पोहोचा, वगैरे वगैरे सूचना दिल्या. दोघेही कमालीचे शांत आणि प्रसन्न असल्यामुळे नव्या जबाबदारीचा सगळा ताणतणाव निघून गेला.

पहिल्याच भेटीत जयंतराव इतके भावले की, कित्येक वर्षं मी त्यांना भेटत आलोय असं वाटायला लागलं. समोरच्याने कितीही रटाळ, निरुपयोगी, पाल्हाळ लावलं तरी ते शांतपणे, मनापासून ऐकून घ्यायचं; कुणी आगपाखड करत बोलत राहिला तरी त्याला पूर्ण ऐकून घ्यायचं आणि कोणतीही प्रतिक्रिया न देता त्याला शांत करायचं, असा त्यांचा स्वभाव होता. ते कुणावर चिडलेले, संतापून काही बोललेले किंवा त्यांच्या बोलण्यातून कधी कटुता आलेली कुणी कधी बघितली नाही.

गोव्यात एकच वर्ष झाल्यावर माझी २००१च्या डिचोली बैठकीत गारो हिल्स, मेघालयात बदली झाली आणि २००२ला मुकुंदराव, जयंतराव, माझे बाबा गारो हिल्सला आले. जयंतरावांनी केपे-कुडचड्याच्या अक्षरशः प्रत्येकाची मला खुशाली सांगितली आणि अनेकांनी माझ्यासाठी पाठवलेली पत्र, भेटवस्तू आठवणीने मला दिल्या, तेव्हा ते कोकण प्रांत प्रचारक होते, तरीही माझ्यासारख्या नव्या प्रचारकासाठी हे करणं, याचं मला आता फार नवल वाटतं.

पुढच्याच वर्षी २००३ साली माझे बाबा अपघातात गेले आणि गारो हिल्समध्ये मला बातमी कळून मी मुर्डीला घरी पोहोचायला पाच दिवस लागले, त्यावेळीही मी मुंबईत पोहोचून तिथून कोकणात जाईपर्यंत कुठेही अडचण होऊ नये, म्हणून त्यांनी अनेकांना आधीच कळवून ठेवलं होतं, हे ही माझ्या कायम स्मरणात राहील.

वराहमिहिराच्या दववृष्टी आणि पाऊस याच्या संबंधातल्या पर्जन्य अनुमानाच्या मॉडेलवर मी २०१४ ते २०१६ अशी सलग दोन वर्षं मी रोजची निरीक्षणं नोंदवली होती आणि ते जयंतरावांना समजल्यावर त्यांचा मला एक दिवस ई-मेल आला. यासंदर्भात त्यांनी मला विस्तृत रिसर्च पेपर तयार कर, तो कुठे प्रेझेंट करायचा ते मी नंतर सांगतो, असा सल्ला दिला होता. पण, २०१६ ला मी परत गुवाहाटीला राहायला गेल्यामुळे आणि तिथला पावसाचा पॅटर्न कोकणापेक्षा खूप वेगळा असल्यामुळे तो विषय कायमचा मागे पडला.

चमौलीच्या ढगफुटीनंतर झालेला भीषण संहार आणि त्यावरून होणार्‍या चर्चा यावरून "PenPenny" नावाच्या साईटवर 'Climate Change or China, What caused glacier burst in Chamoli?' असा एक लेख माझ्या वाचनात आला, तो मी जयंतरावांना ई-मेल केला. कारण, त्यांनी कधीही व्हॉट्सअ‍ॅप वापरलाच नाही. ई-मेल मिळताच मला त्यांचा फोन आला आणि आम्ही जवळजवळ पाऊणतास बोललो. आजपर्यंत चीनच्या 'Weaponization Of Weather Climate' या विषयावर खूप लोकांनी चीनबद्दल अनेक शंका, शक्यता वर्तवल्या आहेत. पण, जेव्हा जयंतरावांनी याबद्दल शंका व्यक्त केली ती बघता त्यात बरंच तथ्य असावं असं वाटतं. कारण, जयंतराव 'Conspiracy Theorist' कधीही नव्हते, तर शुद्ध वैज्ञानिक दृष्टी बाळगणारे होते आणि देशाच्या वैज्ञानिक जगतातल्या सर्वोच्च व्यक्तींचा त्यांच्याशी जीवंत संपर्क होता. त्यांच्या वैज्ञानिक संकल्पना पराकोटीच्या स्पष्ट होत्या. त्यामुळे कित्येक दिग्गज शास्त्रज्ञ जयंतरावांबद्दल मोठा आदर बाळगून होते. यामुळेच भारतातील टोकाचे वातावरण बदल, सततच्या मोठ्या नैसर्गिक आपत्ती आणि चीनची भूमिका याबद्दल भारतीय संशोधकांनी काहीतरी ठोस निष्कर्ष काढलेले असावेत, असा माझा समज होतो आहे.

### जयंतराव नावाचा एक 'जाजाबोर'

भूपेन हजारीकांचं एक सुंदर असमिया गाणं आहे 'मोई एटी जाजाबोर.' 'जाजाबोर' म्हणजे भटका! त्यात भूपेनदांनी स्वतःचं वर्णन एक 'भटका' असं केलंय. त्यात त्यांनी समाजाची कशी विविध रूपं बघितली, टोकाची गरिबी ते उच्चकोटीची श्रीमंती, विविध भौगिलिक प्रदेशातली सुंदर विविधता, सांस्कृतिक भिन्नतेतली अभिन्नता याचं सुंदर वर्णन केलंय. जयंतराव मला तसेच एक 'जाजाबोर' वाटले- सामान्य स्वयंसेवकाचं भावनिक संघकाम ते फॅक्टस, फिगर्स वर आधारित भारतीय वैज्ञानिक समुदाय अशा विशाल, व्यापक, टोकाच्या भिन्न क्षेत्रात सहजतेने वावरणारा आणि तरीही सगळ्यापासून अलिप्त तरीही भावनिक आणि आनंदी राहणारा जाजाबोर!

अशा जयंतरावांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## जगन्मित्र जयंतराव...

**(पान १ वरून)** तेथील अनेक कुटुंबांशी त्यांचे असेच संबंध होते. आज त्या सर्व कुटुंबांत आपल्या कुटुंबातील एक जीवश्चकंठश्च सदस्य गेल्याचे दु:ख होत असेल.

प्रेमाने बोलणे, तसा व्यवहार करणे व मोकळेपणे संवाद करणे ही त्यांची शैली होती. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या मनातील अनेक दु:ख, अडचणी, एखाद्या विषयीची कटुता इत्यादी सर्व संपत असत. कधीकधी परस्परात निर्माण होणारे मतभेददेखील त्यांच्या शैलीमुळे समाप्त होत असत.

त्यानंतर तत्कालीन महाराष्ट्र प्रांताचे तीन प्रांत झाले. जयंतराव कोकण प्रांत प्रचारक झाले. मी पश्चिम महाराष्ट्राचा झालो. त्यामुळे फक्त अखिल भारतीय बैठकीत आमची भेट होत असे.


त्यानंतर त्यांच्याकडे 'विज्ञान भारती'ची अखिल भारतीय संघटन मंत्री अशी जबाबदारी आली आणि त्यांचा झंझावाती प्रवास सुरू झाला. ते नेमके काय काम करतात, हे मला फार समजत नव्हते. संघाच्या अखिल भारतीय बैठकीत ते जे निवेदन करत असत, ते ऐकून देशातील आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या दिग्गज शास्त्रज्ञांना आपल्या कार्याला जोडण्याचे अद्भुत व आश्चर्यकारक काम त्यांनी केल्याचे पाहायला व ऐकायला मिळायचे. हे त्यांनी आपल्या मधुर वाणीने, नम्र व प्रेमळ स्वभावाने, व्यवहाराने व त्या क्षेत्रातील अध्ययनाने केले आहे. समर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे 'जगामाजी जगनमित्र। जिंव्हेपाशी असे सूत्र।' याचे प्रत्यक्ष उदाहरण जयंतराव यांनी प्रस्तुत केले. हे एवढे दिग्गज शास्त्रज्ञ, यांचे ज्ञान, अध्ययन व कार्य प्रचंड आहे. अशांनी त्यांच्या जीवनात हा असा 'जगन्मित्र' अन्य कोणी पाहिला असेल का, असा प्रश्न माझ्या मनात येतो.

जयंतरावांचे जीवन संयमित होते. आहारावर पूर्ण नियंत्रण व नियमित व्यायाम, यामुळे त्यांची प्रकृती अतिशय सुदृढ होती. यामुळे त्यांच्या शरीराला कोणत्याही आजाराचा स्पर्श झाला नाही. जर हा अपघात झाला नसता, तर ते आणखी किमान २० वर्षे तरी उत्कृष्ट कार्य करू शकले असते. जयंतरावांचे जीवन अखंड परिश्रमी होते. 'Saint in hurry' असे त्यांचे वर्णन करावे लागेल. संघाच्या एका गीतात म्हटल्याप्रमाणे 'कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती' हे त्यांनी प्रत्यक्ष साकार करून दाखविले.

त्यांची श्रेष्ठ गुणवत्ता, सात्त्विकता व समर्पण या गुणांमुळे परमेश्वरालासुद्धा ते हवेसे वाटले असणार आणि त्यांची निरामय व सुदृढ प्रकृती पाहता त्यांना लवकर मृत्यू येणे अशक्य आहे, यासाठी आपल्याजवळ त्यांना घेण्यासाठी बहुधा परमेश्वरानेच हा अपघात घडविला असेल, अशी शंका मनात येते. काहीही असो, वयाने माझ्यापेक्षा लहान असलेल्या, पण कर्तृत्वाने, गुणवत्तेने व समर्पण भावनेने माझ्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ असणार्‍या या लहान भावाला आज दु:खद अंत:करणाने व विनम्र भावनेने मी श्रद्धांजली अर्पण करतो.

**(लेखक रा. स्व. संघ अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य आहेत.)**

## जयंतराव सहस्रबुद्धे : आधुनिक विज्ञानऋषी!



**(पान १ वरून)** त्यानंतर 'विज्ञान भारती'चे अखिल भारतीय संघटन मंत्री म्हणून त्यांच्यावर जबाबदारी सोपविली गेली. गेल्या एक दशकाहून अधिक काळ ते 'विज्ञान भारती'चे कार्य सांभाळत होते. 'विज्ञान भारती'ला त्यांनी वेगळ्या उंचीवर पोहोचविले. 'ज्ञान संगम'सारखे अनेक अनोखे उपक्रम 'विज्ञान भारती'ने राबविले, त्यातून नवनवीन कार्यकर्ते संघटनेला लाभले. त्यातूनच भारतीय विज्ञानाला अधिक चालना देण्यासाठी अनेक शास्त्रज्ञ पुढे आले, तथा येत आहेत. यातून आगामी काळात भारतीय विज्ञानाचे आधुनिक युगातील योगदान नक्कीच वाढेल, असा मला विश्वास वाटतो.

आपण सर्वजण विज्ञान क्षेत्रातील अनेक ऋषींच्या योगदानाबद्दल नेहमीच ऐकत आलो आहोत, त्यापासून प्रेरणादेखील घेत असतो! जयंतराव सहस्रबुद्धे यांच्यासारख्या भारतीय विज्ञान जगताच्या संघटनेसाठी समर्पित व्यक्तींना देखील ऋषींच्या रूपात समाज बघत असतो व त्यांच्याकडून प्रेरणा घेत असतो. स्व. जयंतराव आज आपल्यात नाहीत, परंतु त्यांचे कार्य व समर्पण येणाऱ्या अनेक पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. एवढेच या लेखाच्या माध्यमातून मी सांगू इच्छितो!

**(लेखक महाराष्ट्र राज्याचे पर्यटन, महिला व बालविकास, कौशल्य व उद्योजगता मंत्री आहेत.)**

## माझी गुरूमाऊली...

जयंतराव आज गेले, आपल्यातून गेले... हे वाक्यच इतक्या वेदना देणारं आहे. पण, त्यांनी सुमारे दहा महिने जी झुंज दिली, तीही तितकीच क्लेशकारक होती. केवळ त्याला आशेची सावली होती इतकच! अनेक कार्यकर्ते, डॉक्टर्स आणि संघ व्यवस्थापन यांनी शर्थीचे प्रयत्न केले. खरं तर ज्यांना इतका मोठा काळ 'जयंतराव बरे होण्यासाठी प्रयत्न करणे' हे एकच ध्येय समोर होते. त्यांना आज ही पोकळी खूपच जाणवत असेल. आता केवळ एकमेकांचं सांत्वन करणं इतकच आपल्या हातात...

जयंतराव हे व्यक्तिमत्वच वेगळं होतं... आज हजारो लोकांना आपल्याच घरातील कुणी गेल्यावर येते तशी अस्वस्थता आली आहे. एक हव हवसं वाटणारं जवळचं माणूस न भेटता खूप दूर निघून गेल्याची हुरहुर हजारो मनांत आहे...



कुशाग्र बुद्धी, अनेक विषयांचे सखोल ज्ञान, मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीनही भाषांवर असलेलं प्रभुत्व, शांत चर्या, तितकाच मृदु आवाज, त्यांच्या डोळ्यातलं तेज, कमालीचा साधेपणा आणि सर्वांना आपुलकीने जोडण्याची अद्भुत संघटन कुशलता... तरीही अजून खूप काही होते जयंतराव...

ते प्रत्येकाच्या घरातली एक जवळची व्यक्ती होऊन जायचे...अंतर्बाह्य निर्मल...माझी गुरूमाऊली... आज त्यांच्यासमोर नतमस्तक होताना खूप काही आठवतय आणि कंठ दाटून येतो...

मी पूर्वांचलला जायला इच्छुक आहे, हे समजल्यावर ते माझ्या घरी आले. आमच्याकडे संघ माहीत नव्हता आणि माझ्या पूर्वांचलला जाण्याच्या हट्टाला फारशी अनुकूलता नव्हती. पण, प्रांत-

**सुचिता भागवत**

प्रचारक घरी आले आणि माझ्या घरी जणू संघ पोहोचला. इतकं छान संभाषण झालं. आपल्या लाघवी वाणीने आपलंस करून जयंतराव माझ्या कामाची मूकसमंती मला मिळवून देऊन गेले...

२००५ ला मार्चमध्ये फोन आला, ''सुचिता, तुला नागालॅण्डला जायचं होतं. पण, नागालॅण्डच तुझ्याकडे येतोय. चिपळूणला वसतिगृह सुरू होतय. १३ मुली येताहेत. तू तिथेच राहून व्यवस्थापन बघ आणि त्यांची भाषा शिक. म्हणजे तिकडे जाताना तयारीने जाता येईल.''

त्यांचा शब्द म्हणजे शिरसावंद्य...

मी घरी सांगून लगेच जूनमध्ये वसतिगृहात पोहोचले. कामाचा अनुभव नाही आणि पाच वर्षांच्या चीचीपासून १३ वर्षांच्या हिरासमला पाहून प्रश्न पडला. मी नक्की काय करायचं. माझं काम काय? मी घरी सर्वांत लहान. वय केवळ २२ वर्षे आणि अपरिचित, अनाकलनीय भाषा बोलणाऱ्या त्या मुली... मी थोडं निराश होऊन जयंतरावांना फोन केला. ''मी नक्की इथे काय काम करायचंय?'' शांतपणे समोरून एका वाक्यात आलेले उत्तर आजही माझ्या मनात कोरलेलं आहे. ''तुला त्या १३ जणांची आई होऊन राहायचं आहे, बाकी काही नाही...''

माझ्यातली मातृत्वाची भावना त्या तीन वर्षांनी मला थोडं मोठं करून गेली. एकदा मी जयंतरावांना म्हंटलं की, ''माझ्या वैयक्तिक खर्चासाठी मला थोडं मानधन मिळावं.'' त्यांनी मला प्रश्न विचारून माझं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं आणि म्हणाले, ''हे काम तू भारतमातेची सेवा म्हणून करतेस ना, मग आपल्या आईच्या कामाचे आपण पैसे घेतो का? तुला जे आवश्यक खर्च असतील, ते सगळे आपण करू'' आणि खरोखरच माझा द्वितीय आणि तृतीय वर्षांचा खर्च व्यवस्थेतून झाला.

सहज एखादं वाक्य पण ते जेव्हा जयंतरावांच्या मुखाने यायचं तेव्हा त्याला त्यांच्या हृदयाच्या शुद्धतेचा, साधनेचा आणि कुशाग्र बुद्धीचा एक अनोखा सुगंध असायचा. पहिलंच काम, अनेक अडचणी यायच्या, पूर्वांचलची पुरेशी कल्पना नव्हती. मग हक्काने जयंतरावांना फोन करायचे. त्यांची काही वाक्य ही प्रकाशवाटेसारखी आहेत.

ते म्हणायचे, ''सामाजिक काम हे एकतर्फी प्रेमासारखे असतं. समोरचा कसाही वागू दे, आपण चांगलं करत राहायचं.''

मला नागालॅण्डशी जोडणारे जयंतराव. कधी काहीच काम होत नाही, मनासारखे निकाल येत नाहीत म्हणून निराशेने त्यांच्याशी बोलायचे. पण, ते आमच्या लहानसहान गोष्टींनी कधीही वैतागायचे नाहीत. एकदा त्यांनी मला समजावलं होतं, ''आपण पाणी १०० डिग्रीला उकळलं असं म्हणतो. पण, खरं असतं का ते? अगं ते पहिल्या डिग्रीलाच उकळायला सुरुवात होते. तसं हे काम... याचे दृष्परिणाम दिसायला आपल्याला वाट पाहावी लागेल. आपण काम करत राहायचं.. शांतपणे...''

''तू एकदा चार दिवस घरी जाऊन ये, म्हणजे शांतपणे विचार करशील आणि पुन्हा नव्याने कामाला लागशील.''

मग ते आवर्जून फोन करायचे. माझी, पुष्पाच्या घरच्यांची चौकशी करायचे. जणू आपल्या कुटुंबातली मोठी पण जवळची व्यक्ती वाटायचे. तेव्हा, वसतिगृह माधवबाग-संघ कार्यालयात होतं. आले की मुलींची भेट घ्यायचे. व्यक्तिगत प्रत्येकीची विचारपूस करायचे. ते आले की, मुली पण आमच्यासारख्याच खूश असायच्या. तिकडच्या प्रवासाचा वृत्तांत सांगायचे... त्यांची भेट नवीन उमेद देऊन जायची.

मी नागालॅण्डला जाण्याचा तगादा लावला. तेव्हा ''तू आधी शिक्षण पूर्ण कर मग आपण तूला पूर्वांचलला पाठवू,'' अशी माझी समजूत काढून मला मार्गदर्शन घेण्यासाठी मृदुलाताई देवस्थळी यांचं नाव त्यांनी सुचवलं आणि तिथूनच मी मानसशास्त्राकडे वळले. 'शिक्षण पूर्ण कर' हा जयंतरावांचा आदेश होता. म्हणून घरी आल्यावर 'एमएसडब्ल्यू' केलं आणि मगच २०१४ ला एक वर्षांसाठी पूर्णवेळ गेला. ''आधी तिकडे जा. सगळे प्रकल्प बघ आणि तूच सांग कुठे जायचं...' इतका मोकळा विचार आणि तितकाच विश्वास माझ्यासारख्या इवल्याशा कार्यकर्ता होऊ पाहणाऱ्या वर दाखवणारे जयंतराव...

या साऱ्यात माझ्या 'गुरू माऊली'चा खूप मोठा वाटा होता. त्यांनी मला पूर्वांचल कसा बघायचा, ते नकळत शिकवलं. पूर्वांचलवर प्रेम करायला शिकवलं आणि संघांची ओळखसुद्धा त्यांच्या वागण्या-बोलण्यातून प्रथम झाली.

त्यानंतर मी प्रत्येक गुरूपौर्णिमेला त्यांना फोन करायची.. मध्ये त्यांच्या व्यस्ततेमुळे संपर्क झाला नाही.

पण, काही माणसं ही केवळ माणसं नसतात; ती तत्व होऊन आपल्या आयुष्यात भरून राहतात. जयंतरावही तसेच...

मन शेवटचा नमस्कार करायला तयार होत नाही...

पार्थिव गेले तरी ते माझ्यासारख्या त्यांच्याशी अगदी अल्प संपर्क आलेल्या हजारो लोकांच्या मनात नेहमीच राहतील...

# जयंत स्मृती

## एक सद्गुण तारा निखळला...!

**कोणताही विज्ञान किंवा अन्यदेखील विषय आणि त्याची सविस्तर माहिती जयंतरावांकडे नाही, असे कधीच अनुभवायला मिळाले नाही. इतक्या सुसूत्रतेत ते माहिती सांगायचे की, अगदी मंत्रमुग्ध व्हायला व्हायचं. मग स्वामी विवेकानंदांचे संगीतातले सखोल ज्ञान असेल की, 'टेस्ला'च्या तंत्रज्ञानाची माहिती असेल.... इतका परिपूर्ण माहितीचा साठा एकावेळी कसं काय ते डोक्यात साठवून ठेवतात, याचं कौतुक असायचं.**

**दयानंद सावंत**

वर्ष १९९२ किंवा ९३ असेल, गोव्यात जयंतरावांनाच भेटण्यासाठी प्रवास होता. विषय स्वाभाविक 'ईशान्य भारत!' पणजीतील संघ कार्यालयात पहिल्यांदाच भेट होत होती. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास, गेल्या गेल्या अगोदर हातपाय धुवायला सांगून, सोबत जेवणाच्या पंगतीला बसवले. गोवा विभाग प्रचारक म्हणून जबाबदारी असल्याचं कळलं. ओळखपाळख झाल्यावर, ज्या उद्देशाने भेट ठरली होती ते म्हणजे, ईशान्य भारतातील पर्यटन विषयक काही कल्पना घेऊन, पर्यटकांचे आवागमन करण्यासाठी कशा व्यवस्था निर्माण करावयास हव्यात, यावर सविस्तर चर्चा झाली. वामकुक्षी झाल्यावर लगेच दुचाकीवरून राजू सुकेरकर, रघुनंदन सामंत, सलील सावकार इत्यादींबरोबर भेट-परिचय करून देण्यासाठी स्वतः जयंतराव आले होते. हळुवार आवाजातील उमटणाऱ्या प्रत्येक शब्दाच्या आपुलकीतून, मतितार्थासाहित त्यांच्या व्यक्तिमत्वाची प्रतिमा मनावर सहजपणे कधी कोरली गेली कळलंच नाही.

संघशिक्षा वर्गात आवर्तन ध्यानाची तासिका घेताना अजून एका वेगळ्या जयंतजींचा परिचय झाला. शवासनाच्या स्थितीत कानावर पडणारा प्रत्येक शब्द अंतरात्म्यात भिनभिनत होता. ते सूचना देत होते त्याप्रमाणे मेंदूसहित शरीराचा प्रत्येक अवयव आज्ञा स्वीकारून शांत निश्चल आणि ताजेतवाना होत होता. शब्दांवरील प्रभुत्व आणि त्याचे प्रसारण यावर जयंतजींची अद्भुत पकड असल्याची साक्षात अनुभूती मिळाली.

त्यानंतर कालांतराने कोकण प्रांताची प्रचारक म्हणून जयंतरावांना जबाबदारी मिळाल्यावर बऱ्याच वेळा भेटीगाठी होऊ लागल्या. हळुवार आवाजातील तोच गोडवा कालपर्यंत तसाच होता. 'मुंबई आयआयटी'मधून 'बी टेक' पदवी संपादन केल्यावर संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते, प्रचारक म्हणून कार्याला सुरुवात केल्याचं समजलं. प्रत्येक विषयातील तंत्रशुद्ध अभ्यास आणि ज्ञान त्यांच्याशी होणाऱ्या गप्पांमधून अगदी सर्वसामान्य व्यक्तीलासुद्धा सहज उमजणारे होते. तेव्हा सातत्याने वाटायचं की, संघाने या व्यक्तीने मिळविलेल्या शिक्षणाच्या दृष्टीने जबाबदारी देण्याची नितांत गरज आहे. अनेक जणांकडे हा विषय त्यावेळेस स्पष्टपणे बोलूनही दाखवला होता.

जयंतरावांशी १९९६ ते २००६ दरम्यानच्या काळात अचानक संपर्क तुटला होता. पण, ते स्मरणातून जाणे केवळ अशक्य होते. एका शैक्षणिक संस्थेत सक्रिय असताना, विद्यार्थ्यांच्या नवनवीन कल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने काही उपक्रम राबविताना जयंतजींची स्वाभाविक आठवण व्हायची. जेव्हा त्यांच्याकडे 'विज्ञान भारती' या संघटनेची 'अखिल भारतीय संघटन मंत्री' म्हणून जबाबदारी आल्याचे कळलं, तेव्हा अत्यानंदच झाला होता. २०१३ रोजी 'नवनिर्मित डिजिटल मायक्रोस्कोप' काही शाळांना वाटपाच्या निमित्ताने 'विज्ञान विषयक स्कोप' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदस्यांशी चर्चा करताना, स्वाभाविकपणे जयंत सहस्रबुद्धे यांना प्रमुख वक्ते म्हणून बोलवायचं का, असा शब्द बाहेर पडताच लागलीच भावे म्हणाले, ''अहो, मी त्यांना अगदी जवळून ओळखतो, आमच्या गिरगावातलेच ते.'' त्यांच्याशी भेट घेऊन सविस्तर विषय बोलताना, बाल्यावस्थेपासून विद्यार्थ्यांच्या तनामनावर विज्ञान विषय हसतखेळत कोरण्यासाठी संशोधन प्रोत्साहन प्रकल्पाची कल्पना मांडली. ती ऐकताच त्यांनी अशी काही प्रेरणा आमच्या मनात भरली की, आम्ही जोमाने त्या पूर्ततेच्या कामात विविध लोकांना जोडायला सुरुवात केली. त्या कार्यक्रमातील त्यांच्या वक्तृत्वाने जवळपास ६० शाळांतील आलेल्या सर्व शिक्षकांसहित उपस्थित सर्वजण भारावून गेले होते. त्यातील अनेक शिक्षकांना संघ, 'विज्ञान भारती' काय ते माहीत नव्हते. पण, जयंतरावांच्या त्या वक्तृत्वाने संघाचा विज्ञान विषयीचा दृष्टिकोन सहजरित्या उमगला होता.

काही दिवसांनी जयंतरावांनी आम्हाला एक 'विज्ञान भारती'च्या सर्वसाधारण सभेला बोलावले. सभा संपल्यावर आमच्याकडे दोन अर्ज देत, हे पूर्ण भरून द्या आणि 'विज्ञान भारती'चे आजीव सदस्य व्हा, असे जणू आदेशच दिले. त्यांच्या शब्दाच्या पुढे बोलणे ते कसले!

कालांतराने 'विज्ञान भारती' आयोजित 'स्मार्ट सिटी' कार्यक्रमाच्या आयोजनात आणि कोकण प्रांताच्या कार्यकारिणीत सहकार्यवाह पदाची जबाबदारी दिली गेली. जयंतजींना म्हटलं, ''अहो, मी साधा विज्ञानाचा विद्यार्थीसुद्धा नाही. माझ्याकडे का ही जबाबदारी दिली आहे?'' त्यावर त्यांचे उत्तर होते, ''संघात सांगितलेलं करायचं असतं, त्यावर चर्चा नाही करायची.'' कालांतराने व्यक्तिगत अडचणींमुळे जबाबदारी पार न पाडल्याची खंत त्यांच्याकडे बोलल्यावर ते म्हणाले, ''जस्ट वेट अ‍ॅण्ड वॉच.''!

जयंतराव जेव्हा जेव्हा 'पितृछाया' कार्यालयात येत, तेव्हा आवर्जून त्यांचा फोन असायचा. बेकरीतील काही ताजे पदार्थ त्यांना खायला आवडतात, हे जाणले होते. तेथील चौकाच्या शेजारील असलेल्या एका हॉटेलमध्ये अनेक वेळा जाणं झालं. त्यांच्याशी सुरू झालेल्या गप्पा कधीही संपू नयेत, असंच वाटायचं. कोणताही विज्ञान किंवा अन्यदेखील विषय आणि त्याची सविस्तर माहिती त्यांच्याकडे नाही, असे कधीच अनुभवायला मिळाले नाही. इतक्या सुसूत्रतेत ते माहिती सांगायचे की, अगदी मंत्रमुग्ध व्हायला व्हायचं. मग स्वामी विवेकानंदांचे संगीतातले सखोल ज्ञान असेल की, 'टेस्ला'च्या तंत्रज्ञानाची माहिती असेल.... इतका परिपूर्ण माहितीचा साठा एकावेळी कसं काय ते डोक्यात साठवून ठेवतात, याचं कौतुक असायचं. बिनधास्त विचारलंसुद्धा, त्यावेळी त्यांनी आवर्तन ध्यानाची आठवण करून दिली. म्हणाले, ''आपल्या मेंदूला एका विशिष्ट प्रकारे प्रशिक्षित केलं की, कोणतीही गोष्ट लक्षात ठेवणे फार काही कठीण नसतं. त्या एकाग्रतेच्या माध्यमातून अभ्यास आणि सराव केल्यावर कालांतराने आपसूक होऊन जातं.'' जयंतरावांच्या अजून कितीतरी सहज आठवणी कळत-नकळत मनात साठविल्या गेल्यात. विशेषतः त्यांच्या स्वभावाने कितीतरी माणसं लोहचुंबकासारखी जोडली गेली.
त्यांना राग येत नव्हता असं नाही बरं का!

त्यांनी एकदा अभ्यासपूर्ण सांगितलेल्या कामात जेव्हा कोणी स्वतःच्या मनाने बदल केला, तर त्यांचे रौद्ररूपसुद्धा पाहायला मिळाले आहे. एका बातमीच्या बाबतीत त्यांनी सूचना दिल्या होत्या की, कशाप्रकारे त्या एका कार्यक्रमाची माहिती छापून येणे गरजेचे आहे. त्यांचा तसाच्या तसा निरोप मी आमच्या पत्रकार मित्रापर्यंत पोहोचवला. पण, तो पत्रकार मित्रसुद्धा विज्ञान क्षेत्रातील असल्याने, त्याने त्या बातमीत काही बदल स्वतःच्या मनाने केले आणि मला जयंतरावांचा तो राग अनुभवण्याची संधी मिळाली होती, अशा संधीसुद्धा भाग्यवंतांनाच मिळतात! नंतर त्यांनी शांतपणे समजावूनसुद्धा सांगितले. तेव्हा, वस्तुस्थिती सांगितल्यावर त्यांनी मला समजून घेतले.

जयंतरावांची शाबासकी मिळालेली एक घटना आठवते. चार एक वर्षांपूर्वी नागपूरला 'विज्ञान भारती'चे अखिल भारतीय अधिवेशन झाले होते. आम्ही मुंबईचे काही कार्यकर्ते सहभागी झालो होतो. मुंबईकरांनी एक छोटासा पुस्तकांचा स्टॉल लावला होता. त्यात आकर्षणाचा बिंदू ठरलेले पुस्तक "Ancient Science of India' हातोहात विक्री झाले. दुसऱ्या दिवशी विक्रीस एकही पुस्तक उरले नव्हते. काही वरिष्ठ मंडळी म्हणाली की, ''तुम्हाला आधीच सांगितले होते की, जास्तीची पुस्तके घ्या, पाहिलं न आत्ता!'' मागणी आहे, पण पुस्तकं नाहीत, अशी स्थिती होती. पालेकरांच्या मी कानात सांगितलं, ''जर उद्या पुस्तकं हवी असतील, तर सकाळी साधारण १० वाजेपर्यंत नागपूरला पोहोचतील.'' पालेकरांनी विचारलं, ''कसं काय? विमानाने पण इतक्या लवकर शक्य नाही.'' मी म्हणालो, ''तुम्हाला काय करायचंय ते, पोहोचली म्हणजे झालं नं. तुम्ही फक्त 'पितृछाया' मधून कोणाला तरी दादर स्थानकावर पोहोचवयाला सांगा, बाकी मी पाहतो.'' त्यांना साधारण कल्पना सांगितली, त्यांनी विश्वास ठेवला आणि तशी व्यवस्था केली. दरम्यान, रात्री अविनाशला फोन करून माझी कल्पना सांगितली होती. त्याने त्याचे तंतोतंत पालन केले. रात्री छत्रपती शिवाजी टर्मिनसहून 'दूरांतो एक्सप्रेस' सुटते. त्या गाडीच्या पेंट्रीमधील अमुक एका व्यक्तीला तो पुस्तकांचा गठ्ठा दे, आणि त्यांना माझा मोबाईल क्रमांक पण दे. 'दूरांतो' १२ तासांत कोठेही न थांबता नागपूरला पोहोचते माहीत होतं, आम्ही त्याच गाडीने आलो होतो. ओळख काढून पेंट्रीमधील एका व्यक्तीशी बोलणं केलं, त्याच व्यक्तीकडे अविनाशला पुस्तक द्यायला सांगितली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही दोघे नागपूर रेल्वे स्टेशनला पोहोचलो आणि पुस्तकांचा गठ्ठा ताब्यात घेतला. सकाळी स्टॉल लागण्याच्या वेळेत मुबलक पुस्तकं उपलब्ध होती. सर्वांना आनंद झाला. जयंतरावांना ही घटना कळल्यावर, त्यांच्या भुवया उंचावून स्मितहास्य देण्याच्या स्टाईल सोबत, पाठीवर कौतुकाची थाप मारत म्हणाले, ''कल्पना, इच्छाशक्ती आणि उपलब्ध साधनांची जोड यांची समीकरणं जुळविल्यास असाधारण गोष्टीदेखील सहज साध्य करता येतात, असे अनेक खछछ्जतअढजठड सर्वसामान्यांत सुद्धा असतात.''

पुढे म्हणाले...

***अमंत् अक्षरं नास्ति:***
***नास्ति मुलं अनौषधम्।***
***अयोग्य: पुरुषो नास्ति:***
***योजकस्त्र दुर्लभ:।***

जयंतरावांनी अनेकांना असे प्रोत्साहन देता देता, सहज कामात सामावून घेतले होते.

काही वेळा महत्त्वाच्या कामानिमित्त, हातातली कमी महत्त्वाची कामं सोडून जाण्याचा प्रसंग आला. जयंतराव म्हणाले, ''जेथे असशील तेथून तातडीने निघून ये.'' प्रतिप्रश्न न करता गेलो आणि जे सांगितले ते काम पूर्ण केले. पण, दरम्यानच्या एका मीटिंगमध्ये जाण्यास उशीर होईल, असे एक सहकाऱ्याला सांगितले होते. पण दुसऱ्या सहकाऱ्याने मुद्दामहून घातलेला गोंधळ आणि त्यामुळे अस्वस्थ झालेले मन जयंतजींकडे मोकळे करताना ते म्हणाले, ''हे बघ, समाज आणि संघ हे काही वेगळे नाही. समाजातील व्यक्तिमत्व ही संघातसुद्धा आहेतच. त्यामुळे अशांकडे दुर्लक्ष करण्याची कला आपण अवगत केली पाहिजे. त्यांना समजावणे किंवा बदलणे हे कदापि आपल्या हातात नाही, म्हणून उगाच अस्वस्थ होण्यापेक्षा अशांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केल्यास त्रास होत नाही.'' मी नि:शब्द होतो. दुर्लक्ष कला कशी शिकायची त्याकडे मनाला समजावत होतो.

काही महिन्यांपूर्वी जेव्हा त्यांच्या गंभीर अपघाताची बातमी कानावर आली आणि त्या अपघाताची गांभीर्यता विस्तृत ऐकल्यावर मन राहून राहून विषण्णं व्हायचं. कधी एकदा पुन्हा त्या दादरच्या बेकरीत जयंतरावांसोबत जाण्यास आसुसलं होतं.

घरी आल्यावर तर अगदी जमिनीवर बसून घट्ट बालमित्रासारखे सोबत जेवणारे जयंतराव...

आता तुम्ही कोणात, कधी, कोठे दिसाल!

❖❖

## जयंतसारखा विद्यार्थी मिळाला हे माझे भाग्य!

**जयंत सहस्रबुद्धे... एक अतिशय सौम्य, प्रसन्न व्यक्तिमत्व. त्याचे चमकदार डोळे त्याच्या सर्जनशील बुद्धिमत्तेची साक्ष द्यायचे. जाणवायचे की हे काही साधसुधं रसायन नाही.**

**डॉ. अनला पंडित**
**डॉ. अनिरुद्ध पंडित**

जयंत माझा 'वाटूमल इन्स्टिट्यूट'मधला १९८६चा विद्यार्थी. तसे म्हंटले, तर माझी ही पहिलीच नोकरी आणि त्यातही नवीन आलेली पहिलीच बॅच होती. मलाही सर्व नवीन होते. विद्यार्थी फक्त चार-पाच वर्षांनी लहान. पण, त्यामुळे 'बॉण्डिंग' मात्र छान झाले. प्रत्येक वर्षी त्यांना एखादा विषय शिकवायचे. त्यामुळे तीन वर्षांत बराच संपर्क वाढला होता. नवीन असल्याने सगळ्या मुलांची नावे तोंडपाठ असायची. तो मला एक नम्र विद्यार्थी म्हणूनच आठवायचा. शिक्षकाला मान तेव्हाच मिळतो, जेव्हा विद्यार्थी त्याला मान्य करतात. मी त्याबाबतीत भाग्यवान होते की, मला जयंतसारखा विद्यार्थी मिळाला. अर्थात, त्यानंतरही असे खूप विद्यार्थी मिळाले.

त्यानंतर जवळपास नऊ-दहा वर्षांनी तो पुन्हा माझ्या घराजवळ, रूपारेल कॉलेजजवळ भेटला. नमस्कार करत म्हणाला, ''ओळखलं का?'' प्रसन्न चेहरा ओळखीचा वाटत होता. पण, नाव काही पटकन आठवेना. मग तोच स्मितहास्य करीत म्हणाला, ''मी जयंत सहस्रबुद्धे. आता आम्ही इथे येत-जात राहू. त्याचे कारण आमच्या सोसायटीमध्ये 'एबीवीपी'ने एक फ्लॅट घेतला होता.'' त्यानंतर बऱ्याच वेळा तो भेटत राहायचा. त्याकाळी तो विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांवर चर्चा करीत असे. नंतर 'विज्ञान भारती'चे काम सुरू केल्यानंतर त्याने पुरातन भारतीय विज्ञानाच्या प्रसारणाचे आणि प्रचाराचे कार्यक्षेत्र निवडले. त्याने प्राचीन भारतातील विज्ञान, गणित, स्थापत्यशास्त्र, खगोलशास्त्र, प्राचीन मंदिरे इत्यादींबद्दलची खूप माहिती गोळा करून आत्मसात केली होती आणि त्यानिमित्ताने अनेक लोकांशी त्याचे स्नेहाचे संबंध जुळत गेले. लोकसंग्रह त्याच्या शांत स्वभावामुळे आणखीनच वाढत गेला. तो भेटला की, अशा गोष्टी ऐकायला खूप छान वाटायचे आणि अनेकवेळा त्या विषयांवर चर्चा व्हायची. त्याचा सखोल अभ्यास आणि त्याच्याशी निगडित मनुष्य संग्रह याबद्दल मला नेहमीच कौतुक वाटायचे. खूप नवीन माहिती मिळायची. 'विज्ञान भारती'च्या एकेक पायऱ्या चढत तो राष्ट्रीय पातळीवर संपूर्ण जबाबदारी पेलू लागला आणि हळूहळू 'जयंत'चा 'जयंतराव' किंवा 'सहस्रबुद्धेजी' झाला. त्याने माझ्याशी बोलताना हे कधीच जाणवू दिले नाही, म्हणून माझ्यासाठी कायम तो 'जयंत' राहिला.

माझ्याकडे तो शेवटचा जून २०२० मध्ये होणाऱ्या विज्ञान परिषदेच्या मीटिंगची माहिती द्यायला २०१९च्या मध्यात आला होता. 'साधेपणा' हा त्याच्या हाडातच होता. त्या दिवशी आला तेव्हा जेवणाची वेळ होती म्हणून विचारले की, ''जेवतोस का?'' तर अगदी सहज 'हो' म्हणाला. म्हटलं उपवासाचे आहे. चालेल म्हणाला आणि अत्यंत प्रेमाने त्याने सर्व पदार्थ खाल्ले. त्याचे अनेक वेळा आमच्या घरी येणे होत होते. कारण, अनिरुद्ध (माझे पती) सुद्धा विज्ञान आणि शिकवणे या दोन्ही क्षेत्रात असल्यामुळे त्यांच्याही चर्चा चालायच्या. त्यांच्या मते, इतरांसारखे नुसतं जुन्यात रममाण होऊन नव्या तंत्रज्ञानावर, ते वापरत असताना त्यावर तो टीका कधीच करायचा नाही. जुनं ज्ञान आणि त्याची नवीन तंत्रज्ञानाबरोबर सांगड कशी घालता येईल, असा त्याचा विचार असायचा. जयंतच स्पष्ट मत होतं की, ही सांगडच भारताच्या जुन्या ज्ञानाचं महत्त्व जगाला पटवून देईल.

'एआयसीटीई'ने 'Indian knowledge system' (जून २०२०) वर ऑनलाईन कार्यशाळा आयोजित केली होती. रजिस्टर करूनही लिंक मिळाली नाही. जयंताला कळवल्यावर पाच मिनिटांत त्याची लिंक पाठवली (तो ऑर्गनायझेशनमध्ये होता) त्यानंतर प्रत्येक सेशनची लिंक मला मिळायला लागली आणि मी सगळी सेशन्स 'अटेंड' करू शकले. इतक्या सोप्या पद्धतीने माझा प्रश्न त्याने सोडवला.

जशा भेटी वाढल्या तसे त्याचे अनेक गुण मनाला भुरळ पाडू लागले. त्याच्या अनेक गुणांपैकी मला सर्वांत भावलेला गुण म्हणजे, सखोल अभ्यास करायची वृत्ती, समतोल वागणे, कठीण परिस्थितीत पण हसतमुखाने समस्येचे निराकरण करणे, पटकन मदत करणे, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मी फार महान कार्य करत आहे असा 'ग' नाही. यादी खूप मोठी होत आहेच, पण... एवढे बहुआयामी व्यक्तिमत्व असल्यामुळे खूप आवडते गुण निवडायला कठीणच होते.

त्याच्या जाण्याने अनेकांच्या जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. परंतु, सर्वांत मोठे नुकसान होणार आहे ते प्राचीन भारतातील वैज्ञानिक ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाच्या आणि प्रसाराच्या कार्याचे. पण, जयंतने ही पद्धत आता बऱ्यापैकी मान्यप्रत करून ठेवली आहे आणि त्यामुळे त्याने प्रचलित केलेली पद्धत, त्याने सुरू केलेलं काम निश्चित पुढे नेईल, याची मला खात्री आहे.

दहा महिने नियतीशी झगडा देऊन शेवटी दि. २ जून रोजी त्याला सद्गती प्राप्त झाली. ईश्वर त्याच्या आत्म्याला शांती देवो. त्याचा पुढील प्रवास सुखरूप होवो, ही प्रार्थना

❖❖



# जयंत स्मृती



# ...अमिट बलाच्या आधारावर लाख झुंजवू रणे!

माझा जयंतरावांचा पहिला परिचय १९८९ मध्ये ठाणे येथे झालेल्या प्रथम वर्षाच्या वर्गात झाला. जयंतराव माझे गणशिक्षक होते, पण पुढेही तेच मार्गदर्शक राहणार आहेत, हे त्यावेळी माहिती नव्हते. वर्ग सुरू झाल्यानंतर सुमारे आठ-दहा दिवसांनंतर अचानक एकेदिवशी ते वर्गात दिसले नाहीत. नंतर कळले की, त्यांचा पदव्युत्तर अखेरच्या वर्षाचा (बीएस्सी टेक) एक पेपर काही कारणास्तव पुढे ढकलला होता. तो पेपर देण्यासाठी ते वर्गातून बाहेर गेले होते. वर्गाच्या धबडग्यात त्यांनी अभ्यास कधी केला कोण जाणे? विशेषतः या वर्गात सुमारे ५७५ उपस्थिती होती आणि डॉ.

**डॉ. पंकज दिघे**

हेडगेवार जन्मशताब्दी वर्षामुळे या वर्गात फक्त व्यवसायी/विद्यार्थी शिक्षक होते. प्रचारक जवळपास नव्हतेच. असे असूनही त्यांनी त्या विषयात प्रावीण्य मिळवले. त्यांच्या बुद्धिमत्तेची ही मला झालेली पहिली ओळख होती. वर्गामध्ये त्यांनी शिकवलेल्या 'आज श्रद्धासुमन अर्पित......युगपुरुष शत शत नमन' तसेच 'हिंदुत्व विश्वमंत्र देऊ नव्या युगाला' या गीतांवरून त्यांचा सुरेल आवाज आणि संगीताचा अभ्यास लक्षात येत होता. या वर्गानंतर मात्र जयंतरावांच्या आवाजात गीत ऐकण्याची संधी मिळाली नाही आणि यापुढे कधीच मिळणार नाही.

नंतर १९९४ मध्ये झालेल्या अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयातील स्वयंसेवकांच्या

> **एका दुर्दैवी अपघातात जयंतराव जबर जखमी झाले, तरीही काळाशी लढाई सुरू ठेवली. 'कालगतीहून बलवत्तर ही पौरूषशाली मने, अमिट बलाच्या आधारावर लाख झुंजवू रणे' ही गीतपंक्ती जणू त्यांच्यासाठीच लिहिली असावी, असे वाटत असतानाच अखेर काळाचा विजय झाला.**

प्रथम द्वितीय वर्गात ते मुख्यशिक्षक होते. या वर्गात खूप चांगली शैक्षणिक गुणवत्ता असलेले शिक्षक होते. या वर्गातून अनेक जण प्रचारक म्हणून बाहेर पडले.

यानंतर जयंतराव भेटले ते एकदम १९९७ मध्ये प्रचारक बैठकीतच! माझी नियुक्ती दक्षिण गोवा जिल्हा प्रचारक म्हणून



डॉ. पंकज दिघे आणि जयंतराव सहस्रबुद्धे

१९९८ मध्ये झाली. त्याआधी तीन-चार वर्षे जयंतराव गोवा विभाग प्रचारक म्हणून होते. मी गोव्यात पोहोचल्यावर थोड्या दिवसांनी मडगावला आमची भेट झाली. त्यांनी विचारले, ''सगळ्यांची मैत्री झाली का?'' त्यांना जणू असे सुचवायचे होते की, प्रचारक म्हणून यशस्वी व्हायचे असेल, तर कार्यकर्त्यांशी लवकरात लवकर मैत्री करणे आवश्यक आहे. त्यांना एखादे काम कसे करायचे, असे विचारले असता ते फक्त मंद स्मित करत. ''तुझे काम तूच कर, चुकले तरी चालेल,'' असे त्यांचे म्हणणे असे. त्यामुळे कार्यकर्ता स्वतःहून विचार करून कामाला लागे. बैठकीसंदर्भात ते म्हणत की, ''बैठकीसाठी कोणी आले नाही तरी कार्यकर्त्याने एकट्याची बैठक करणे आवश्यक आहे.''

एखादा कार्यक्रम झाल्यानंतर ते कार्यकर्त्यांना विचारत असत, ''कार्यक्रम कसा झाला?'' कोणी 'चांगला झाला' असे सांगितले, तर ते म्हणत, ''चांगला झाला, पण सफल झाला का? कारण, संघाचा कार्यक्रम फक्त चांगला होऊन उपयोग नाही, तर त्याचा उद्देश साध्य झाला पाहिजे.''

जयंतरावांचे हस्ताक्षर खूपच सुंदर होते. त्यांच्या हस्ताक्षराकडे बघून मला माझे हस्ताक्षर सुधारण्याची प्रेरणा मिळाली. प्रचारक असताना ते मी प्रयत्नपूर्वक सुधारले. नियमित व्यायामदेखील त्यांच्याकडून घेण्यासारखा गुण होता. रात्री झोपायला कितीही उशीर झाला किंवा सकाळी कितीही लवकर जायचे असले तरी त्यांचा ठरलेला व्यायाम चुकत नसे. त्यामुळेच कधीही आजारी पडलेले बघितले नाही.

जयंतरावांबरोबर साधारणपणे महिन्यातून तीन-चार दिवस जिल्ह्यात विविध कार्यकर्त्यांच्या घरी प्रवास असे. त्यांच्याबरोबरचा निवासी प्रवास म्हणजे एक पर्वणीच असे. अनेक विषयांची माहिती त्यांच्या खास शैलीत मिळत असे. अगदी व्याकरणापासून ते प्राचीन शास्त्रांपर्यंत व गोव्याच्या इतिहासापासून आधुनिक विज्ञानापर्यंत ज्ञानाची मेजवानीच असे.

गोव्यात काम करत असताना त्यांना आलेल्या एका कार्यकारिणीची बैठक घेतली व त्यामध्ये विश्वास दिला की, दोन हजारांपर्यंत उपस्थिती राहू शकेल. त्यानुसार काम करून स्वयंसेवक अधिक नागरिक मिळून दोन हजारांच्या जवळपास संख्या राहिली.

जयंतरावांकडे 'विज्ञान भारती'ची जबाबदारी आल्यावर भेटी कमी झाल्या. एकदा मालवणला काही कार्यक्रमासाठी आले असताना, घरून निघताना पत्नीने त्यांना म्हटले, ''पुन्हा या.'' तेव्हा मिश्कीलपणे ते म्हणाले, ''आता मी मोठमोठ्या शहरांमध्ये असतो. मालवणसारख्या लहान गावात येत नाही.'' तीच त्यांची अखेरची भेट ठरली. एका दुर्दैवी अपघातात ते जबर जखमी झाले, तरीही काळाशी लढाई सुरू ठेवली. 'कालगतीहून बलवत्तर ही पौरूषशाली मने, अमिट बलाच्या आधारावर लाख झुंजवू रणे' ही गीतपंक्ती जणू त्यांच्यासाठीच लिहिली असावी, असे वाटत असतानाच अखेर काळाचा विजय झाला. जयंतरावांच्या आत्म्याला सद्गती लाभो, ही परमेश्वर चरणी प्रार्थना; हे माहिती असूनही की ते परमेश्वराला निश्चितच सांगतील की, भारतमाता परमवैभवी होईपर्यंत मला भारतातच पुन्हा मनुष्यजन्म दे. जयंतरावांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन!

# असे पण जयंतराव...

> **जयंतरावांचे निधन झाल्याचे वृत्त समजले. काही महिन्यांपासून त्याची दुर्दैवी चाहूल लागतच होती, परंतु ते मनाला पटत नव्हते. ईश्वरेच्छा. पण, लवकरात लवकर भारतमातेच्या सेवेसाठी ते परत येणार व हिंदूराष्ट्र (अखंड) करूनच दाखवणार, हा विश्वास आहे.**

मी या लेखात पुढे 'जयंत' असेच म्हणणार आहे. कारण, आम्ही जग समजायच्या अगोदर एकमेकांना ओळखत आहोत. आम्ही एका शालेय वर्गातले व एकाच वाडीत राहणारे, त्यामुळे ते प्रचारक निघण्यापूर्वीच्या माझ्या आठवणी मी सांगणार आहे.

आम्ही सातवी-आठवीत असू, १९७७-७८ साली... जयंत उत्कृष्ट टेबलटेनिस खेळायचा. एकदा मला म्हणाला, ''तो समोरचा खेळतो आहे ना, त्याला मी पाच पॉईंटच्या आत हरवून दाखवतो.'' (म्हणजे २१-५) व तसेच झाले. (२१-१९) पण चालले असते. पण, 'Low aim is crime' हा धडा तेव्हा शिकलो. पुढे 'विज्ञान भारती'चे काम २००९ ते मृत्यूपर्यंत ज्या वेगाने वाढवले तो झपाटा या अनुभवातूनच उगम पावलेला वाटला.

१९८१ साली आम्ही आर्यन हायस्कूलमधून दहावी झालो. दहावीला अत्यंत चुरशीची अशी 'आदर्श विद्यार्थी' स्पर्धा असायची. अभ्यास, नाटक, खेळ (अनेक), वक्तृत्व, अशा अनेकाचे मार्क, त्यानंतर लेखी परीक्षा व Final Interviews अशा Complex, All Round व दमछाक करणाऱ्या चुरशीच्या स्पर्धेत आम्ही दोघेही इंटरव्ह्युपर्यंत (शेवटच्या पाच) पोहोचलो. पण मी हरलो आणि तो आदर्श विद्यार्थी ठरला. त्याचे अष्टपैलुत्व तेथून समजले. पुढे एकदा (२०१०) साली, आमच्या चाळीची 'रिडेव्हल्पमेंट' त्याचाच बंधू विनायक करत असताना व आम्ही सहस्रबुद्ध्यांच्या पाच नं. चाळीतील घरात भाड्याने राहत असताना तो आमच्या घरी आला. मी त्याला अभिमानाने सांगितले की, ''माझी मुलगी सई आर्यन शाळेतच आदर्श विद्यार्थिनी झाली (मला जमले नाही).'' तेव्हा तो उत्स्फूर्तपणे म्हणाला, ''यात तुझे 'केड्रिट' नाही, ती या घरात राहत आहे. हा जागेचा गुण आहे.'' यातून त्याच्यातील उत्स्फूर्तता, हजरजबाबीपणा कळला.

**अतुल वझे**

मला चांगले आठवते आम्ही १९८२-८३ साली अकरावी-बारावीत गिरगावात भटच्या क्लासला जात होतो. तेव्हा एका वर्गात ३०० ते ४०० मुले एकत्र शिकायचो (साहित्य संघ), एकदा एका मुलाने, मुलीला खडू मारला. दुसऱ्या दिवशी मुलीने भट सरांकडे तक्रार केली. भटाने सर्व मुलांना उभे केले. विचारले कोणी खडू मारला ते सांगा. नाही सांगितले, तर सर्वांना पट्याने मारेन. त्यांनी आम्हा पाच मुलांना उभे केले व म्हणाला, ''ही नक्की मारणार नाहीत. तुम्ही आज घरी जा, मी बाकीच्यांना बघतो.'' जयंताचा प्रामाणिकपणा व नैतिकतेच्या विश्वासामुळे आमचीपण सुटका झाली. माझे इंजिनिअरिंग पूर्ण झाले, त्याचे 'बीएस्सी-टेक'चे शेवटचे वर्ष चालू होते. तो रामजन्मभूमी-पोस्टर्स लावण्याचा काळ चालू होता. त्यावेळी जयंतची दिनचर्या थक्क करणारी होती. बहुतेक तो नगर सहकार्यवाह असावा. सकाळी प्रभातशाखा, नंतर कॉलेज, संध्याकाळी संघ बैठका व त्यानंतर रात्री १० ते १२ वाजेपर्यंत गिरगावात वॉल पेटिंग व पोस्टर्स लावणे. सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत अव्याहत उत्साहाचा झरा मी अनुभवला आहे.

१९८८-८९च्या काळात तो प्रचारक निघणार असे मला समजले. माझ्यावर पण दबाव होता, पण माझे धैर्य झाले नाही. मी त्याचवेळी त्याला वचन दिले की, २० वर्षं नोकरी करीन व नंतर संघाचे काम करीन. देवाच्या कृपेने व जयंतच्या त्या प्रेरणेने मी २००७ साली आयटी करिअर सोडून परत, गिरगाव नगरात सहकार्यवाह म्हणून काम सुरू केले. प्रभात, सायं, रात्र रोज तीनही शाखांत जायला लागलो. त्यावेळी जयंतराव कोकण प्रांत प्रचारक होते व मला माझे वचन पूर्ण केल्याचे समाधान होते.

एक शेवटचा व सर्वांत महत्त्वाचा अनुभव सांगतो. गिरगावात काळविट कुटुंबामध्ये जयंतराव दोन मुलांबरोबर खूप वेळ घालवायचे. बाकी सर्व त्याला म्हणायचे, ''हे 'बाल' कधीही शाखेत येत नाहीत, घर पण संघाचे नाही. तू एवढा वेळ का देतोस?'' पण, आज हेच दोघे उच्चशिक्षित, एक हजार तरुणांचे गिरगाव ध्वजपथक उभे करणारे, एक जनकल्याण समिती, तर दुसरा संघाचा नगर कार्यवाह. वेळेची गुंतवणूक म्हणजे काय, हे आता समजले आहे.

आयुष्यात पहिल्यांदाच लेख लिहिण्याचे धाडस करत आहे. जयंतरावांच्या स्मृतीस मनापासून अभिवादन. तुझ्याकडून खूप शिकलो रे मित्रा!

९९८७७५८२५०

# जयंत सहस्रबुद्धे

## 'राष्ट्राय स्वाहा' या तत्वाने संघकार्य पुढे नेणारा संन्यासी योद्धा

जयंत सहस्रबुद्धे गेल्याची बातमी वाचून बसलेला धक्का, हा माझ्यासाठी साधा धक्का नाही. कारण, ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव माझ्या विचारसरणीवर आहे, ती व्यक्ती या जगात नाही, यावर विश्वास ठेवणे वेदनादायक आहे. आपल्या आयुष्यात अनेक व्यक्ती भेटत असतात, पण आपल्या आयुष्याला समृद्ध करणाऱ्या त्यातील काही व्यक्तींना आपण सदैव गुरुस्थानी पाहतो. १९८० ते १९९९ या काळात संघकार्य करताना अनेक विदूषींचा सहवास लाभला. त्यात प्रामुख्याने संघ प्रचारक होते होते. १९९०-९२ या काळात जयंतजी वांद्रे ते सांताक्रुझ या शांतीनगर भागात प्रचारक होते. मी वांद्रे पूर्वमधील गांधीनगर सायंशाखेचा कार्यवाह होतो. जयंतजी 'भाभा अणुसंशोधन केंद्रा'त वैज्ञानिक म्हणून कार्यरत होते आणि त्या पदाचा त्याग करून १९८७ पासून त्यांनी स्वत:ला संघकार्यास वाहून घेतले होते. हे समजल्यावर त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. पुढे त्यांच्या सहवासात जे शिकायला मिळाले, ते अतुलनीय आहे. एकदा त्यांच्या रात्रीच्या भोजनाची व्यवस्था करण्याची माझ्याकडे जबाबदारी होती आणि मी नेमका विसरून गेलो. पण, जयंतजींना त्या रात्री माझी चूक लक्षात आल्यावर मंद स्मित हास्य करून कसला तरी उपास असल्याचे कारण पुढे करून ते निघून गेले. अपराधीपणाच्या भावनेत त्या रात्री मी संघ प्रचारकांच्या जगण्यातील कण्टकाकीर्ण मार्गाचा विचार करत राहिलो. जयंतजी प्रचारक असताना त्यांच्या बोलण्यातली सात्विकता, संयम आणि धीरोदात्त दृष्टी मला 'प्रचारक' या संकल्पनेवर विचार करायला भाग पाडत होती. त्याचा परिणाम म्हणून मी १९९२ साली रायगड जिल्ह्यात रोहा तालुक्यात विस्तारक म्हणून अनुभव घेतला. प्रचारकही जायची इच्छा होती, पण सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समधून पदवी झाल्यानंतर पुढे १९९६ साली 'Film and TV Institute of India' मध्ये प्रवेश मिळाल्यामुळे जयंतजींनी मला तो अभ्यासक्रम पूर्ण करून झाल्यानंतर प्रचारक निघायचे की नाही, त्याचा विचार करायला सांगितले. मुख्य म्हणजे, इच्छुक म्हणून मला त्याचवर्षी मॉरिशसमध्ये प्रचारक म्हणून जाण्याची संधी होती. कोणतेही पाऊल उचलण्याच्या आधी आपली वैचारिक पातळी निर्णयक्षम होणे आवश्यक असते. जयंतजींचा हाच वैज्ञानिक दृष्टिकोन मला महत्त्वाचा वाटतो. पुढे म्यानमारमधील बौद्ध धर्माच्या इतिहासाच्या प्रचाराचे कार्य करणारे प्रचारक स्व. धीराजी यांच्यावर माहितीपट करण्याच्या योगाने जयंतजी आणि धीराजी यांच्यासोबत यशवंत कार्यालयात बऱ्याच बैठका झाल्या. त्यावेळेस जयंतजी ८२ वर्षांच्या धीराजींसमोर एखादा बालस्वयंसेवक बसावा तसे धीराजींचे बोलणे ऐकत असत. याच काळात माझ्या मनात संघ प्रचारकावर एका आंतरराष्ट्रीय स्तरावर डॉक्युमेंटरी फिल्म तयार करण्याचा विचार घोळू लागला. नवीन पिढीला संघ प्रचारकांचे आयुष्य कसे होते, त्यांनी कशा प्रकारे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघकार्य पुढे नेले, याचे दस्तावेजीकरण महत्त्वाचे वाटले. संघातील काही अधिकाऱ्यांशी मी या विषयावर बोललोसुद्धा, पण म्हणावा तसा मला प्रतिसाद मिळाला नाही. २०१८च्या फेब्रुवारीत सुदैवाने जयंतजींना मुंबई विद्यापीठात एका भारतीय वैज्ञानिक परिषदेच्या परिसंवादाचे उद्घाटन करण्यास बोलावले होते. ती संधी साधून मी जयंतजींना आवर्जून भेटलो आणि संघ प्रचारकांच्या माहितीपटाची संकल्पना त्यांना सांगितली. त्यावर त्यांनी माझ्या कल्पनेला अतिशय गांभीर्याने घेऊन मला त्यावर संपूर्ण प्रस्ताव सादर करण्यास सांगितले. माझ्या संकल्पनेस जयंत सहस्रबुद्धेंसारख्या प्रचारकाने मान्यता दिली, ही माझ्यासाठी खूप महत्त्वपूर्ण गोष्ट होती.

**बापू सर्वगोड**



अशा या अतिशय उच्च अभिधारणा असलेल्या अध्यातिक अनुभूतीच्या वैज्ञानिकाचे अपघाती निधन ही राष्ट्रीय हानी आहे. जयंतजी, संघ प्रचारकाच्या आयुष्याचे यज्ञकार्य कसे चालते, याविषयीच्या चित्रपटाची सुरुवात तुमच्यापासूनच करायची होती....पण, त्या आधीच आपणा आमच्यातून निघून गेलात...मी आपणास सांगितलेला संकल्प नक्की पूर्ण करीन. कारण, पुढच्या पिढीला कळले पाहिजे - जयंत सहस्रबुद्धेंसारखे 'राष्ट्राय स्वाहा' या तत्वाने संघकार्य पुढे घेऊन जाणारे संन्यासी योद्धे होते.

**((FTII) लेखक/ दिग्दर्शक)**

# जयंतरावांचे स्मरण

**(१७-०४-१९६६ ते ०२-०६-२०२३)**

> **एक दूरदृष्टी असलेला नेता आणि संयोजक जयंत सहस्रबुद्धे यांचे निधन झाल्यामुळे अतिशय दुःख होत आहे. 'विज्ञान भारती'चे राष्ट्रीय संघटन सचिव आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक, या नात्याने त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रसेवेसाठी समर्पित केले आणि आपल्या समाजाची बांधणी मजबूत करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. दोन दशकांहून अधिक काळ त्यांच्या अनुकरणीय नेतृत्वाचा साक्षीदार म्हणून, मी जयंतराव यांना परिभाषित करणाऱ्या काही अपवादात्मक गुणांवर प्रकाश टाकू इच्छितो.**

**१. दूरदर्शी नेतृत्व :** जयंतराव यांच्याकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी एक उल्लेखनीय दृष्टी होती आणि राष्ट्र घडवण्यात त्यांची भूमिका होती. धोरणात्मक विचार करण्याची आणि दीर्घकालीन योजना आखण्याच्या त्यांच्या क्षमतेमुळे त्यांना संस्थेला अधिक उंचीवर नेण्याची परवानगी मिळाली. एकसंध, समृद्ध आणि सांस्कृतिकदृष्ट्या मजबूत भारताचा त्यांचा स्पष्ट विचार होता आणि तो विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले.

**२. विनम्रता आणि जवळीक :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघात उच्च स्थान असूनही, जयंतराव त्यांच्या नम्र आणि सहज स्वभावामुळे ओळखले जात होते. ते सर्वांशी आदराने आणि प्रेमाने वागत. आणि त्यांच्या मनमोकळ्या स्वभावामुळे लोकांना त्याच्याशी जोडणे सोपे झाले. ते नेहमी इतरांच्या कल्पना आणि चिंता ऐकण्यास तयार असतं, त्यामुळे खुला संवाद आणि सर्वसमावेशकतेची संस्कृती वाढत असे.

**संजय देशमुख**

**३. संघटनात्मक कौशल्य :** जयंतरावांचे संघटन कौशल्य खरोखरच अपवादात्मक होते. रा. स्व. संघाची रचना, तत्त्वे आणि विचारधारा यांची त्यांना सखोल माहिती होती, ज्याचा त्यांनी प्रभावीपणे वापर करून संघटनेचे तळागाळातील जाळे मजबूत केले. त्यांच्या नेतृत्वाखाली, संघटनात्मक शिस्त, प्रशिक्षण आणि सामुदायिक सहभागावर अधिक लक्ष केंद्रित करून, रा. स्व. संघाने उल्लेखनीय विस्तार आणि पोहोच पाहिली.

**४. मजबूत संवादक :** जयंतरावांकडे उत्कृष्ट संवाद कौशल्य होते आणि त्यांचे विचार आणि कल्पना स्पष्टपणे मांडण्याची क्षमता त्यांच्याकडे होती. मोठ्या मेळाव्याला संबोधित करत असो किंवा एकमेकांशी संवाद साधत असो, ते आपला संदेश प्रभावीपणे पोहोचवू शकतं आणि लोकांना त्याच्या शब्दांनी प्रेरित करू शकतं. त्यांच्या भाषणात प्रामाणिकपणा आणि समस्यांबद्दल सखोल आकलन असे.

**५. समाजकल्याणासाठी वचनबद्धता :** रा. स्व. संघामधील त्यांच्या भूमिकेच्या पलीकडे, जयंतराव हे समाजकल्याण आणि समुदाय विकासासाठी अत्यंत कटिबद्ध होते. त्यांनी विशेषत: समाजातील उपेक्षित घटकांच्या उत्थान आणि सक्षमीकरणाच्या उद्देशाने विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. राष्ट्रसेवेसाठी त्यांचे नि:स्वार्थ समर्पण आणि सामाजिक आव्हानांना तोंड देण्यासाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न खरोखरच प्रशंसनीय होते.

जयंतरावांच्या या अपवादात्मक गुणांनी ते केवळ एक उत्कृष्ट नेतेच नव्हे, तर अनेकांसाठी आदर्शही बनले.

जयंतराव हे खरे दिग्गज होते, ज्यांच्या रा. स्व. संघाच्या आदर्शांप्रती असलेल्या अटल बांधिलकीने संस्थेवर आणि त्यांनी स्पर्श केलेल्या लाखो जीवनांवर अमिट छाप सोडली आहे. आपल्या अपवादात्मक नेतृत्व कौशल्य आणि संघटनात्मक कौशल्याने, त्यांनी देशभरात रा. स्व. संघाची पोहोच आणि प्रभाव वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, रा. स्व. संघाने निःस्वार्थ सेवा, शिस्त आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेला मूर्त स्वरुप देत उल्लेखनीय वाढ आणि प्रगती पाहिली. त्यांच्या दूरदृष्टी आणि धोरणात्मक विचाराने, रा. स्व. संघाला सामाजिक परिवर्तनासाठी एक शक्तिशाली ताकद बनविण्यात मदत केली. स्वयंसेवकांमध्ये अभिमान, देशभक्ती आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची भावना जागृत केली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मर्यादेपलीकडे जयंतरावांचे राष्ट्रउभारणीसाठीचे समर्पण होते. त्यांनी विविध सामाजिक आणि कल्याणकारी कार्यात सक्रिय सहभाग घेतला आणि समाजातील उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. करुणा आणि सर्वसमावेशकतेच्या तत्त्वांनी प्रेरित असलेल्या प्रयत्नांनी असंख्य जीवनांना स्पर्श केला आणि गरजूंना आशा दिली.

एक नेता म्हणून, जयंतरावांकडे सर्व स्तरातील लोकांना प्रेरणा देण्याची दुर्मीळ क्षमता होती. त्यांच्यात विचारांची स्पष्टता, नम्रता आणि इतरांच्या हिताची खरी काळजी, यामुळे ते एक आदरणीय व्यक्ती बनले. ज्याचे सहकारी आणि विरोधक दोघांनीही कौतुक केले. सचोटी, समर्पण आणि निःस्वार्थता या मूल्यांना मूर्त रूप देत त्यांनी नेतृत्व केले.

त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी केवळ रा. स्व. संघामध्येच नव्हे, तर राष्ट्रीय सेवा आणि सामाजिक विकासाच्या व्यापक क्षेत्रातही खोलवर जाणवेल. त्यांचा वारसा पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील, आपल्या राष्ट्राच्या आणि लोकांच्या कल्याणासाठी दृढ वचनबद्धतेचे महत्त्व लक्षात आणून देईल.

या कठीण काळात जयंत सहस्रबुद्धे यांच्या कुटुंबीयांना आणि प्रियजनांना मनःपूर्वक संवेदना अर्पण करण्यात माझ्या कुटुंबातील सदस्य माझ्यासोबत आहेत. त्यांचा आत्मा शांतपणे इच्छितस्थळी पोहोचावा आणि त्यांनी देशासाठी दिलेले विलक्षण योगदान सदैव स्मरणात राहो.

# जयंत स्मृती



# देखणा देहांत तो जो सागरी सूर्यास्तसा.. अग्नीचा पेरून जातो रात्रगर्भी वारसा...

**रोजच्या जगण्यात अनेक माणसांसोबत आपण संवाद साधतो. काही काळानंतर ती माणसं विस्मृतीतदेखील जातात. पण, काही माणसं अशी असतात, जी आपल्यामधल्या 'core' अस्तित्वाला स्पर्शून जातात. माझ्यातल्या शुद्ध 'असण्याला', 'मी'पणाच्या कोणत्याही आवरणाशिवाय ती साद घालू शकतात आणि आजच्या व्यावहारिक कोलाहल जगातसुद्धा अशी निर्भेळता सहजपणे जपणारी व्यक्ती म्हणजे जयंतराव! असामान्य असूनही सामान्य राहण्याची कला साधलेला कर्मयोगी! 'मृत्यू हीच विश्रांती' हे वाक्य कधीही केवळ शब्द म्हणून न सांगता, ते प्रत्यक्ष जगलेला माणूस!**



**शर्वरी कुलकर्णी**

जयंतराव या व्यक्तीकडे केवळ एका खिडकीतून पाहताच येणार नाही. सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या, नाती आणि माणसं सांभाळूनदेखील त्यातल्या कोणत्याही 'perspective'मध्ये ते अडकलेले नव्हते. भगवद्गीतेमध्ये सांगितलेल्या 'पद्मपत्रमिवांभसा' सारखे ते होते. सगळ्यात असूनही कुठेच नसणारे! तत्वज्ञानाचे शाब्दिक अवडंबर माजवणारे अनेक जण अनेक स्तरांवर दिसतात, पण ते तत्वज्ञान प्रत्यक्षात जगणारा जयंतरावांसारखा माणूस दुर्मीळच! आणि म्हणूनच बहुतेक त्यांच्या केवळ 'असण्याने' अशक्य वाटणाऱ्या गोष्टीदेखील सहज साध्य बनून जात.

डॉ. हेडगेवारांनी स्थापिलेल्या संघाची तत्त्व अतिशय एकनिष्ठेने पाळणारा तपस्वी सध्याच्या काळात पाहायला मिळणं तसं दुर्मीळच. पण, जयंतरावांच्या रूपाने ते देखील अनुभवता आलं. संघाच्या प्रार्थनेमधील 'श्रुतं चैव यत्कण्टकाकीर्णमार्गं स्वयं स्वीकृतं नः सुगं कारयेत्' यातील 'सुगं कारयेत् ' हा समतोल त्यांनी फार सुंदरपणे साधला होता. अनेक अडचणी, समस्या यांना तोंड देताना त्याबद्दल त्यांनी कधीही त्रागा केल्याचं आठवत नाही आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्याबद्दल कोणताही अभिनिवेश बाळगलेला कधीही अनुभवास आला नाही. तत्वनिष्ठ जगण्याचा एक सहपजपणे होणारा 'side effect' म्हणजे त्यातून निर्माण होणारा 'मला हे चालत नाही' हा अहंभाव आणि तो त्यांच्यामध्ये एक कणदेखील नव्हता. 'माझा कुणालाही कधीही भार होऊ नये' यासाठीच ते सतत प्रयत्नशील असायचे. अगदी स्वतःची बॅगसुद्धा कधी कुणाला त्यांनी उचलून नेऊ दिल्याची आठवण नाही.

सामाजिक काम करत असताना इतरांशी मतभेद होणं, मग त्यातून येणारी नाराजी आणि कटुता या अतिशय सर्वसामान्य गोष्टी. पण, हा माणूस त्याने कधीही विचलित झाल्याचा अनुभव नाही. अत्यंत परस्पर विरोधी वाटणाऱ्या विचार समूहातदेखील चर्चा घडवून आणण्याची विलक्षण क्षमता त्यांच्यामध्ये होती. ते नेहमी म्हणायचे की, ''आपण ज्या समूहामध्ये काम करतो त्या समूहाचा एकत्रित आयक्यू जितका, तितकाच आपलादेखील 'सेट' करायचा. मग आपोआप त्यातून मतभेद टळतात आणि सर्वसमावेशक पद्धतीने काम पुढे जातं.'' 'मी'पेक्षा 'आपण' जे काम करतो आहे ते जास्त मोठं आहे याचा विसर आज भल्याभल्यांना पडलेला दिसतो. पण, त्यांच्या अनेक पद्धतीच्या बैठकी, विविध कार्यक्रमांमधील भाषणांमधून किती सहजपणे याचं एक विद्वत्तापूर्ण उदाहरण त्यांनी आपल्यासमोर उभं केलं आहे, याची जाणीव आज त्यांच्या नसण्याने अगदी ठळकपणे होते आहे.

सार्वजनिक क्षेत्रात काम करताना अनेक प्रकारच्या लोकांशी संपर्क येतो. त्यांच्यासोबतच्या संवादातून एकमेकांविषयी मतं तयार होत जातात. ती जितकी कडक तितकी त्यातली सहजता कमी होत जाते, वागण्यात opacity येत जाते. जयंतराव यालाही अपवाद ही opacity का येते याचं एक मस्त 'reverse engineering' त्यांनी केलं होतं. ते सांगायचे, बरेच गैरसमज हे मन स्वच्छ नसण्यातून होतात. दुसऱ्या व्यक्तीवर आपले नियंत्रण कधीच नसते, पण जे आपल्या नियंत्रणामध्ये आहे ते आपलं मन स्वच्छ ठेवण्याचा नेहमी प्रयत्न करायला हवा... आणि हे ते स्वतः जगताना आपण नक्कीच अनुभवलेलं आहे. त्यामुळेच असेल कदाचित.. आपल्या डोक्यात राग, नाराजी, दुःख यापैकी कोणतंही वादळ त्यांच्या केवळ सोबत असण्याने शमून जायचं.

आपल्याकडे जे आहे ते आपल्यासोबत असणाऱ्या प्रत्येकाला मुक्तहस्ते ते द्यायचे. आणि त्या देण्यामध्येदेखील कुठेही 'कर्ता' भाव जाणवला नाही. कार्यकर्त्यांच्या घरातील एखाद्या लहानग्यापासून ते ज्येष्ठापर्यंत सर्वांशी ते समान उत्कटतेने संवाद साधू शकायचे. जाता जाता एखादी वैदिक गणितातली ट्रिक शिकवायची, गीतेमधला एखादा श्लोक पाठ करून घ्यायचा किंवा मग तत्वज्ञानातील एखाद्या गहन विषयावर काही कॉम्नेटरी... या सर्व गोष्टी योग्य त्या वयोगटानुसार ते समान भावाने करायचे. ज्याला जितकं झेपेल तेवढंच मोजून मापून देण्याची त्यांची स्टाईल एकदम 'युनिक' होती. त्यामध्ये कधीही एखादी गोष्ट 'मी शिकवतो आहे' हा दंभ किंवा हे आत्ता क्षणी काहीतरी महान, तुमचं आयुष्य बदलून टाकणारं काहीतरी मी तुमच्यासाठी घेऊन आलो आहे असा 'महंत 'भाव कधीही कुणालाही जाणवला नसेल आणि बहुतेक म्हणूनच त्यांचं नसणं हे आज सर्वांना आपल्याच घरातील कुणीतरी हरवल्यासारखं वाटणारं आहे. संघाचं काम करत असतानाच अचानकपणे विज्ञानासारख्या मर्यादित विषयाची त्यांना दिलेली जबाबदारी देखील त्यांनी तितक्याच समर्थपणे सांभाळलेली दिसून येते. विज्ञान क्षेत्रातली मंडळी म्हणजे आधीच 'हुश्शार'.. प्रत्येकाच्या तऱ्हा पण वेगळ्या.. त्याबद्दल ते म्हणायचे सुद्धा की, ''हे अत्यंत बुद्धिमान लोकं म्हणजे जरा विक्षिप्तच असतात.'' पण, त्यांना याचीदेखील पूर्णपणे जाणीव होती की, या लोकांचा हा विक्षिप्तपणाच त्यांना नवीन नवीन कल्पना देणारा असतो आणि त्यामुळेच अशा सर्व लोकांचा तऱ्हेवाईकपणा सांभाळून त्यांना एकत्रितपणे काम करायला लावण्याची तारेवरची कसरत ते सतत करत असायचे. विज्ञान क्षेत्रातील लोकांसाठी त्यांचं संशोधन हेच विश्व... त्यांच्या या विश्वाला धक्का न लावता, त्यांना त्या पलीकडे पाहण्यासाठी उद्युक्त करण्याची त्यांची क्षमता विलक्षण होती आणि जयंतराव ते खूप सहजपणे करायचे. ही सहजता त्यांच्या 'विद्यार्थी' असण्यातून आलेली असावी. त्यांचा स्वतःचा काहीतरी एक शोध सतत चाललेला असायचा असा अनुभव आहे. या सर्व वैज्ञानिकांशी होणाऱ्या संवादांमधून काहीतरी एक 'connecting the dots' करण्याचा त्यांचा स्वतःचा प्रवासदेखील चाललेला असावा असं वाटतं आणि तो अर्थात त्यांनी हाताळलेल्या विषयांमधून तो दिसून येतो. स्वामी विवेकानंद आणि विज्ञान, जगदीशचंद्र बसू यांचे विज्ञानविषयक विचार, भगिनी निवेदितांचा जगदीशचंद्रांच्या कार्यावर असणारा प्रभाव, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील वैज्ञानिकांचा सहभाग, भारतीय तत्वज्ञान, विशेषतः पंचमहाभूत सिद्धांत आणि विज्ञान, भारतीय शास्त्रीय संगीत आणि विज्ञान, sustainability, भारताची प्रशासकीय व्यवस्था, वैज्ञानिक धोरणे, भारतीय लोकशाही अशा अनेक विषयांवरचे त्यांचे विचार हे त्यांच्यामधल्या विद्यार्थीपणाचे पुरावे..! जयंतराव हे एक सच्चे वैज्ञानिक होते. आता 'वैज्ञानिक' म्हणजे विज्ञान संस्थेत ९ ते ५ काम करणारा कर्मचारी या सध्याच्या व्याख्येत ते बसत नाहीत, त्यामुळे बहुतेक ही अतिशयोक्ती वाटू शकेल. पण, प्रत्येक गोष्टीकडे तटस्थपणे पाहण्याची त्यांची वृत्ती म्हणजे वैज्ञानिक वृत्तीच नाही का? विज्ञान संस्थेत राहून हजारो संशोधन पत्रिका लिहिणारे, विज्ञानाचं हे मूलभूत तत्त्व आपल्या जगण्यात अंगीकारणारे किती 'वैज्ञानिक' आज असतील? पण, किमान ज्यांना ज्यांना 'जयंतराव' हा परिसस्पर्श झाला, ते तरी याला नक्कीच अपवाद ठरावा, यासाठी प्रयत्नशील राहतील, अशी आशा आहे आणि तीच त्यांना वाहिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

प्रचारकांचं जीवन म्हणजे एका कर्मयोगी संन्याशाचं जीवन. हिमालयात राहून तप करणाऱ्या संन्याशापेक्षा थोडंसं बहुधा कठीणच! संन्यस्ततेला सर्व प्रकारे आव्हान देणाऱ्या व्यवस्थेत राहून देखील आपण स्वीकारलेल्या मार्गावर कोणतीही साधनशुचिता ढळू न देता मार्गक्रमण करीत राहणं, यासाठी किती तीव्र आत्मबलाची गरज असेल ना! बहुतेक हीच जयंतरावांनी आपल्या सर्वांना दिलेली गुरुकिल्ली असावी. आपल्या अस्तित्वाने अशा अनेक आत्मदीपांना प्रज्वलित करणारी 'जयंतराव' नावाची प्रेरणा भारतमातेसाठी समर्पित होण्यासाठी युगानुयुगे मार्गदर्शन करत राहील...

(BITS, Goa)

## आठवणीतले जयंतराव...

**अनिल वर्तक**

जयंतरावांच्या निधनाची धक्कादायक बातमी ऐकली आणि त्यांच्या सोबतचे प्रसंग आणि आठवणी मनासमोर उभ्या राहिल्या. १९९३-९४ मध्ये काही वेळ नाशिक विभाग प्रचारक, नंतर कोकण प्रांत प्रचारक आणि अन्य वेळी प्रांत प्रचारक बैठकीत आणि संघ शिक्षा वर्ग आदी अन्य कार्यक्रमांतून सतत भेटी होतच असत. मुंबईत परळ विभाग प्रचारक असल्यापासून घराशीही जवळचा संबंध आला.

अनेकांनी जयंतरावांच्या स्वभावगुणांचे वर्णन केले आहे. सर्व स्तरावर सहजतेने व आपलेपणाने संवाद, कुठलाही विषय समजून घेण्याची मर्मग्राहकता, संघातल्या सर्व विषयांची पक्की बैठक आणि त्याचबरोबर संघातील सामान्य विषयांसोबत नवीन विषय, कल्पना, माणसे यांना समजण्याची, जोडण्याची हातोटी, थोडा वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची तयारी, अशा काही वैशिष्ट्यांचा आवर्जून उल्लेख करता येईल. जयंतराव तत्कालीन सरकार्यवाह शेषाद्री यांच्यासोबत दि. ६ डिसेंबर, १९९२ नंतरच्या काळात काही महिने 'साहाय्यक' या नात्याने प्रवास करीत होते. व्यक्तिगतरित्या सांगायचे, तर लासलगावच्या प्रवासात माझ्याकडून अनावधानाने घडणाऱ्या त्रुटींबद्दल मृदू, पण निश्चित शब्दात करून दिलेली जाणीव, वडाळ्याच्या प्रवासात एखाद्या कार्यकर्त्याच्या घरी पहिल्या भेटीत सर्वांशी संवाद साधणे आणि घराविषयी अचूक आकलन करणे, संघ शिक्षा वर्गातील काटेकोर नियोजन, याचा उल्लेख करता येईल. गोव्यात त्यांनी विभाग प्रचारक म्हणून प्रभावी काम केले होते. त्यामुळे विविध क्षेत्रातील कार्यकर्ते, राजकारणातील वरिष्ठ कार्यकर्ते या सर्वांच्याच मनात जयंतरावांविषयी असणारा आदरभाव आणि जिव्हाळा सतत जाणवत असे.

एक प्रसंग फार विलक्षण आहे. मार्च १९९९च्या प्रतिनिधी सभेकरिता आमची कुर्ला टर्मिनसवरून रात्री गाडी होती. १२ जणांची तिकिटे माझ्याकडे होती. त्या दिवशी जयंतरावांकडे गिरगावात एक कार्यक्रम असल्याने आम्ही जेऊन रात्रीची गाडी पकडण्याचे ठरवले. एकूण वेळेची काही गडबड झाली आणि गिरगाव, छत्रपती शिवाजी टर्मिनस, कुर्ल्याला गाडी बदलून टिळकनगर करेपर्यंत गाडी सुटण्याची वेळ झाली. तेव्हा मोबाईल नसल्याने इतरांना संपर्कही करणे शक्य नव्हते. स्टेशनबाहेरूनच गाडी सुटल्याचे दिसले, एक रिक्षावाला म्हणाला, ''गोरखपूर पकडनी हैं क्या?'' आणि क्षणाचाही विचार न करता, दोघे रिक्षात बसलो. तो आम्हाला पुढच्या सिग्नलपर्यंत घेऊन गेला, गाडी तिथे थांबली होती. तसेच उतरून सामानासकट धावत निघालो. कसेबसे डब्यात शिरलो. रिक्षावालाही आमच्या मागे भाड्याकरिता धावत होता. त्याला पैसे दिले आणि आत गेलो. नशिबाने अन्य कार्यकर्तेही तिकीट जवळ नसताना या गाडीत चढले होते. ईश्वरीय कार्य असे दोघांच्याही मनात आले. जयंतरावही हा प्रसंग अन्य कार्यकर्त्यांना नंतर सांगत.

संघाच्या प्रांताच्या दायित्वानंतर आलेली 'विज्ञान भारती'ची जबाबदारी त्यांनी लिलया पेलली आणि आपल्या कार्यकुशलतेने त्यावर एक अमिट ठसा उमटविला. 'बीएस्सी टेक'चे शिक्षण आणि विज्ञानाची अंगभूत गोडी याच्या जोडीला अथक परिश्रम आणि संघटनकौशल्य यांच्या आधारे त्यांनी अनेक कार्यक्रम अखिल भारतीय स्तरावर यशस्वीपणे पार पडले. त्याचबरोबर आपल्या प्रतिभेने या विषयात अनेक नवीन वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची भर घातली. 'शास्त्र प्रतिभा' अथवा 'सायन्स इंडिया फोरम' या नावाने संयुक्त अरब अमिराती, कुवेतसारख्या आखाती देशांमध्ये हजारो भारतीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणारा कार्यक्रम असो किंवा 'GIST - A Global Indian Scientist and Technocrat Forum'च्या माध्यमातून अमेरिका, युरोप आदी देशांतील प्रतिभावान शास्त्रज्ञांना भारताशी जोडण्याचा उपक्रम असो, असे उपक्रम यशस्वीपणे राबविताना कार्यकर्ते निर्माण करण्याची ही अद्भुत कला त्यांच्याकडे होती. या दोन्ही क्षेत्रातील कार्यकर्ते त्याची आजही आवर्जून आठवण काढतात.

एका अर्थाने अपघातानंतरच त्यांना बिछान्यावर असलेले पाहिले. आज मला जयंतरावांनी भेटायचे आहे, त्यांना काही सांगायचे, विचारायचे आहे, असे म्हणत त्यांच्या प्रवासाची वाट पाहणारे अनेक जण डोळ्यासमोर आहेत. आपणा सर्वांनाच आता त्यांच्या स्मृतीतून प्रेरणा घेऊन पुढील मार्गक्रमण करावे लागेल. जयंतरावांच्या पुण्यस्मृतीस विनम्र श्रद्धांजली.

**(लेखक विश्व विभाग सहसंयोजक आहेत.)**

## जयंतरावांचे देहावसान म्हणजे समस्त हिंदू समाजाची हानीच!

**शैला सामंत**

स्वयंसेवकांचे प्रेरणास्थान, मृदू स्वभाव, कुशल संघटक, विचारक, कोकण प्रांत प्रचारक असताना अथक प्रवास करणारे जयंतराव सहस्रबुद्धे. दि. २ जून रोजी पहाटे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांनी विज्ञान क्षेत्रात उभे केलेले कार्य सर्वस्वी अद्भुतच. वैज्ञानिकांच्या सहज संवादातून हृदयस्थ संबंधांचे रुपांतर त्यांनी 'विज्ञान भारती'शी जोडण्यात केले. जयंतरावांचा स्वभाव धीरगंभीर. मोजकेच पण परिणामकारक बोलणारे. असा हा भारतमातेचा नररत्न गमावल्याची खंत आज प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात असेल.

जयंतरावांचा जन्म गिरगावचा. आर्यन शाळा, गोरेगावकर लेन, गिरगाव येथे वास्तव्य. आर्यन शाळा (महादेव गोविंद रानडे स्थापित) येथेच त्यांचे शिक्षण झाले. गिरगाव ही अनेक नामांकित राजकारणी, समाजकारणी, शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज तसेच गायक, वादक, इतिहासकारांची कर्मभूमी. राष्ट्रउभारणीच्या कामात अग्रेसर असलेले, रा. स्व. संघाचे प्रचारक जयंत सहस्रबुद्धे याच गिरगावातले; म्हणून आम्हा गिरगावकरांना त्यांचा सार्थ अभिमान वाटतो. त्यांची आई राष्ट्र सेविका समितीची सक्रिय कार्यकर्ती. गिरगावात तरुण मुलींना लिलया त्या समितीमध्ये आणत असत. जयंतरावांसारखे मध्यमवर्गातील तरुण युवक प्रचारक मागे वळून न पाहता, राष्ट्रउभारणीच्या कामात स्वतःला झोकून देतात. म्हणूनच त्यांच्यासारख्या प्रचारकांमुळेच हा देश टिकून आहे. असा हा जयंतरावांसारखा समर्पित भावनेने काम करणारा स्वयंसेवक, प्रचारक अपघातात जखमी होतो आणि अथक प्रयत्नांनंतर त्यांच्यावरील उपचारांना यश येत नाही, ही समस्त हिंदू समाजाची हानीच म्हणावी लागेल. यशवंत भवनमध्ये जमलेले स्वयंसेवक, इतर राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, प्रत्येकाच्या चेहऱ्यावरही पोकळी नव्हे, तर अशा तोलामोलाचा स्वयंसेवक आपल्यातून जात आहे, असा जयंत सहस्रबुद्धे पुन्हा होणे नाही, अशाच प्रकारचा भाव नव्हे, वातावरण दिसत होते. यावेळी मनात विचार आले, एखादा सैनिक राष्ट्रासाठी सेवा बजावताना जसा हुतात्मा होतो, त्याला तोफांची सलामी देऊन निरोप देतात, तसेच संघ शाखेपासून 'विज्ञान भारती'च्या राष्ट्रीय सचिव पदापर्यंत पोहोचलेल्या जयंतरावांसारख्या स्वयंसेवकाला शेकडो स्वयंसेवकांनी साश्रू नयनांनी यशवंत भवन येथे कार्याची पूंजी ठेवून आणि साक्षी भावनेने सर्व समुदायाने मनोमन रचले असेल की, तुझ्यासारख्या 'विज्ञान भारती'चे काम पुढे नेणारा यातूनच एक स्वयंसेवक पुढे निश्चित रुपाने आणण्याचा प्रयत्न करू! काका सहस्रबुद्धे (वडील)आज त्यांनी वयाची ९० वर्षे पार केलीही असतील. पण, प्रमुख स्वयंसेवकांशी ते आवर्जून बोलत होते. विचारपूस करत होते. नावानिशी बोलत होते. यावेळी त्यांच्या दांडग्या स्मरणशक्तीचा परिचय आला. गिरगावातून असेच प्रचारक विधायक कामासाठी निर्माण होऊ देत, हीच परमेश्वराकडे प्रार्थना. जयंतरावांच्या स्वर्गलोकीचा प्रवास चिरशांतीचा होवो, अशी प्रार्थना.

**(लेखिका कार्यसमिती सदस्य आहेत.)**

## जयंत सहस्रबुद्धे : आदरांजली

**गौरी माहुलीकर**

**चिन्मय विश्वविद्यापीठात दि. १९ फेब्रुवारी, २०२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त जयंतजींचे सुरेख अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. 'आझादी का अमृत महोत्सव' या घोषणेला अनुसरत जयंतजींनी विषय निवडला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी स्वराज्य' संकल्पनेचा अनेकांगी उहापोह केला.**



चिन्मय विश्वविद्यापीठात शिवजयंती साजरी करण्याचा निर्णय मी २०२० मध्येच घेतला होता. पहिल्या वर्षी विद्यार्थ्यांनी छत्रपतींच्या जीवनावर आधारित दृक्श्राव्य माध्यमातील एक लघुपट तयार केला, कवी भूषणच्या काव्यावर 'इंद्र जिमि जंभपर' नृत्य केले. २०२१ साली रविराज पराडकर यांचे रसाळ व्याख्यान ठेवले होते. २०२२ साली कुणाला बोलवावे अशी चर्चा सुरू होती. वैयक्तिक कारणांमुळे मी केरळऐवजी मुंबईला होते, म्हणून मी आसावरी बापट (पद्मा केळकर) ला विचारले. परंतु, ती तेव्हा म्यानमारला होती आणि कार्यव्यग्र होती. तिने जयंत सहस्रबुद्धे यांचे नाव सूचविले. माझा त्यांच्याशी परिचय नव्हता, कधी भेटही झाली नव्हती. शिवाय आंतरजालावर त्यांची माहिती वाचून मला थोडे दडपणही आले होते. तरीही मी त्यांना दूरध्वनी केला आणि विद्यापीठाच्या कार्यक्रमात व्याख्यान देण्याची विनंतीही केली. त्यांनी खूप आस्थेने विद्यापीठाविषयी माहिती विचारली. केरळ राज्यात असा उपक्रम सुरू केला, यासाठी अभिनंदन केले आणि काहीही आढेवेढे न घेता विनंती मान्य केली. मला आकाश ठेंगणं झालं. आपल्या शिक्षणाचा, पदव्यांचा अवास्तव अभिमान न बाळगता, कार्यबाहुल्याचे अवडंबर न माजवता, ओळख नसतानाही, ज्या ऋजुतेने आणि आत्मियतेने जयंतजी बोलले, वागले, ते सर्वच अनुकरणीय आहे, नाहीतर अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणारे महाभाग आपण अवतीभोवती पाहत असतोच! 'वदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामुचो वचः। करणं परोपकरणं येषां केषां न ते वन्द्याः।' हे सुभाषित ज्यांना चपखल बसतं, अशा खूप कमी व्यक्तिमत्त्वांपैकी होते जयंतजी! कर्तृत्वशाली नेतृत्व अंगी असूनही सामान्य कार्यकर्त्याच्या निष्ठेने आणि महारांवरील डोळस भक्तीने चिन्मय विश्वविद्यापीठाच्या कार्यक्रमात ते दाखल झाले. हा आदरभाव प्रत्यक्ष भेटीतून वृद्धिंगत व्हावा, हे काही नियतीला मान्य नव्हते, असे खेदाने म्हणावे लागते आहे.

चिन्मय विश्वविद्यापीठात दि. १९ फेब्रुवारी, २०२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त जयंतजींचे सुरेख अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. 'आझादी का अमृत महोत्सव' या घोषणेला अनुसरत जयंतजींनी विषय निवडला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी स्वराज्य' संकल्पनेचा अनेकांगी उहापोह केला. सततच्या परकीय आक्रमणांमुळे भारतीयांच्या अस्मितेला मुळापासून धक्का बसला, पूर्वसूरींनी वारसा म्हणून दिलेले ज्ञान धोक्यात आले, आक्रमकांच्या धोरणामुळे न्यूनगंड निर्माण झाला, इंग्रजांच्या अतिरेकामुळे आपल्याला आपल्या धर्माची लाज वाटू लागली, आपली ओळख मिटू लागली, त्यावेळी शिवाजी महाराजांचा हिंदवी स्वराज्य निर्माण करण्याचा संकल्प बालवयातील धाडसच वाटले होते. आपली विस्मृत ओळख आणि गतवैभव मिळवून देणे हा उद्देश असलेले स्वातंत्र्य म्हणजे, स्वत्वाची ओळख, प्रखर राष्ट्रनिष्ठाच! केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे, तर अखंड भारतासाठी स्वत्वाची ओळख करून देणारा राजा एकच! आसाममधील लचित बडफुकन, दक्षिणेत सुब्रह्मण्य भारती, बंगालमध्ये रविंद्रनाथ टागोर, पंजाबात लाला लजपतराय अशा अनेकांना प्रेरणा देणारा श्रीमंत योगी म्हणजे महाराज! औरंगजेबाला अखेरपर्यंत आसाम पादाक्रांत करता आला नाही. याव्यतिरिक्तही अनेक स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणा देणारे महाराज! केवळ शूरयोद्धाच नव्हे, तर स्वत्वाची ओळख करून देणारा प्रजापालनतत्पर 'छत्रपती' या शब्दांत काशी वीथिकेचे उद्घाटन करतेवेळी पंतप्रधानांनी महाराजांचे पुण्यस्मरण केले.

अनेकविध सामरिक प्रसंग, समाजातील भेद, धार्मिक तेढ, संघर्ष आपल्या सीमांची यथार्थ जाणीव तरीही महाराजांनी सागरी किनारे संरक्षित ठेवून आरमार बांधले. आज तर त्या ध्वजाचाही मान आपल्या नौदलाने राखला आहे.

महाराजांचे द्रष्टेपण वाखाणण्याजोगे! आक्रमणांमुळे आपले स्वशासन मोडकळीला आले आणि परकीयांचे आक्रमकांचे धोरण लादले गेले. आक्रमकांची भाषा, त्यांचे शासन, या स्थितीत महाराजांनी संस्कृत भाषेत राज्यव्यवहारकोश तयार करवून घेतला आणि भारतीयत्वाची जपणूक आजही स्वतंत्रता अनेकविध क्षेत्रात आवश्यक आहे. या मातीची बांधिलकी, भारतीयत्वाचा सार्थ अभिमान, हिंदवी स्वराज्याविषयी आस्था आणि या सगळ्यांसाठी छत्रपतींच्या आयुष्याचा आदर्श ठेवायला हवा. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे, सर्वार्थाने! वसाहतीकरणातून बाहेर पडायला हवे, मानसिक गुलामगिरीतून बाहेर यायला हवे, स्वत्वाचे खच्चीकरण ही आक्रमकांची वृत्ती, ती दूर सारून युगपुरुषाकडून प्रेरणा घ्यायला हवी. मार्गक्रमण खडतर खरेच, तरीही त्यांच्या जीवनाचा सूक्ष्म अभ्यास करून हे साधायला हवे.

थोड्यावेळात सर्व पैलूंवर विवेचन करणे अशक्य असतानाही, सोप्या पण ठाशीव भाषेत जयंतजींनी स्वातंत्र्य आणि स्वाधीनता यावर मार्मिक भाष्य केले आणि युवापिढीने महाराजांचा आदर्श ठेवायला हवा, असे आवाहन केले. व्याख्यान मुद्देसूद, तर्कसंगत आणि धाराप्रवाहवत् झाले. भारतीयांना भारतीयत्वाची, स्वत्वाची ओळख करून देणे, स्वाभिमान जागृत करणे आणि राष्ट्रनिष्ठा प्रखर करणे, या गोष्टी जयंतजींच्या व्याख्यानाने साध्य झाल्या. त्यांच्या स्मृतीस सविनय अभिवादन!



# जयंतजी सहस्रबुद्धे

## एक सामरिक द्रष्टे

जयंतजींनी आपले आयुष्य अगदी नि:स्वार्थीपणे, पण देशहितासाठी खपविले. काळाने त्यांना आपल्यातून दूर नेले असले तरी आधुनिक भारतीय विज्ञान परंपरेत त्यांचे स्थान अजरामर झाले आहे. २१व्या शतकातील भारत कसा असेल, यावर चर्चा आपण ऐकतच असतो. पण, मी अगदी आस्थेने म्हणीन की, जयंतजींसारख्या थोरांच्या अथक सेवेतूनच भारताचे २१व्या शतकतील अग्रणीय स्थान बनेल.

**चैतन्य गिरी**



मी जयंतजींना २०१८ साली भेटलो. आमची अगदी अलीकडची ओळख असूनसुद्धा, त्यांनी माझ्या मनावर इतकी मोठी छाप केव्हा पाडली काही कळलेच नाही. काही कळायला मार्गच नव्हता. कारण, ते परत ठणठणीत होऊन कसे आणि केव्हा येतील यावरच आपल्या सर्वांचे मन लागले होते.

अवकाश विज्ञानातून पोस्ट-डॉक्टरेट केल्यानंतर जेव्हा मी भारतात परतलो, तेव्हा मुख्य प्रवाहातील वैज्ञानिक संशोधन सोडून मी अवकाश आणि वैज्ञानिकी धोरणाकडे वळलो आणि मुंबई स्थित गेटवे हाऊस या थिंक टँकमध्ये रुजू झालो. योगायोगाने माझे सासरे, डॉ. किशोर पाकणीकर, त्याकाळात पुण्यातील आघारकर संशोधन संस्थानाचे संचालक झाले होते. त्याकाळात डॉ. पाकणीकरांनी संस्थानातर्फे शंकर आघारकर यांचे छोटेखानी आणि अधिकृत जीवनचरित्र लिहायला सुरू केले आणि हे उपक्रम जयंतजींना मनापासून आवडले होते. आपण सर्वांना त्यांचा 'भारतीय स्वतंत्र संग्रामात वैज्ञानिकांचे अभूतपूर्व योगदान' या विषयावरची आस्था माहिती आहेच. त्यांची ती चर्चा सुरू असताना माझा कुठेतरी उल्लेख झाला. तोवर मी जयंतजींबद्दल फक्त ऐकले, आणि चांगलेच ऐकले होते.

माझी त्यांच्याशी पहिली भेट पुणे विद्यापीठात 'विज्ञान भारती'ने आयोजित केलेल्या 'अंडरवॉटर डोमेन अवेअरनेस'च्या परिसंवादात झाली. तोवर फोनवर बोलणे झालेच होते, पण जेव्हा मी त्यांना पहिल्यांदा पाहिले, तेव्हा मनात एकच शब्द खोलवरून उमगला – 'संन्यासी'. मी त्या परिसंवादेत 'चीन देशाचे अंडरवॉटर ऑप्टिक फायबरचे जाळे' या विषयावर आपले विचार मांडले. पुण्यात मी आणखीन दोन-तीन दिवस राहत असल्याचे कळल्यानंतर ते थेट मला भेटायला आले. माझ्यासारख्या एक नवख्या मुलाला भेटायला एवढी मोठी हस्ती येत आहे, हे समजताच मी उत्साहित झालो आणि त्यांच्यासमोर कुठले विषय मांडावे, हे विचार करीत बसलो. जयंतजी जितके मृदूभाषी त्यांचे विचार तेवढेच तीक्ष्ण होते. थिंक टँक आणि परराष्ट्र धोरणाशी निगडित हा मुलगा काम करतो, हे समजताच त्यांनी माझ्यासमोर एक प्रस्ताव ठेवला–तुला 'सायन्स डिप्लोमसी' या विषयावर काम करायला आवडेल का? मी चाट पडलो. ते मला कुठे कामाला लावत नव्हते. त्यांच्या ध्यानी कुठला प्रकल्पही नव्हता. त्यांना माझ्या करिअर स्विचची तळमळ जाणवली होती आणि त्याकरिता त्यांनी अगदी सोपा प्रश्न विचारून ती तळमळ दूर केली. २०२० पासून 'विज्ञान भारती'चे 'सायन्स इंडिया' मासिक जेव्हा पुनर्प्रकाशित झाले, तेव्हा त्यांनी मला अगदी आवर्जून 'सायन्स डिप्लोमसी'वरचे स्तंभ लिहिण्यास प्रोत्साहन दिले. आजच्या तारखेला या विषयावरचे गैरसरकारी मासिकेत सर्वात पहिले स्तंभ आहे. याचे श्रेय जयंतजी यांनाच जाते.


जयंतजींचा लोकसंपर्क अफाट होता. तो त्यांनी योगायोगाने जमवला नाही. त्यांच्या तल्लख बुद्धीने 'नेटवर्क थेअरी'अमलात आणली, असे म्हणायला गैर नाही. एका क्षेत्रातल्या व्यक्तीला थेट दुसऱ्या क्षेत्रातील व्यक्तीशी कसे जोडून द्यावे आणि त्यातून देशहित कसे साध्य करावे, असा 'मेंटल मॅप'ते सतत बनवत असत. हा एक कमालीचा गुण त्यांना अंगीभूत होता. आमच्या पहिल्या भेटी नंतर आम्ही आठवड्यातून एकदा पाच-दहा मिनिटांसाठी का होईना, पण आवर्जून बोलायचो. त्यांच्या गल्फ देशांच्या दौऱ्यावरचे काही किस्से त्यांनी सांगितलेले अजूनही आठवतात. भारतीय मूळची परदेशात स्थायिक झालेली जनता येत्या काळात देशाच्या विज्ञान संस्कृतीचे राजदूत व्हावे, हे त्यांना 'सायन्स इंडिया फोरम' स्थापित करताना समजले होते. या व इतर देशांमध्ये 'विज्ञान आणि तंत्रज्ञान द्विपक्षीय वार्तेसाठी उपयुक्त मानव संसाधन आपल्या कुठल्याही दूतावासात नाही आहे, हे त्यांना प्रकर्षाने जाणविले होते. हे समझताच आम्ही काही संस्थांना एकत्र आणून एक समिती नेमली, ज्यांनी भारत सरकारला एक शिफारशी आणि अभ्यासपूर्वक अहवाल सादर केला.

भारतीय मूळचे परदेशातील वैज्ञानिकांना जोडणारे 'जीआयएसटी' व्यासपीठ त्यांच्या वैचारिक नेतृत्वाखाली छान बहरून आले आहे. मला आणि माझ्यासारख्या अनेक युवकांना ते नेहमीच ३०-४० वर्षांच्या कारकिर्दीचा आराखडा बनवा, असे सांगायचे. जसे ते लोकांना एका वैयक्तिक पातळीवर जोडायचे तसे संस्थांना आणि मंत्रालयांनासुद्धा त्यांनी जोडायला सुरुवात केली. पृथ्वी विज्ञान मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय, विज्ञान-तंत्रज्ञान मंत्रालय, रक्षा मंत्रालय, अणुऊर्जा विभाग आणि अंतरिक्ष विभाग येथील अनेक वैज्ञानिकांना आणि प्रशासकांना साचेबद्ध कार्यपद्धतीतून आंतरविद्याशाखीय कार्य कसे करावे ते वारंवार सांगत. भारत देशाच्या उदयास लागणारी सगळी साधने, सगळी सामग्री त्यांना तंतोतंत माहीत होती. त्याकरिता ते अगदी दृढ आणि मुत्सद्दी पद्धतीने कार्यरत होते – हे मी अगदी थोडक्यात आपण सर्वांना सांगू इच्छितो.

जयंतजींनी आपले आयुष्य अगदी नि:स्वार्थीपणे, पण देशहितासाठी खपविले. काळाने त्यांना आपल्यातून दूर नेले असले तरी आधुनिक भारतीय विज्ञान परंपरेत त्यांचे स्थान अजरामर झाले आहे. २१व्या शतकातील भारत कसा असेल, यावर चर्चा आपण ऐकतच असतो. पण, मी अगदी आस्थेने म्हणीन की, जयंतजींसारख्या थोरांच्या अथक सेवेतूनच भारताचे २१व्या शतकतील अग्रणीय स्थान बनेल. 'सर्वे भवन्तु सुखिनः' या मंत्राशी प्रज्वलित झालेले त्यांचे उल्लेखनीय आयुष्य आम्हा सर्व युवकांसाठी प्रेरणादायक असणार आहे. जयंतजी आप अमर हैं!

**(लेखक फ्लेम युनिव्हर्सिटी, पुणे येथे प्राध्यापक असून आरआयएस, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली येथे सल्लागार आहेत.)**

---



# जयंतरावजी सहस्रबुद्धे


## एक विलक्षण विज्ञानतपस्वी

**प्रसाद वाघमारे**

'विज्ञान भारती'चे राष्ट्रीय संघटन सचिव तथा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक जयंत श्रीकांत सहस्रबुद्धे यांनी शुक्रवार, दि. २ जून रोजी पहाटे ४ वाजता अखेरचा श्वास घेतला. दि. ३ सप्टेंबर, २०२२ रोजी झालेल्या रस्ता अपघातापासून ते प्रकृतीशी निकराने झुंज देत होते. 'विज्ञान भारती'चे कार्य विश्वभरामध्ये प्रसारित करण्याचे महत्त्वपूर्ण योगदान जयंतरावांनी दिले. आपल्या अल्प अशा आयुष्यामध्ये विलक्षण काम करताना जयंतरावांनी भारतीय विज्ञान तथा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आंदोलनामध्ये भारतीय वैज्ञानिकांनी दिलेल्या योगदानावरील दृष्टिक्षेप यावर मौलिक कार्य केले. भारत सरकारच्या भारतीय स्वातंत्र्याच्या 'आझादी का अमृत महोत्सव' या कार्यक्रमांतर्गत जयंतरावांनी हा विषय जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी महत्त्वपूर्ण काम केले. जयंतराव अखेरपर्यंत 'विज्ञान भारती'च्या अनेक आयाम तसेच वेगवेगळ्या गतिविधींना मार्गदर्शन करण्याचे व ते कार्यरत ठेवण्याचे कार्य करत होते.

**आपल्या अल्प अशा आयुष्यामध्ये विलक्षण काम करताना जयंतरावांनी भारतीय विज्ञान तथा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आंदोलनामध्ये भारतीय वैज्ञानिकांनी दिलेल्या योगदानावरील दृष्टिक्षेप यावर मौलिक कार्य केले. भारत सरकारच्या भारतीय स्वातंत्र्याच्या 'आझादी का अमृत महोत्सव' या कार्यक्रमांतर्गत जयंतरावांनी हा विषय जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी महत्त्वपूर्ण काम केले.**

जयंतरावांचा जन्म दि. १७ एप्रिल, १९६६ रोजी गिरगाव (मुंबई) येथे झाला. त्यांचे वडील श्रीकांत सहस्रबुद्धे हे आजही संघकार्याशी जोडलेले आहेत. त्यांची आईदेखील राष्ट्र सेविका समितीची सक्रिय कार्यकर्ता राहिलेली आहे. जयंतरावांनी मुंबई विश्वविद्यालयातून 'बीएसी टेक' (इलेक्ट्रॉनिक्स)पर्यंत शिक्षण घेऊन 'भाभा टोमिक रिसर्च सेंटर' या ठिकाणी काही काळ नोकरी केली. संपूर्ण सहस्रबुद्धे परिवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलेला असल्याने त्यांच्यावरील संघसंस्कार हे पूर्वीपासूनच रुजलेले होते आणि त्यातूनच १९८९ साली त्यांनी नोकरी सोडून पूर्णवेळ संघ प्रचारक बनून महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये संघ प्रचाराचे कार्य केले. गोवा राज्याच्या विभाग प्रचारकाच्या जबाबदारीनंतर २००१ ते २००९ पर्यंत ते कोकण प्रांताचे प्रांत प्रचारक राहिलेले. संघ प्रचारक हो. वे. शेषाद्री यांचेही ते सचिव



*'भारतीय अवकाश संशोधन संस्था' अर्थात 'इस्रो'चे माजी अध्यक्ष के. सिवन यांना 'सायन्स इंडिया'चा अंक भेट देताना जयंतराव सहस्रबुद्धे*

राहिलेले आहेत. जयंतरावांकडे २००९ पासून 'विज्ञान भारती'च्या राष्ट्रीय संघटन सचिव पदाचे दायित्व होते. त्यांचे व्यक्तिमत्व नेहमी एक व्यासंगी असेच राहिलेले आहे. त्यांची कला, विज्ञान, स्वामी विवेकानंद आणि विज्ञान तसेच भारतीय वैज्ञानिकांचे जीवन ज्यामध्ये महिंद्र लाल सरकार, प्रफुल्लचंद्र राय, जगदीश चंद्र बोस, मेघनाद सहा, सर सी. व्ही. रमण इत्यादींवर व्याख्याने अजरामर आहेत.

'विज्ञान भारती'च्या सर्व गतिविधि, 'विद्यार्थी विज्ञान मंथन', 'टेक्क फॉर सेवा', 'आयआयएसएफ विश्ववेद विज्ञान संमेलन', 'भारतीय विज्ञान संमेलन' इ. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत आहेत. 'विज्ञान भारती'चे अनेक आयाम आहेत. जसे 'वर्ल्ड आयुर्वेद फाऊंडेशन', 'जीआयएसटी' तथा 'ग्लोबल इंडियन सायंटिस्ट ॲण्ड टेक्नोक्रॅट फोरम', 'न्यासा' तथा 'नॅशनल आयुर्वेद स्टुडंट्स युथ असोसिएशन', 'शक्ती' इत्यादींना नवी दिशा तसेच मार्गदर्शन देण्याचे कार्य जयंतराव करत होते.

सप्टेंबर २०१८ मध्ये जयंतरावांच्या परभणी येथील प्रवासाबद्दल एक आठवण येथे आवर्जून सांगावीशी वाटते. आपल्या व्यस्त कार्यक्रमातूनही वेळात वेळ काढून जयंतरावांनी परभणी येथे भेट देऊन वेगवेगळ्या विज्ञान चळवळींचे कार्य जाणून घेतले. तसेच, भविष्यामध्ये विज्ञानकार्य अजून प्रभावीरित्या कसे करता येईल, याबद्दल मार्गदर्शन केले. मला त्यांचा प्रवासी प्रबंधक होण्याची संधी लाभली व हे व्यक्तिमत्व जवळून पाहता आले, हे माझे भाग्यच! परभणीमधील दिवसभराच्या कार्यक्रमांमध्ये न कंटाळता परभणीतील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील विविध विभागांना भेट देऊन तज्ज्ञ प्राध्यापक, शिक्षकांशी व शालेय विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला. परभणीमधील 'परभणी ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी'अंतर्गत होणाऱ्या वेगवेगळ्या विज्ञान कार्यक्रमांची माहिती घेऊन त्यामध्ये मोलाचे असे मार्गदर्शन जयंतरावांनी केले. तरुणालाही लाजवेल असा सळसळता उत्साह, लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत संवाद साधण्याची त्यांची हातोटी, कितीही तळागाळाचा कार्यकर्ता जरी असला तरी तो जयंतरावांशी अगदी मनमोकळेपणाने बोलू शकत असे. सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि त्यानंतरच त्यावर त्या व्यक्तीच्या कलेने त्या शंकांचे समाधान करणे, हे फक्त जयंतरावच करू शकत होते. अशा या विज्ञानात तपस्वीला 'परभणी ॲस्ट्रोनॉमिकल्स सोसायटी'च्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली.



*'भारतीय अवकाश संशोधन संस्था' अर्थात 'इस्रो'मध्ये क्रायोजेनिक इंजिन तंत्रज्ञानाच्या विकासात अमूल्य योगदान देणारे पद्मभूषण नंबी नारायणन यांना 'सायन्स इंडिया' मासिकाचा अंक भेट देताना जयंतराव सहस्रबुद्धे.*

जयंतरावांच्या निधनामुळे विज्ञान कार्यक्षेत्रामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. जरी ती पोकळी भरून निघणारी नसली तरी जयंतरावांनी आखून दिलेल्या या विज्ञान कार्य प्रसारातील मार्गावर सर्व विज्ञानप्रेमींनी कार्य करून विज्ञान तळागाळापर्यंत सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करावे व अखिल विश्वाला विज्ञानसंपन्न करावे, या विज्ञान तपस्वीला परिपूर्ण श्रद्धांजली ठरेल.

**(लेखक परभणी ॲस्ट्रोनॉमिकल सोसायटी, परभणीचे सहसचिव आहेत.)**

---

# दादांसोबतचा ज्ञानमयी प्रवास...

**शिल्पा वाडेकर**

'जयंतराव यांना भेट', नाना उपाख्य डॉ. क. कृ. क्षीरसागर (विज्ञान भारती) यांनी आवर्जून सांगितलं. फोन नंबरही दिला. मी जरा संकोचानेच फोन केला....'विज्ञान भारतीचे ज्येष्ठ पदाधिकारी, मला वेळ देतील ना? प्रवासात, बैठकीत, कार्यक्रमात असताना फोन वाजला, तर'.....धाडस करून फोन केलाच....."नमस्कार, हं हं बोला शिल्पाताई, नानांनी तुमच्या संशोधनाबाबत सांगितलं... काय सहकार्य हवं आहे?" इति जयंतराव. "प्रत्यक्षात भेटून सांगितलं, तर चालेल का?", मी विचारलं. "चालेल की, मी पणजीला आहे. भेटू."

आश्वस्थ आवाजाने मन शांत झालं... सकारात्मक दिशेची जाणीव झाली... पण, दडपण होतंच त्यांच्या मोठेपणाचं.

काही दिवसांतच पणजीला भेटलो. एक बैठकच झाली. अनेक विषयांवर चर्चा झाली. त्यात विज्ञानाचा पाठपुरावा होताच. सिंधुदुर्ग व गोवा येथील देवतांबरोबर लोकसंस्कृतीचा अभ्यास करते, म्हटल्यावर मंद स्मित स्थिरावलं. हा विषय निवडायचं कारण विचारलं, विज्ञान काय या विषयात? मनोभूमिका आणि लोकमानस, हे आयाम या विषयाला बैठक देतात, मी सांगितलं आणि त्यांनी गोव्यातील तज्ज्ञांच्या भेटीची व इतर व्यवस्था केली. क्षणाचाही विलंब न करता, मला जयंतदादांनी विनायकराव खेडेकर यांच्याकडे जाण्यास सुचवले, नव्हे आग्रहच केला. इतकंच नव्हे, तर त्यांची वेळ घेऊन स्वतः त्यांच्या घरी सोडले. 'एक संशोधक सोपवतोय' असं म्हणून पुढील बैठकीला दादा निघून गेले.

'पद्मश्री' विनायकराव खेडेकर हे गोव्यातील लोकसंस्कृतीचा चालताबोलता कोश... त्यांचं मार्गदर्शन लाभणार म्हणून खूप आनंद वाटला. पण, आता वेगळं दडपण होतं. गप्पांच्या ओघात दादांनी सांगितलं होतं की, विनायकराव उगाच कोणाला 'एन्टरटेन' करत नाही. संशोधनाचा आव आणणाऱ्यांना तर मुळीच नाही. 'फिल्ड वर्क' नसणाऱ्यांना तर मुभाच नाही. पण, तुमची माहिती सांगितली आणि त्यांनी १५ मिनिटे देऊ केलीत....

माझ्या मनाची अवस्था विचित्र होती. 'फिल्ड वर्क'बद्दल खात्री होती. पण, विनायकराव यांना रूचेल ना? असं वाटून गेलं. प्रत्यक्षात विनायकराव यांनी मला दीड तास दिला. परतीचा प्रवास होता माझा म्हणून चर्चा थांबवली आणि 'पुन्हा गोव्याला माझ्याकडे हक्काने या', हे आश्वासन घेऊन मी गोवा सोडलं. आजपर्यंत नेहमीच जाणं-येणं आहे, माझं विनायकराव यांच्याकडे...."शिल्पा, तुला आमंत्रणाची गरज नाही, तू केव्हा घरी येऊ शकतेस." ही आमच्या नात्याची ओढ निर्माण झाली. मला गुरू भेटले. जयंतदादांच्या पुढाकारातून हे शक्य झालं. मी ऋणाईत आहे... कालांतराने आम्ही भारतीय इतिहास संकलन समितीतर्फे करत असलेल्या लिंब (सातारा) येथील उत्खननासंदर्भात प्रवास केला. जयंतदादा आवर्जून आले होते. पुरातत्त्वशास्त्राबाबत उत्सुकता तर होतीच आणि तसं वाचनही... दादांसोबतचा प्रवास हा ज्ञानमयीच असे. वाईट वाटते ते, त्यांच्या देखत माझं संशोधन पूर्ण झालं नाही याचं. पण, त्यांचा हसतमुख चेहरा आणि आश्वासक सहकार्य आठवलं की पुन्हा कामाला लागावंच लागतं. अशा उत्साही मार्गदर्शनाला मुकावं लागलं. त्यांच्या विषयाचं, संघटनेचं नुकसान तर आहेच, पण माझ्यासारख्या लोकांचं वैयक्तिक नुकसानदेखील आहे. पण, देवकार्य आहे, ते पुढं होतंच राहणार, हे त्यांचे बोल प्रेरणा देतच राहतील. जयंतराव सहस्त्रबुद्धे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**(लेखिका भारतीय लोकसंस्कृतीच्या अभ्यासक असून भारतीय इतिहास संकलन समिती प. महाराष्ट्र कार्यकारिणीच्या सदस्य आहेत.)**
**९८५०५३९२०१**

# जयंत स्मृती



## अष्टपैलू विज्ञानसेवक काळाच्या पडद्याआड...

**'विज्ञान भारती'चे राष्ट्रीय संघटन मंत्री म्हणून बहुआयामी व्यक्तिमत्वाचे धनी असलेले जयंतराव सहस्रबुद्धे. त्यांचे आपल्यात नसणे, ही संघटनेबरोबरच राष्ट्राचीसुद्धा अपरिमित हानी होय!**

**वसुंधरा साठे**

पहाटे पहाटे आलेल्या बातमीवर विश्वास ठेवायला मन तयार नव्हते. जयंतराव आपल्यात नाही, ही 'विज्ञान भारती'च्या कार्यकर्त्यांसाठी असहनीय बातमी होती. मनाच्या अस्वस्थ अवस्थेत मीनाताईस फोन केला. खरीच बातमी होती ती. आत्ता आत्ता तर मी त्यांना भेटून आले होते. यावर्षीच्या गुढीपाडव्याला जयंतरावांना भेटायला मी पनवेलच्या पटवर्धन हॉस्पिटलमध्ये गेले होते. 'जयंतराव' अशी हाक मारताच त्यांनी डोळे उघडले. क्षणभरच का होईना, परंतु निश्चितपणे ओळखीचे भाव डोळ्यात दिसले मला. गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्यावर एक चिरपरिचित स्मित चेहऱ्यावर झळकले. जयंतराव या सगळ्या दुष्टचक्रातून बाहेर येतील ही खात्री पटली. 'जयंतराव, तुम्ही सुरू केलेल्या विज्ञान चळवळीस आम्ही 'विभा' कार्यकर्ते अधिक जोमाने पुढे नेऊ,' ही खात्री देऊन मी हॉस्पिटलमधून बाहेर पडले आणि आज असा हा वज्राघात? का हो अशी घाई केलीत जाण्याची?

जयंतराव म्हणजे भारतीय विज्ञानाची ओळख भारतीयांना नव्याने करून देण्यासाठी जीवाचे रान करणारा एक विज्ञानयात्री, प्रखर



राष्ट्रभक्त, तीक्ष्ण बुद्धीचे लेणं घेऊन आलेला एक अनोखा प्रबुद्ध, परकीय शिक्षण प्रणालीचे झापडं डोळ्यांवर बांधून आत्मविस्मृतीस गेलेल्या भारतीय मानसिकतेस आव्हान देणारा भारतमातेचा एक मौल्यवान सुपुत्र... इतिहासात कुठेही नोंद नसलेल्या, स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय संशोधकांनी केलेल्या अद्भुत व अतुलनीय कार्यास आपल्याच लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य अविरतपणे करणारा एक विज्ञानसेवक. 'विज्ञान भारती'चे राष्ट्रीय संघटन मंत्री म्हणून बहुआयामी व्यक्तिमत्वाचे धनी असलेले जयंतराव सहस्रबुद्धे. त्यांचे आपल्यात नसणे, ही संघटनेबरोबरच राष्ट्राचीसुद्धा अपरिमित हानी होय.

मला आठवते 'विदर्भ विज्ञान भारती'चे पहिले विज्ञान शिबीर पंडित बच्छराज व्यास शाळेत झालेले. नागपुरातून 'विभा'शी जुळलेल्या २० व्हिएसएफ शाळांमधून १४९ विद्यार्थी त्या शिबिरात सहभागी झाले होते. सहा प्रयोगशाळांतून प्रयोग करताना विद्यार्थ्यांचा उत्साह भरभरून वाहणारा असायचा. समारोपाच्या कार्यक्रमाला जयंतराव होते. समारोपीय कार्यक्रमात एका विज्ञानसंगीत नाटिकेचेही सादरीकरण शिबिरार्थींनी केलेले. कोण म्हणून कौतुक करावे जयंतरावांनी! शिक्षकांशी बोलताना ते म्हणाले होते, ''शिक्षकाने विज्ञान पठडीबद्ध शिक्षणप्रणालीचा भाग म्हणून शिकवू नये. शिक्षकाने प्रथम विज्ञानाचे खरे अभ्यासक व्हावे व विद्यार्थ्यांमध्येही हीच प्रवृत्ती रूजवावी.'' आणि मला म्हणाले, ''साठे मॅडम, अशा विज्ञान शिबिरांना 'विज्ञान संस्कार शिबीर' असे नामकरण हवे.'' या एका शब्दाने विज्ञान शिबिराला केवढा मोठा अर्थ दिला जयंतराव तुम्ही! त्यानंतर 'विज्ञान संस्कार शिबीर, म्हणजे 'विभाचे आयोजन' अशी अनोखी ओळख 'विदर्भ विभा'स मिळाली. आम्हा कार्यकर्त्यांमध्ये विज्ञान संस्कारांचे महत्त्व पेरून गेलाय तुम्ही!

साप्ताहिक मिटींगच्या निमित्ताने विविध वैज्ञानिक विषयांच्या चर्चेतून सहज बाहेर पडलेले विद्यार्थीप्रणित विषय म्हणजे 'व्हिएसएफ', प्रगती, नवीन, कुतूहलसारखे प्रकल्प यशस्वीपणे राबविलेले बघून जयंतरावांची कौतुकाची थाप हमखास आम्हा कार्यकर्त्यांच्या पाठीवर पडायची. भारतीय वैज्ञानिकांनी स्वातंत्र्यपूर्व काळात केलेले कार्य गोष्टीरूपात विद्यार्थ्यांसमोर आणण्यासाठी साहित्यनिर्मिती होण्याची गरज आहे, अशी इच्छा जयंतरावांनी व्यक्त केली आणि 'विभा विदर्भ'ने या कार्यासाठी समन्वयक म्हणून माझ्यावर जबाबदारी सोपविली. कार्यकर्त्यांनी चौफेर सर्व आयामांवर लक्ष ठेवत भारतीय विज्ञान प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, ही जयंतरावांची दूरदृष्टीता. १५ भारतीय वैज्ञानिकांच्या जीवनचरित्रांचे व कार्याचे आढावे घेणारी 'विज्ञान सेनानी' नावाची पुस्तिका 'विज्ञान सर्वत्र पूजन्ते'च्या समारोपीय कार्यक्रमात प्रकाशित झाली. परंतु, व्यस्ततेमुळे जयंतराव या कार्यक्रमास येऊ शकले नव्हते. पुढे जेव्हा जयंतराव नागपुरात आले, तेव्हा एक दिवस आमच्याकडे रात्रीच्या जेवणास आलेले. दिवसभराच्या व्यस्त कामाचा थकवा चेहऱ्यावर कुठेही नव्हता. जाताना मला म्हणाले, ''साठे मॅडम! पुस्तकाचे काय झाले?'' त्यांना द्यायचे म्हणून मराठी, हिंदी, इंग्रजी असे तीनही 'विज्ञान सेनानी'चे अंक हातात ठेवलेच होते मी. ते जयंतरावांना दिल्यावर मीही कृतकृत्य झाले. ''काय? तीनही भाषांतून प्रकाशित केले?'' असे कौतुकमिश्रीत शब्द त्यांच्या तोंडून ऐकताना काय आनंद झाला होता. कार्यकर्त्याला प्रेरित करण्याची एक अद्भुत कला जयंतरावांकडे होती. पुढे १५ दिवसांनी जयंतरावांचा फोन आलेला म्हणाले, ''चांगले कार्य केले आहे विदर्भ प्रांताने.'' पुढच्या भेटीत पुस्तिका लेखन करणाऱ्या लेखिका, लेखक यांच्याशी संवाद करता येईल, असे म्हणाले. पण, तो प्रसंग येणे नियतीला मान्य नव्हते. पुढे महिन्याभरातच जयंतरावांच्या अपघाताची दुर्दैवी बातमी समजली. मृत्यूशी नऊ महिन्यांच्या चिवट संघर्षानंतर ईहलोकीची यात्राही संपुष्टात आली. जयंतराव का हो अवेळी जाण्याची घाई केलीत? तुमच्या पावन स्मृतीस मनोभावे त्रिवार वंदना!

**(लेखिका विज्ञान भारती, विदर्भ प्रांत कार्यकारिणी सदस्य आहेत.)**

## जयंतराव एक प्रसन्न व्यक्तिमत्व

**प्रभाकर इंगळे**

जयंतराव म्हटले की, डोळ्यासमोर येते ते प्रसन्न आणि स्मित हास्यधारी व्यक्तिमत्व. जयंतरावांसोबत पहिल्यांदा भेट झाली ती फेब्रुवारी २०१० मध्ये, पुण्याहून नाशिकला जात असताना. फर्ग्युसन महाविद्यालयातील रसायनशास्त्राचे प्राध्यापक डॉ. समीर ओंकार यांनी नाशिक येथे दोन दिवसांची विज्ञान लेखनावर कार्यशाळा आयोजित केली होती.

पुण्याहून नाशिकला निघताना कारमध्ये मी, जयंतराव आणि 'पब्लिकेशन अॅण्ड इन्फार्मेशन डायरेक्टोरेट', दिल्ली (पीआयडी)मधील माझे माजी सहकारी आणि तेव्हा 'एनसीएसटीसी'मध्ये कार्यरत असलेले डॉ. मनोज पटैरिया होते. त्या पहिल्या प्रवासातच जयंतरावांचे अभ्यासू व्यक्तिमत्व अनुभवायला मिळाले.

नंतरही आम्ही खूप एकत्र प्रवास केला, बैठका घेतल्या, कार्यशाळा आयोजित केल्या. त्यामध्ये 'जीस्ट' (२०१०), 'टेक फॉर सेवा' (२०१३), 'जीएम क्रॉप्स' (२०१५), 'भारतीय विज्ञान संमेलन' (२०१७), 'विश्व–वेद–विज्ञान संमेलन' (२०१८), 'विभा'च्या वार्षिक सर्वसाधारण सभा (भोपाळ २०१६, बंगळुरु २०१८) आदींचा विशेष उल्लेख करावा लागेल. मी कॉन्फरन्स समितीचा प्रकाशन प्रमुख या नात्याने वारंवार भेटी व्हायच्या. 'जीएम क्रॉप्स'ची कॉन्फरन्स (राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा) 'एनसीएल'मध्येच आयोजित करण्यात आली होती. त्यामुळे कॉन्फरन्सचा आढावा घेण्यासाठी जयंतराव वारंवार 'एनसीएल'ला येत असत. अशाच एका बैठकीनंतर मी सर्वांना कॅन्टीनमध्ये चहापाणी घेण्यासाठी निघणार तोच जयंतरावांनी सूचविले की, कॅन्टीनमध्ये कशाला, आपण तुमच्या घरीच चहापाणी घेऊ. तेव्हा संध्याकाळचे ६.३० वाजले होते. मी त्यांना सांगितले की, माझी सहचारिणी बँकेत नोकरी करत असल्याने रात्री ८ वाजल्यानंतर घरी येते. तुमची गैरसोय होईल. तेव्हा जयंतराव म्हणाले की, ''आपण स्वतः चहा करू, तुम्ही काळजी करू नका.''

मे २०१४ नंतर माझे पाठीचे दुखणे वाढले होते. जुलै २०१५ मध्ये अशाच एका आढावा बैठकीनंतर जयंतराव मला म्हणाले की, ''तुम्ही एक महिना वहिनीसोबत बंगळुरुला जाऊन नैसर्गिक उपचार करून घ्या.'' काही आठवड्यांनंतर त्यांनी मला त्याची पुन्हा आठवण करून दिली. मी काही गेलो नाही, शेवटी जून २०१६ मध्ये 'ऑपरेशन' करावे लागले.

विश्व–वेद–विज्ञान संमेलनच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी पुण्यात एरंडवणे येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला जयंतरावाव्यतिरिक्त श्रीकांत कुलकर्णी आणि डॉ. मानसी माळगांवकर हजर होते. रस्त्याचे काम चालू असल्याने मी तेथपर्यंत पोहोचू शकत नव्हतो. जयंतराव म्हणाले, ''टॅक्सी सोडून द्या आणि तुम्ही कुठे आहे ते सांगा.'' दोन मिनिटात जयंतराव स्वतः स्कुटर घेऊन आले होते.

'जीएम क्रॉप्स'च्या अशाच एका बैठकीदरम्यान जयंतरावांनी 'आयआयएसएफ'बद्दल सांगितले. तेव्हा, 'आयआयटी' दिल्लीत भरणाऱ्या पहिल्या 'आयआयएसएफ'बद्दल नियोजन सुरू होते. काही बैठकांना मी हजर राहिलो. पण, पहिल्या 'आयआयएसएफ'ला मी उपस्थित राहू शकलो नाही. २०१६ मध्ये दिल्लीत राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळा येथे आयोजित दुसऱ्या 'आयआयएसएफ'ला मी तीन दिवस उपस्थित होतो. तेव्हा जयंतराव म्हणाले की, ''तुम्ही सर्व दिवस आहात ना?'' मी सांगितले की, ''नाही, मी तीन दिवस आहे, नंतर परत जाणार.'' तेव्हा त्यांचे उत्तर होते की, ''तुम्ही सर्व दिवस हजर राहायला हवे.'' त्यातून बोध घेऊन नंतर चेन्नई (२०१७), लखनऊ (२०१८), कोलकाता (२०१९) 'आयआयएसएफ'ला मी सर्वच दिवस हजर राहिलो. चेन्नईच्या वेळी मी अण्णा विद्यापीठाच्या परिसरात एका हॉलकडून दुसरीकडे जात होतो. माझ्याजवळ एक कार येऊन थांबली, गाडीत डॉ. शंकरराव तत्ववादी आणि जयंतराव होते. मला म्हणाले, ''चला आपण विज्ञान चित्रपट महोत्सवाकडे जाऊया.'' म्हणजे रस्त्याने जात असलेल्या व्यक्तीला ओळखून गाडी थांबून सोबत घेऊन जाणारे जयंतराव.



*'आयआयएसएफ' २०१९च्या वेळी वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय, चिपळूण येथे वृक्षारोपण करताना जयंतराव*

मार्च २०१९मध्ये पुण्यात 'विभा' कार्यकर्त्यांच्या बैठकीत मला जयंतरावांनी तेव्हापर्यंतच्या 'आयआयएसएफ'बद्दल सादरीकरण करायला सांगितले होते.

'सीएसआयआर–८००'प्रकल्पांतर्गत कोकणात काय काम करता येईल, हे बघण्यासाठी आम्ही ऑगस्ट २०१८ मध्ये कोकणात एकत्र गेलो होतो, सोबत डॉ. मानसी माळगांवकर होत्या.

जयंतराव उपचारासाठी पनवेलला असताना मानसी आणि अभिषेकसोबत जयंतरावांना बघण्याची चर्चा झाली होती. पण, योग जुळून आला नाही. १५ दिवसांपूर्वी मुकुंद देशपांडे यांच्यासोबत बैठकीत आम्ही दोघांनी त्यांना चिंचवडला जाऊन बघायला जाण्याचे ठरवले होते, पण त्याआधीच त्यांच्या जाण्याची वाईट बातमी कानावर पडली.

'एनसीएल'मध्ये कॉन्फरन्समुळे खूप बॅग जमा व्हायच्या, बऱ्याचदा मी बॅग घेत नव्हतो आणि घेतली, तर एअरपोर्टला सोडणाऱ्या चालकाला देऊन टाकायचो. कधीतरी एखादी चांगली बॅग घरी आणून ठेवायचो. असेच एकदा सोबत बसलो असताना, मी आयोजकांना बॅग नको म्हणून सांगितले. म्हंटलं, आधीच खूप बॅग्स घरी पडल्या आहेत, आणखी किती गोळा करायच्या. जयंतराव म्हणाले, ''त्यातील एखादी बॅग मला द्या.'' मी म्हंटलं, ''पुण्याला आलात की घरून जी आवडेल ती बॅग घ्या.'' पण, त्यानंतर त्यांचा घरी येण्याचा योग आला नाही आणि कधी काहीही न मागणाऱ्या जयंतरावांना मी बॅग देऊ शकलो नाही. ती खंत माझ्या मनात राहील.

**(लेखक वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतून मुख्य वैज्ञानिक पदावरून निवृत्त झाले. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या पब्लिकेशन आणि सायन्स कम्युनिकेशन विभागाचे ते १७ वर्षे विभागप्रमुख होते. त्याआधी ते दिल्लीत 'सीएसआयआर'च्या पीआयडी/निस्कॉम/निस्केअरमध्ये वैज्ञानिक/संपादक होते.)**

## मोठी सामाजिक आणि वैयक्तिक हानी

**अमिता आपटे**

संघ प्रचारक, 'विज्ञान भारती'चे संघटनमंत्री जयंतराव सहस्रबुद्धे यांचे प्रदीर्घ आजाराने दि. २ जून रोजी पहाटे दुःखद निधन झाले. जयंतराव यांची माझी खूप जुनी ओळख. म्हणजे २००५ पासूनची. तेव्हा ते कोकण प्रांत प्रचारक होते. त्यावर्षी चिपळूणच्या नागालॅण्ड विद्यार्थिनी वसतिगृहाची सुरुवात झाली. त्यानिमित्ताने जयंतरावांसोबत बैठकी होत असत. तेव्हा १३ मुलींची व्यवस्था वसतिगृहात होती. व्यवस्थापिका सुचितताई भागवत, मदतनीस पुष्पाताई दांडेकर होत्या. दोन–तीन मोठ्या महिला, मी आणि माझ्या दोन–तीन मैत्रिणी वसतिगृहात नियमित असायचो. मुलींचा अभ्यास घेणे, त्यांच्याशी खेळणे, दुखलंखुपलं पाहणे, त्यांचे कपडे, अभ्यास इत्यादींकडे लक्ष देणे आम्ही अगदी मजेत, आनंदाने करायचो. मुली अगदीच शाळकरी असल्याने त्यांना घरची, आई–वडिलांची आठवण येई. मग त्यांना प्रेमाने जवळ घेणे, मायेने समजावणे हेही सहजपणे करायचो. पण, अगदी सुरुवातीला आम्हाला मुलींशी कसे, काय बोलावे? भाषा अशा अनेक अडचणी होत्या. त्या काळात जयंतराव, अतुलजी जोग असे वरिष्ठ आमची बैठक घेत. नागालॅण्डमधील परिस्थिती, मुलींची परिस्थिती, आपल्याला नक्की काय करायचे आहे? कोणत्या उद्दिष्टाने मुली इथे आल्या आहेत? त्यांची काळजी घ्यायची म्हणजे काय करायचे? अशा अनेक विषयांवर चर्चा होत असे. मीही अगदी कॉलेजकन्या असल्याने हे सगळे प्रत्यक्ष संघसंस्कारच जणू माझ्यावर होत होते. ईशान्य भारताची पहिली ओळख झाली ती अशा बैठकांमधून! नागा मुलींसाठी ते 'जयंत अंकल' होते. मुलींशी थोडावेळ का होईना, पण गप्पा मारल्याशिवाय कधी चिपळूण सोडत नसत. पूर्वांचल समजलेले आणि पूर्वांचलावर मनापासून प्रेम केलेले आमचे गुरू, मार्गदर्शक म्हणजे जयंतराव. माझं शिक्षण पूर्ण होण्याच्या मार्गावर असताना त्यांनी मला 'नागालॅण्डला निदान सहा महिने दे' असे सांगितले होते. तेव्हा मला वैयक्तिक आकांक्षांची क्षितिजे दिसत होती आणि मी त्यांना स्पष्ट 'नाही' म्हणून सांगितले. इतक्या मोठ्या व्यक्तीने आपल्यावर विश्वास ठेवून काही सांगितले जे आपण करत नाही, याची बोच माझ्या मनात कायम राहिली. पण, मग संधी मिळताच ईशान्य भारताचा मार्ग धरला. उशिराने आणि कणभर तरी का होईना, आपण सांगितलेले काम करतो आहोत, याचे समाधान आहे. 'कोविड'च्या अगदी आधी एका लग्नात भेट झाली होती. तेव्हा ते मला म्हणाले, ''तुझे उद्योग कानावर येतायत,'' असं कौतुक करणारे जयंतराव मात्र गेले. त्यांच्या अपघाताची बातमीही अपघातानेच मला कळली. हे कधी ना कधी घडणार याची धाकधूक गेले अनेक महिने मनात आहे. तरी आज बातमी आल्यावर फार वाईट वाटतेय. सौम्य भाषा, सुस्पष्ट विचार, समोरच्याची अडचण समजून योग्य मार्गदर्शन करणारे, अत्यंत सालस, कुशाग्र बुद्धीचे, तासून तासून घडवलेले व्यक्तित्व असे अकारण आपल्यातून निघून जावे, ही फार फार मोठी सामाजिक आणि माझ्यासाठी वैयक्तिक हानी आहे. जड अंतःकरणाने श्रद्धांजली.... श्रीराम!

### जयंतरावांचे संस्मरणीय आणि प्रेरणादायी कार्य

"जयंतरावांच्या विचारांनी हजारो तरुण संशोधकांना प्रेरणा दिली. जयंतराव एक मोठे समाजसुधारक आणि दयाळू माणूस होते. ज्ञान, विज्ञान, अध्यात्म आणि भारतीय सनातन परंपरेच्या प्रचारासाठी अत्यंत कटिबद्ध. अत्यंत संवेदनशील, नम्र, नेहमी हसतमुख आणि मार्गदर्शन करण्यात आनंदी. कोणत्याही मदतीसाठी २४ तास उपलब्ध. 'विज्ञान भारती'ला नवी ओळख देण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. स्वतंत्र चळवळीतील भारतीय शास्त्रज्ञांची भूमिका, वैदिक आणि आधुनिक विज्ञान, स्वामी विवेकानंद आणि विज्ञान इत्यादींवरील त्यांच्या विचारांनी हजारो तरुण संशोधकांना प्रेरणा दिली आहे. 'वर्ल्ड आयुर्वेद फाऊंडेशन', 'सायन्स इंडिया' ही त्यांची काही मौल्यवान निर्मिती आहे. त्यांनी 'आयआयटी'सह अनेक संस्थांमध्ये 'आयकेएस केंद्रां'ची स्थापना केली. भारतीय ज्ञानपरंपरेला योग्य मान्यता मिळून देण्यासाठी त्यांचे योगदान आणि वैज्ञानिक संशोधनाला पाठिंबा देण्यासाठी त्यांचे प्रयत्न नेहमीच स्मरणात राहतील. ते सदैव आपल्या स्मरणात राहतील आणि आपल्याला प्रेरणा देत राहतील. ओम शांती...

**– भूषण पटवर्धन**

### जयंतराव सहस्रबुद्धे : भावपूर्ण श्रद्धांजली

"जयंतरावांनी दोन–तीन वेळा 'बीएआरसी'मध्ये हिंदीतून व्याख्यान दिले होते. अगदी शुद्ध हिंदी भाषेत त्यांनी केलेले भाषण माझ्या आजही स्मरणात आहे. त्यांच्या भाषणात कुठेही इंग्रजी शब्दांचा उल्लेख नव्हता. एवढेच नाही तर भाषण करताना त्यांनी 'पीपीटी प्रेझेन्टेशन'चा कुठेही वापर केला नाही. त्यांचे भाषण आणि विचार अतिशय स्पष्ट होते. कुठलीही घटना उद्धृत करताना त्याची नेमकी तारीख आणि वेळही त्यांनी आपल्या भाषणात अगदी अचूकपणे नमूद केली. एकूणच काय तर भाषण करताना कुठलाही गोंधळ अगदी तसूभरही नव्हता. मला अजूनही आठवते की, त्यांच्या एका व्याख्यानाचा विषय होता स्वामी विवेकानंद आणि विज्ञान आणि दुसऱ्या एका भाषणाचा विषय होता भगिनी निवेदिता. 'विज्ञान भारती'च्या परीक्षेवेळी माझी त्यांच्याशी 'बीएआरसी'मध्ये चर्चाही झाल्याचे माझ्या स्मरणात आहे. एवढेच नाही तर दुबईवरुन आलेल्या एका विद्यार्थ्याने त्यावेळी 'विभा'ची परीक्षा उत्तीर्ण केली होती आणि सगळा कार्यक्रम मुंबईतील चेंबूरमध्ये संपन्न झाला होता. जयंतरावांचे वैशिष्ट्य म्हणजे, जयंतरावांची जीवनशैलीही अगदी साधी होती आणि ते हलका आहार घेत असत. त्यांना भावपूर्ण श्रद्धाजंली.

**– विजय झडे**, ऐरोली

## जयंतचा 'समतोल'



**जयंतरावांचे घर कधीही दुसऱ्याचे घर आहे, असे वाटले नाही. गणपती, दिवाळीमध्ये काकूंना, काकांना भेटायला जयंतराव आले की, मी नेहमीच त्यांच्या मागे घरी जात असे. तेव्हा छान गप्पा होत होत्या. जेव्हा जयंतरावांकडे 'विज्ञान भारती'चे काम येणार होते, तेव्हा 'समतोल'ची व्यवस्था अधिक सक्षम होण्यासाठी त्यांनी काही नियोजन केले होते. त्यातील एक भाग म्हणजे 'सेवा सहयोग'ची स्थापना...**

**विजय जाधव**

''नमस्कार, मी जयंत सहस्रबुद्धे. संघाचा प्रचारक आहे. तुला भेटायला आलो होतो. माधव जोशींनी सांगितले की, सामाजिक काम करणारा एक मुलगा विक्रोळी पार्कसाईटमध्ये राहतो. म्हणून बोलायला आलो.'' मला आजही तो दिवस आठवतो, जेव्हा जयंतराव माझ्या घरी आले होते. त्यांच्यासोबत विठ्ठलराव कांबळे व ज्ञानेश्वर जाधवही आले होते. पहिल्या भेटीतच जयंतरावांनी माझे मन जिंकून घेतले होते. खरंतर जादू वगैरे काही नाही, पण बोलण्यातला गोडवा व प्रचंड सकारात्मक ऊर्जा... कदाचित यामुळेच मी त्यांच्याकडे आकर्षित झालो.

स्टेशनवरच्या घरापासून दूर होणाऱ्या मुलांच्या बाबतीत कामाची चर्चा करताना एक दिवस स्टेशनवर भेटण्याचे ठरवले. त्यावेळी जयंतरावांशी दिवसभर गप्पा मारताना, बोलताना मला जरासुद्धा कंटाळा आला नाही. कारण, जयंतराव जास्त बोलत नव्हते, मीच खूप काही सांगण्याचा प्रयत्न करत होतो. पण, त्यांनी मला कुठेही डावलले नाही. मी अधूनमधून काही खात होतो. पण, जयंतराव यांनी काहीही चहा–पाणी घेतले नाही. जयंतराव पुढे कोकण प्रांताचे प्रचारक होते. त्यावेळेस सरसंघचालक सुदर्शनजी होते. त्यांची प्रथमतः भेट 'पितृछाया'मध्ये जयंतरावांनी घडवून आणली. 'समतोल'च्या कार्याची माहिती दिली. तेव्हा त्यांनी त्यांच्या खास भाषेत मला एक प्रकारे आदेशच दिला होता. ''अच्छा काम कर रहे हो तो करते रहो, बीच मे छोडना नही हैं।'' मी 'नाही नाही' म्हणत बाहेर पडलो. कारण, मला त्यांच्याबाबत काहीच माहीत नव्हते.

जयंतरावांनी त्यानंतर माझ्याबद्दल बोलताना 'प्राथमिक'ला जाणार म्हणून सांगितले. मला 'प्राथमिक', 'प्रथम' असे काहीच माहीत नव्हते. शिवाय त्यावेळी 'समतोल'चे कामही नवीनच होते. तरीही जयंतरावांच्या शब्दापुढे जाण्याची हिंमत झाली नाही. कारण, त्यामध्ये प्रेम आणि जिव्हाळा होता. २००७ मध्ये मी 'केशवसृष्टी' येथे 'प्राथमिक' केले. त्यानंतर मला थोडीफार संघकार्य पद्धत समजू लागली. 'समतोल'चे कार्य हे मुलांच्या पुनर्वसनाचे असल्याने माझा प्रवास राष्ट्रीय स्तरावर होता. 'समतोल'चे कार्य हे राष्ट्रीय स्तरावरचे कार्य आहे. २९ राज्यांतील घरातून वेगवेगळ्या कारणांनी मुंबई शहराकडे येणाऱ्या मुलांच्या समस्या खूप वेगवेगळ्या आहेत. एकूण ५० मनपरिवर्तन शिबिरे आतापर्यंत 'समतोल'ने केली. १८ हजारांपेक्षा अधिक मुलांना कुटुंबाशी जोडून विकासात्मक पुनर्वसन केले. पण, हे करताना ज्या मुलांचे मनपरिवर्तन झाले पाहिजे, अशी नैसर्गिक जागा शोधून तिथे 'स्वामी विवेकानंद मनपरिवर्तन केंद्र' उभे करण्याचे कार्य व त्याचा पाया जयंतरावांनी 'हिंदू सेवा संघा'बरोबर समतोल साधून केला. त्यावेळी डोंबिवलीचे श्रीपाद जोशी–स्वयंसेवक जयंतरावांबरोबर होते. २००७ मध्ये ही मुहूर्तमेढ रोवली गेली. आज 'मामणोली हिंदू सेवा संघा'त 'समतोल'ने आपली स्वतःची वेगळी ओळख तयार केली असून, प्रचंड विस्तार व कार्यपद्धत सक्षम केली आहे. त्याचे संपूर्ण श्रेय जयंतरावांना जाते. भटक्या मुलांबरोबर भटकत कार्य करणारा विजय भटकत राहू नये, त्यालाही निवारा असावा, त्याचेही घर असावे म्हणून जयंतरावांची आई म्हणजे आपल्या काकू त्यांनी खूप मोठी मदत घर घेण्यासाठी जयंतरावांमार्फत मला केली होती. काका तर आमच्यासोबत मित्रासारखे वागत होते.

जयंतरावांचे घर कधीही दुसऱ्याचे घर आहे, असे वाटले नाही. गणपती, दिवाळीमध्ये काकूंना, काकांना भेटायला जयंतराव आले की, मी नेहमीच त्यांच्या मागे घरी जात असे. तेव्हा छान गप्पा होत होत्या. जेव्हा जयंतरावांकडे 'विज्ञान भारती'चे काम येणार होते, तेव्हा 'समतोल'ची व्यवस्था अधिक सक्षम होण्यासाठी त्यांनी काही नियोजन केले होते. त्यातील एक भाग म्हणजे 'सेवा सहयोग'ची स्थापना. अशी एखादी मातृसंस्था असावी जी इतर संस्थांना मदत करेल, या विचाराने 'सेवा सहयोग'ची निर्मिती झाली तीसुद्धा जयंतरावांच्या प्रेरणेमुळेच! परंतु, 'समतोल'च्या कार्यात 'सेवा सहयोग'चा मदतीचा हात नेहमीच कमी राहिला. 'समतोल'च्या कार्यपद्धतीमध्येसुद्धा सक्षम व्यक्ती असतात म्हणून संजय हेगडे, किशोर मोघे, डॉ. जान्हवी केदारे, माधव जोशी अशा ज्येष्ठ, श्रेष्ठ व्यक्ती जयंतरावांनी 'समतोल'शी जोडल्या. म्हणूनच 'समतोल'चा समतोल अबाधित राहिला आणि वाढला.

जेव्हा त्यांच्या अपघाताची बातमी आली, तेव्हा आमच्या कुटुंबातील कोणीही त्या रात्री जेवले नाही; इतके प्रेम ते घरात नसतानाही घरातील लोक त्यांच्यावर करत होते. मुले, बायको, सासू–सासरे सर्व त्यांचे झालेले होते. त्यांनी आपले करून घेतले होते. खूप काही गोष्टी लक्षात आहेत, मनात घर करून आहेत, आठवणी जाता जात नाहीत. दि. २ जून मनावर कोरली गेलेली तारीख आहे. यापलीकडे निःशब्द आहे. संगीत, विज्ञानाचे ज्ञान, हसतमुख चेहरा, शांत स्वभाव... अशा कितीतरी पैलू असणारे आमचे जयंतराव सखा, मित्र, गुरुवर्य, मार्गदर्शक सर्व काही होते. शेवटी 'समतोल'चे एक वाक्य त्यांना तंतोतंत जुळते–

*उगता सूरज राह दिखाये, भाग रहा हैं अंधेरा,*
*आंधियों से, तूफानों से कब रुका हैं सबेरा!!!*

**(लेखक 'समतोल फाऊंडेशन'चे संस्थापक आहेत.)**

मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com
८
मुंबई, सोमवार, १२ जून २०२३

# जयंत स्मृती



विज्ञान वारकरी, निघाला वैकुंठी।
लगबग सुरू झाली, वैकुंठधामी।।
आलिंगन देण्या, लाडक्या भक्ताला।
वैकुंठीचा राणा, आतूर झाला।।
विज्ञान अध्यात्म, भिन्न जरी शब्द।
अभिन्न एकत्व, त्यांचे ठाई।।
जाणूनी हे मर्म, देह झिजवला।
राष्ट्रभाव मनोमनी, जागविला।।

– शिरीष पटवर्धन

## जयंतरावांची उर्वरित कामं पुढे नेणं हीच खरी श्रद्धांजली

जयंतराव माझे विभाग प्रचारक होते. फार कमी कालावधी होता, पण तरीही आयुष्यभर संपर्क होता. अत्यंत बुद्धिमान, संयमित, समर्पित आणि तरीही अतिशय साधी, पण नेमकी आणि टापटीप राहणी... गोव्यात विभाग प्रचारक असताना आम्ही सहकुटुंब गेलो होतो तेव्हा त्यांचा स्नेह अनुभवला. नंतरच्या काळात अनेक बैठकांमध्ये भेट व्हायची. पण, प्रत्येक भेटीत नवीन बाबी लक्षात यायच्या. अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत 'विज्ञान भारती'च्या कामाचे त्यांचे निवेदन तर भारावून टाकणारे आणि आपल्या देशातील वैज्ञानिक परंपरा आणि त्याच आजच्या काळातील संदर्भ, त्यात आपले काम याची अनेक उदाहरणं कायम स्मरणात राहणारी आहेत. अत्यंत उत्साहवर्धक... पण, अपघात झाला त्या दिवसापासून जयंतराव लवकर बरे होतील आणि पुन्हा आपल्याबरोबर भेटतील, हे मात्र एक स्वप्नच राहील. 'विज्ञान भारती'च्या ग्रुपमध्ये महिनाभर महामृत्युंजय जप नियमितपणे चालू होता. प्रत्येक दिवशी होणारं 'मेडिकल बुलेटिन' आशादायक असायचे, पण शेवटी काळाच्या मनातलं कळत नाही हेच खरं! आता आशा अनेक आठवणी आपल्याबरोबर असतील, पण फक्त जयंतराव नसतील, हे वास्तव स्वीकारून त्यांचं उर्वरित काम पुढे नेत कार्यरत राहाणं, हीच खरी श्रद्धांजली ठरेल. देवगिरी प्रांत विश्व हिंदू परिषदेतर्फे भावपूर्ण आदरांजली...ओम शांती...

– **योगेश्वर गर्गे**, प्रांत मंत्री, देवगिरी प्रांत

## भारतमातेचा एक नररत्न गेला...

अनेक स्वयंसेवकांचे प्रेरणास्थान, मृदु स्वभावी, कुशल संघटक-विचारक संघाचे कोकण प्रांताचे माजी प्रांत प्रचारक व 'विज्ञान भारती'चे राष्ट्रीय संघटन मंत्री जयंतजी सहस्रबुद्धे यांचे दीर्घ आजाराने दि. २ जून रोजी पहाटे दुःखद निधन झाले. विज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी उभे केलेले कार्य हे अद्भुत होते. शेकडो वैज्ञानिकांशी सहज संवादातून 'विज्ञान भारती'शी त्यांना जोडले. धीर-गंभीर, मोजकेच, पण परिणामकारक असा त्यांचा संवाद असे. ते बोलायला लागले की, समोरचा मंत्रमुग्ध होऊन ऐकायचा. त्यांच्या अकाली जाण्याने भारतमातेचा एक नररत्न गेला खऱ्या अर्थाने. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देईलच यात शंका नाही. ॐ शांती।।

– **माधव भानुशे**

## कस्तुरीचा सुगंध

शेषाद्रीजींचे स्वीय साहाय्यक म्हणून देशभर प्रवास केल्यावर जयंतराव नाशिक विभाग प्रचारक म्हणून जळगावला प्रवासाला यायला लागले. त्यांच्या शिक्षणाचा प्रभाव संघकामाचा विचार करताना जाणवायचा. 'बी.टेक' झाल्यावर चांगल्या संधी असतानाही आपल्या व्यक्तिगत जीवनाचे समर्पण संघकामासाठी करणाऱ्या जयंतरावांची प्रत्येक कृती काहीतरी शिकविणारी होती. त्यावेळेस मी अकरावीत प्रवेश घेतला होता आणि मी अधिक वेळ कार्यालयात येत असल्याने प्रवासात आल्यावर त्यांची भेट व्हायची. जयंतराव एकदा घरी जेवायला आले असताना घरातील आर्थिक परिस्थिती, आईची तळमळ त्यांनी शांतपणे ऐकून घेतली. आपल्या शिक्षणाचा उपयोग कुटुंबाला आधार आणि समाजाला मदत करणारा असला पाहिजे, असे सांगताना त्यांच्या बोलण्यातील भाव माझ्या तरुणाईच्या उंबरठ्यावर असलेल्या मनाला खूपच भावला होता. आपल्या वेळेचे नियोजन करून घरी मदत केली पाहिजे, शिक्षणही पूर्ण करायचं, संघकामही करायचं आहे, असे नुसते सांगितले नाही, तर कसं नियोजन करशील, कसा वेळ काढू शकतो, याची चर्चा झाली. जयंतरावांच्या संवादातल्या आत्मियतेने आणि जणू मीच माझं नियोजन करतो आहे, असे वाटायला लागले आणि तसे करण्याचा मी प्रयत्न केला. सकाळी पौरोहित्याचे काम, तीन तास आमच्या क्लासमध्ये टायपिंगची कामं करून वडिलांना मदत करायची, ११.३० नंतर कॉलेज आणि ५.३० ते ८.३० शाखा व नंतर संपर्क अशी योजना ठरली ती जयंतरावांमुळेच! असे किती तरी तरुणांना दिशा दाखविणारे उच्चविद्याविभूषित तरी जमिनीवर पाय घट्ट असलेले, आपल्या खळीच्या सौंदर्याने निर्मळ हसणारे जयंतराव, त्यांची भेट जणू कस्तुरीचा सुगंध देणारे असायची... नंतर कुठल्याही बैठकीत भेट झाली, त्यांनी चौकशी केली की संघाच्या कामाची एक नवीन प्रेरणा मिळायची... बावनकशी सोन्यासारखा कार्यकर्ता, प्रचारक एका अपघाताने जायबंदी झाला अनेक महिन्यांच्या शर्थीच्या झुंजीनंतर आज थांबला...जयंतरावांच्या पवित्र आत्म्यास विनम्र अभिवादन...

– **स्वानंद उमाकांत झारे**, जळगाव, देवगिरी प्रांत सेवा प्रमुख, ९४२३१८७३७१

## असा आमचा जयंता!

दि. २ जून रोजी जयंतराव सहस्रबुद्धे यांचे देहावसान ही बातमी आली आणि आमच्या परमप्रिय मित्राचा 'जयंता ते जयंतराव' प्रवास नजरेसमोर तरळला. गोरेगावकर लेनमधील तन, मन, जीवन हे राष्ट्रसमर्पित अशा सहस्रबुद्धे काका आणि काकू या सुवर्णाकारांनी घडवलेला सुवर्णालंकार असा आमचा जयंता! आम्ही विद्यार्थी भविष्याच्या चिंतेत चाचपडत असताना, उच्चशिक्षित पूर्ण वेळ प्रचारक बनून जीवन राष्ट्रसमर्पित करण्याच्या विचारांनी भारावलेला असा आमचा जयंता! महाविद्यालयात सुरुवातीच्या काही महिन्यांतच सर्व प्राचार्य व इतर कर्मचारी यांच्या मनात आपले स्थान निर्माण करणारा संपर्कप्रिय असा आमचा जयंता! कठीण प्रसंगी डगमगून ना जाता, कोणाशीही निर्भीडपणे संपर्क व चर्चा करून योग्य मार्ग काढण्याचा प्रयत्न करणारा शांतीप्रिय असा आमचा जयंता! महाविद्यालयीन निवडणुका अत्यंत प्रामाणिकपणे लढणारा, प्रसंगी गुंड प्रवृत्तीबरोबर दोन हात करण्यासही मागेपुढे न पाहणारा बिनधास्त असा आमचा जयंता! अभ्यासक्रमाबरोबरच विज्ञान चर्चासत्र, आकाशदर्शनसारख्या अनेक अभ्यासेतर उपक्रमांसाठी नेहमी पुढाकार घेणारा अभ्यासू असा आमचा जयंता! तीन जोडी कपडे, एक झोळी आणि काही पुस्तके असे कासवाचे घर घेऊन देश-विदेश भ्रमण करणारा साधा, सरळ, मनमिळाऊ असा आमचा जयंता! आपल्या स्मितहास्य, गोड स्वभाव, मधुर वाणीने सर्वांना आपलंस करणारा व सर्वांना आपलासा वाटणारा गुणवंत असा आमचा जयंता! अथकपणे चाललेल्या संघ आणि राष्ट्रकार्यांमध्ये महत्त्वाची भूमिका समर्थपणे निभावणारा, पण कधीही न दर्शविणारा शिस्तप्रिय स्वयंसेवक असा आमचा जयंता! थोरामोठ्यांमध्ये वावरणारा, 'जयंतराव' असा नावलौकिक असणारा, पण आम्हा मित्रांच्या संगतीत तोच जुना खट्याळपणा जपणारा सच्चा मित्र, असा आमचा जयंता! आपल्या लढाऊ वृत्तीने मृत्यूलाही शह देणारा, पण शेवटी क्रूर नियती पुढे हतबल होऊन आम्हा सर्वांना पोरकं करून निघून जाणारा आमचा जयंता! थकला असशील रे सख्या, थोडा विसावा घे मित्रा आता, पण आम्हां सर्वांसाठी तुला परत यावंच लागेल जयंता! आमच्या मार्गदर्शनासाठी आणि 'परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्र' ध्येयपूर्तीसाठी तुम्हाला परतावंच लागेल जयंतराव!!

– **विनय शेणॉय**, मित्र, वर्गमित्र, स्वयंसेवक

## 'विज्ञान भारती', वडखळ केंद्राचे स्वप्न

सुमारे १५ वर्षांपूर्वी पेण, अलिबाग येथे जयंतरावांच्या अध्यक्षतेखाली संघाच्या विश्वविद्यालय प्रकल्प व भोंसला सैनिक विद्यालय, 'विज्ञान भारती' इत्यादी प्रकल्पांना पुढे कसे न्यावे, या विषयावर एक उच्चस्तरीय बैठक झाली होती. या बैठकीत विश्वविद्यालयाचे भव्यदिव्य रूप कसे असावे, व्यवस्थापन व रचना कशी असावी, भारतीय संस्कृती व इतिहास याचा अभ्यास व संशोधनाला त्यात कसे प्राधान्य देता येईल, त्यास किती जागा लागेल, निधी संकलन कसे करावे इत्यादीवर सांगोपांग चर्चा झाली. पेण येथे कै. अच्युतराव टिळक यांचे घरी झालेल्या या बैठकीस स्वतः जयंतराव सहस्रबुद्धे, लक्ष्मण साठे, मुकुंदराव गोरे, वामनराव प्रभुदेसाई, न्यायमूर्ती पी. एल. जोशी, अधिवक्ता डी. एन. पेंडसे इत्यादी ज्येष्ठ मंडळी उपस्थित होती. टिळकांनी संघाच्या 'राष्ट्रहित सर्वोपरी' ब्रीदास अनुसरून आपल्या राहत्या घराच्या बाजूची दगडी इमारत व जिरणे येथील सुमारे १८५ एकर जागा संघाला विश्वविद्यालय प्रकल्पासाठी देऊ केली. त्यातील दगडी इमारतीत आता संघाचे कार्यालय आहे. ल. य. साठे यांनी वडखळ येथील मिठागराच्या जागेत नोंदणीकृत असलेल्या विवेकानंद वाचनालयाच्या सान्निध्यात ही जागा देऊ केली. या जागेत 'विज्ञान भारती' व 'भोंसला सैनिक विद्यालय' या प्रकल्पांचे विविध उपक्रम पेण, अलिबाग व कोकणातील युवा पिढीसाठी कसे राबविता येतील, याचा अभ्यास व्हावा, असा विषय जयंतरावांनी मांडला. ल. य. साठे यांचे स्नेही दत्त केशव साठे यांनी 'विज्ञान भारती'साठी वाचनालयास सुप्रसिद्ध वैज्ञानिकांच्या रंगचित्रांचा संच भेट दिला. काही तांत्रिक कारणांमुळे विश्वविद्यालयाचे स्वप्न पुरे होऊ शकले नाही. परंतु, अजूनही वडखळ येथील आपल्या वाचनालयांच्या जागेस धरून, 'विज्ञान भारती' व 'भोंसला सैनिक विद्यालया'चे उपक्रम सुरू व्हावे, या जयंतरावांच्या स्वप्नाला पुढे नेण्याचा मनोदय ज्येष्ठ स्वयंसेवक लक्ष्मण साठे यांनी वरील आठवण सांगतांना माझ्याकडे व्यक्त केला.

– **पुरुषोत्तम आगवण**, ठाणे, ९८२००८९३११

## जयंतरावांमुळे माझी आयुर्वेदशास्त्राकडे बघण्याची दृष्टी बदलली

जयंतराव आता कधीही भेटणार नाही, यावर विश्वासच बसत नाही. नाशिकच्या अभ्यावर्गामध्ये जयंतरावांचे बौद्धिक ऐकल्यावर माझी आयुर्वेदशास्त्राकडे बघण्याची दृष्टीच बदलली. कडू काढे आणि काळ्या गोळ्या... आयुर्वेद एवढाच आहे का? २०४७ मध्ये आयुर्वेद कसा असेल, याची कल्पना करा. भारताला विश्वगुरु होण्यास आयुर्वेद आणि वेद ही शास्त्रे मदत करणार आहेत. तुम्ही व्यासपीठ कार्यकर्त्यांनी कंबर कसून कामाला लागा. वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय परिषदांमधून जयंतराव भेटत राहिले. ते आवर्जून चौकशी करायचे की कुठल्या विषयावर रिसर्च पेपर सादर केला...

– **लक्ष्मीकांत कोर्टीकर**

## संघरूपी राष्ट्रयज्ञातील समिधा...

भावपूर्ण श्रद्धांजली... माझ्या डोळ्यात स्मरण-अश्रू आहेत. जयंतचा ज्यांना परिचय आहे, (सॉरी..होता), त्यांची या क्षणाची मनस्थिती मी जाणू शकतो. मध्यमवर्गीय, गिरगावी, लहान बाल स्वयंसेवक... व्यक्ती म्हणून विलक्षण... उत्तम शैक्षणिक गुणवत्ता (अनेकदा माणूस मोजमापाची हीच पट्टी आपण वापरतो)... मृदु भाषा, स्वभाव... पण, अन्-कॉम्प्रोमायझिंग ध्येयनिष्ठा... तेजस्वी, धडाडी तरीही सर्वांसोबतचा कार्यकर्ता... संघरूपी राष्ट्रयज्ञातील समिधा.. 'विज्ञाचरण संपन्न' (जे जीवन तत्वज्ञान मानलं, ओळखलं आहे, त्यानुसारच जगणं) हे केवळ गौतम बुद्धाचं गुण वर्णन नाही, तर अन्यही, प्रबुद्ध प्रक्रियेत याचे धारणकर्ते आहेत, याविषयी माझी खात्री पटली ती जयंतमुळे.. मृत्यूशोक नाही. कारण, अधिक उच्च पातळीवर विचरण करण्याची संधी निसर्गाने दिली आहे.

– **उमेश देशपांडे**

## जयंता कायम प्रचारक राहिला!

गिरगावमधील स्वयंसेवक जयंत सहस्रबुद्धे... आम्ही बाल शिशु असताना मुंबई महानगरात कित्येकदा एकत्रित आलो आहे, खेळलो आहे. १९८७ मध्ये जेव्हा मला प. पू. हेडगेवार शताब्दीवर्ष निमित्ताने मुंबईतला सर्वात पहिला विस्तारक जाण्याचा योग आला. तेव्हा, जेमतेम आठवडाभर गिरगाव नगर देण्यात आले होते. एक दिवस श्रीकांत सहस्रबुद्धे यांनी रात्री घरी जेवायला बोलावले होते. तेव्हा, जयंता 'बीएससी टेक' तर विनायक ज्युनिअर कॉलेजात शिकत होता. माझ्या या विस्तारक (छोटा कालावधी) राहण्याबद्दल श्रीकांतजी आपल्या मुलांना भरभरून प्रोत्साहित करत होते. पुढे जाऊन मला काळबादेवी नगर मिळाले. पण, अजूनही तो सहस्रबुद्धे यांच्या घरातील प्रसंग आठवतो. जे कारणे दोघे भाऊ प्रचारक म्हणून बाहेर पडले आणि प्रचारक म्हणून परतण्याच्या अहमहमिकेमध्ये जयंता कायम प्रचारक राहिला.

– **गणेश माणगावकर**

## असे होते जयंतराव...

जयंतराव सहस्रबुद्धे गोव्यात विभाग प्रचारक म्हणून आले, तेव्हापासूनच ते आमच्या घरी ढवळीला येत. घरी येऊ लागले तेच ते आमच्यातले झाले, असे अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे एक गुणी व्यक्तिमत्व. आमच्या ढवळी गावात विश्व हिंदू परिषद संचालित 'मातृछाया' हे वसतिगृह आहे. 'मातृछाये'त त्यावेळी महाराष्ट्रातून पाटील मावशी व्यवस्थापिका म्हणून आल्या होत्या. जयंतरावांच्या सांगण्यावरून मी लगेच मावशींना भेटले. त्यांनी शाखेत खूपच छान विषय मांडला. त्या दिवसापासून त्या आमच्या झाल्या. समितीशी जोडल्या गेल्या. असे समोरच्याला समजून घेऊन योग्य मार्गदर्शन करणारे अत्यंत सालस, कुशाग्र बुद्धीचे, आनंदी, हसरे व शांत व्यक्तिमत्व असे होते जयंतराव!

– **वर्षाताई ढवळीकर**



## जयंतराव हे वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान संस्थांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरणास्रोत

रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक आणि 'विज्ञान भारती'चे अखिल भारतीय संघटन सचिव जयंत सहस्रबुद्धे यांच्या अकाली निधनाबद्दल माहिती कळल्यानंतर खूप दुःख झाले. जयंतजींच्या निधनाने देशाने एक ज्वलंत राष्ट्रवादी-विचारवंत आणि एक उत्कृष्ट संघटक गमावला आहे. मुंबई विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमध्ये पदवी प्राप्त करून, त्यांनी रा. स्व. संघाचे प्रचारक बनण्याचा निर्णय घेतला आणि आपले संपूर्ण आयुष्य देशासाठी समर्पित केले. प्रचारक म्हणून त्यांनी महाराष्ट्रात सेवा केली. पुढे ते कोकणचे प्रांत प्रचारक आणि नंतर 'विज्ञान भारती'चे अखिल भारतीय संघटन सचिव बनले. ऊर्जा, कल्पना, सर्जनशील दृढनिश्चयाने परिपूर्ण असलेले जयंतजी सर्व वयोगटातील शास्त्रज्ञांमध्ये लोकप्रिय होते. त्यांच्या वैज्ञानिक ज्ञानाने आणि बौद्धिक पराक्रमाने त्यांना वैज्ञानिक समुदायामध्ये एक उत्कृष्ट संघटक बनण्यास सक्षम केले. 'आझादी का अमृत महोत्सव' या कार्यक्रमात त्यांनी मोठे योगदान दिले. अनेक वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान संस्थांसाठी ते मार्गदर्शक आणि प्रेरणास्रोत आहेत. अतिशय अल्प आयुष्य जगले तरी एक संघटक आणि विचारवंत म्हणून त्यांनी एक अतुलनीय वारसा मागे ठेवला आहे, जो कायम स्मरणात राहील. 'प्रज्ञा प्रवाह' जयंत सहस्रबुद्धे यांना श्रद्धांजली अर्पण करत आहे आणि शोकसंतप्त कुटुंबीयांबद्दल संवेदना व्यक्त करते. त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना.

– **जे. नंदकुमार**, अखिल भारतीय संयोजक, प्रज्ञा प्रवाह

## जयंतजींचे स्वप्न पुढे नेण्यासाठी मशालवाहक होऊया!

माझ्या हृदयात विशेष स्थान असलेले प्रिय जयंतजी यांच्या अकाली निधनाने मला खूप दुःख झाले. 'विज्ञान भारती'मधील त्यांच्या सहवासात मी त्यांच्याकडून खूप शिकलो. त्यांच्या जाण्याने कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. जयंतजी केवळ सर्वांचेच लाडके नव्हते, तर एक उल्लेखनीय व्यक्ती होते, ज्यांनी आपले जीवन आपल्या देशाच्या निःस्वार्थ सेवेसाठी समर्पित केले. भारतीय संस्कृतीचा प्रसार करण्यात आणि आपल्या देशातील प्राचीन विज्ञानांचे महत्त्व अधोरेखित करण्यात जयंतजींनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आपला समृद्ध वारसा जतन करण्यासाठी आणि आपल्या पूर्वजांच्या प्रगल्भ शहाणपणाबद्दल जागरुकता पसरवण्यासाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहेत. जयंतजींचे स्वप्न पुढे नेण्यासाठी आपण सर्व मिळून मशालवाहक होऊया! त्यांची अतूट बांधिलकी आणि तळमळ कायम स्मरणात राहील. त्यांच्या अमूल्य योगदानाने अनेकांच्या जीवनावर अमिट छाप सोडली आहे, असंख्य व्यक्तींना आपली सांस्कृतिक मुळे आत्मसात करण्यासाठी प्रेरणा दिली आहे. या कठीण काळात आपण जयंतजींच्या निःस्वार्थ भावनेचे आणि त्यांनी आपल्या जीवनावर केलेल्या सकारात्मक प्रभावाचे स्मरण करूया. त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो...

– **सुहास पेडणेकर**

## साक्षरता अभियानाचे महत्त्व पटवून देणारे जयंतराव...

माझ्या क्लासमध्ये सुरुवातीला मी सरस्वती पूजन केले त्यावेळी जयंतराव वक्ता म्हणून आले होते. तेव्हा ते खूप वेगळ्या विषयावर मुलांशी बोलले, कुठे ही राष्ट्र, भक्ती हे शब्द न वापरता सर्व काही त्याबद्दलच सांगितले. त्यावेळची मुले अजून भेटली की त्यांनी सांगितलेली 'साक्षरता अभियाना'ची महत्ता आठवतात आणि काम किती सहज करता येते, याची प्रचिती येते. त्यांनी त्यावेळी सांगितले की, ''आपल्या भारतात ५० टक्के साक्षरता आहे आणि ५० टक्के निरक्षरता. आपण सर्वांनी फक्त एका माणसाला साक्षर करायचं आहे की, भारत १०० टक्के साक्षर होईल.'' त्यांचं ऐकून आमच्या पाच मुलांनी पाच जणांना लिहायला व वाचायला शिकवले आणि त्यांना दाखवून शाबासकी घेतली! किती सोप्या व योग्य शब्दात मुलांना सांगितले होते ते मला अजूनही नीट आठवते. संघ परिवाराचे खूप मोठे नुकसान झाले असे वाटते. भावपूर्ण श्रद्धांजली!

– **मनीषा साठे**, चिपळूण

## कार्यकर्ते आणि कार्यकर्त्यांमुळे संघकार्यही वाढविणारे जयंतराव...

जयंतराव सहस्रबुद्धे कोकण प्रांताचे पूर्व प्रांत प्रचारक आणि 'विज्ञान भारती'चे अखिल भारतीय संघटन मंत्री. कुशाग्र बुद्धी, अनेक विषयांचे सखोल ज्ञान, मृदूभाषी, तेजस्वी चेहरा आणि अत्यंत साधी राहणी. संघटन कार्य विस्ताराची तळमळ त्यांच्या बोलण्यातून आणि कृतीतून दिसत असे. जयंतराव गोव्यात विभाग प्रचारक म्हणून आले, त्यावेळी संघाचे काम सुरू होते. परंतु, त्यानंतर 'विश्व हिंदू परिषद', 'विद्यार्थी परिषद', 'संस्कृत भारती', 'सहकार भारती' अशा विविध १७ संघटनांचे काम सुरू करण्यासाठी त्यांनी कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली, असे त्या वेळचे कार्यवाह संजय वालावलकर सांगतात. गोव्यात संघकार्याची व्याप्ती जयंतरावांच्या काळात वाढली. प्रवासात ज्या ज्या घरी ते जात, ते त्या घरातलेच बनून जात. सर्वांना आपलेसे करून घेण्याची त्यांची पद्धत होती. त्याबद्दलचा एक प्रसंग. एकदा व्यापक केंद्रीय बैठक गोव्यात घ्यायची ठरली. स्थान शोधण्यासाठी प्रवास सुरू झाला. शेवटी रामनाथीची जागा त्यांना पसंत पडली. परंतु, कमिटीकडून होकार येईना. जवळजवळ २० वर्षांपूर्वी या कमिटीला संघ किंवा संघकार्य काय हे माहीत नव्हते. जयंतराव व कार्यवाह अध्यक्षांकडे गेले. त्यांना विषय समजावून सांगितला आणि कमिटीतल्या प्रत्येक सदस्याचे नाव पत्ता घेऊन ते प्रत्येकाला भेटले. गोव्याच्या उत्तरेपासून दक्षिणेकडे सगळ्या तालुक्यात महिनाभर प्रवास केला. कमिटीची बैठक बोलावली आणि शेवटी कमिटीने मान्यता दिली.

संघकार्याला विरोध करणाऱ्यांनाही त्यांनी कसे आपलेसे केले, त्याबद्दलचा एक प्रसंग - एकदा पूर्ण गोव्याचे एक महाशिबीर घेण्याचे ठरले. स्थळ मेरशी गाव ख्रिश्चनबहुल वस्ती. परंतु, मध्यवर्ती असल्याने तेथेच शिबीर घेण्याचे ठरले. तंबू ठोकायचे होते. कामाला सुरुवात होताच चार-पाच ख्रिश्चन गुंड येऊन त्यांनी कार्यकर्त्यांना दटावण्यास, मारण्यास सुरुवात केली. हाणामारीनंतर कार्यकर्ते घरी गेले. लगेच जयंतरावांना ही गोष्ट समजली, ते ताबडतोब मेरशीला पोहोचले. चौकशी केली आणि त्या गुंडांच्या घरी गेले. प्रत्येक घरात जाऊन त्यांच्यांशी बोलणी करून त्यांना समजावले. त्यांची मान्यता मिळवली आणि त्या ठिकाणी ते शिबीर झाले. अशा पद्धतीने जयंतराव मिळेल त्या माणसाला आपलेसे करत. त्यामुळे कार्यकर्ते वाढले आणि कार्यकर्त्यांमुळे संघकार्यही वाढले. हे प्रसंग आठवणीने सामायिक केले आहेत संजय आणि राजेश्वरीताई वालावलकर यांनी. संघकार्याबरोबरच समिती कामाचीही ते चौकशी करत. गोव्यातील समितीच्या बऱ्याच सेविकांकडे त्यांचे येणे-जाणे असे, विचारपूस असे. अतिशय आदर भावाने ते मला तर 'ताई कशा आहात' असे विचारत. गोव्यातील सर्व सेविकांच्यावतीने जयंतरावांना भावपूर्ण श्रद्धांजली.

– **विभावरी उमर्ये**

## किमयागार जयंतराव...

जयंतराव सहस्रबुद्धे म्हणजे एक विलक्षण हुशार व्यक्तिमत्व होतं. ते संघाचे प्रचारक होते. पण, आपण करत असलेल्या त्या कामाचा त्यांच्याकडे कोणताही अभिनिवेश नव्हता. काही वेळा प्रचारकतत्वाचासुद्धा अहंकार निर्माण होतो. पण, जयंतरावांच्या बाबतीत त्याचा लवलेशही नव्हता.

ते गोवा विभाग प्रचारक होते. त्या सुमारास मी विभाग संपर्क प्रमुख होतो. १९९६-९७च्या सुमारास मी संघावर नाराज व्हावे, अशी एक घटना आमच्या एकत्रित कुटुंबाच्या बाबतीत घडली. आम्हा कुटुंबीयांची अशी समजूत झाली की संघाचे वरिष्ठ कार्यकर्ते आमच्या बाबतीत न्याय्य भूमिका घेत नाहीत. त्यामुळे मी ही असा निर्णय घेतला की आपण संघाचे काम आतापर्यंत खूप केले, आता थांबूया व तसे मी जयंतरावांना सांगितले. ते म्हणाले, ''ठीक.'' पण, त्यांनी घरी यायचे सोडलं नाही.

त्याचदरम्यान पणजीतील एका प्रथितयश डॉक्टरांची काही कामाकरिता भेट घ्यायची होती. जयंतरावांनी मला विचारलं, ''आपण जाऊ या का?'' मी तर गुश्शातच होतो. मी म्हटलं, ''अहो, मी आता संघाचं काम करणार नाही. त्यामुळे मी नाही येणार.'' संघ प्रचारकाने सांगितलं किंवा जयंतरावांसारख्यांनी सुचवलं आणि मी केलं नाही, असं बहुधा पहिल्यांदाच होत होतं. त्यानंतर त्या गोष्टीचा मलाच फार त्रास होऊ लागला. पण, एवढं झालं तरी त्यांनी आमच्या घरी येणं सोडलं नाही. नाश्ता, जेवणासाठी येणं बंद केलं नाही. अन्य वेळी ही येऊन गोव्यातील संघकामाची माहिती मला सांगणं बंद केलं नाही. एकदा माझ्या पत्नीने त्याना विचारलंही की, तुम्ही 'यांना' सर्व माहिती देता, विचारता, एखादा कार्यक्रम करूया, असंही विचारता. पण, 'हे' काहीच प्रतिसाद देत नाहीत. त्यावर ते म्हणाले, ''लेले सर स्वस्थ बसणार नाहीत. कोणत्या ना कोणत्या प्रकारे संघकाम करत राहतील आणि संघकाम म्हणजे कोणते तरी चांगले काम.'' दामुअण्णा दाते सांगायचं तसं. आणि तसंही होतं.

मी तेव्हा प्राचार्य होतो व शाळा समूहाच्या कामात स्वत:ला भरपूर गुंतवून घेतलं होतं. जयंतरावांचा संपर्क माझ्याकडे तेवढाच होता जेवढा मी संघकाम करत असताना होता आणि नंतरच्या दोन महिन्यांत मी परत कधी संघकामात गुरफूटून गेलो, हे माझे मलाच समजले नाही. नंतर तर प्रांत महाविद्यालयीन प्रमुख अशीही जबाबदारी माझ्याकडे आली व त्यातही माझा खारीचा वाटा मी उचलू शकलो. अजिबात नाराजी न दाखवता, माझ्याशी बोलणं न करता माझी समजूत काढण्याचा कृत्रिम प्रयत्न न करता, केवळ जबरदस्त संपर्क ठेवून एका उगाचच दुखावलेल्या कार्यकर्त्याला त्यांनी परत संघकामात आणून 'मा भारती' ची सेवा करण्याची संधी दिली. असे ते किमयागार होते.

– **रत्नाकर लेले**, पणजी